बोहरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत ८० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस.... ........८१

Mofussil ... ... ... 2 ( with postage

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 a

Advertisement

below 10 lines ...... 2 R

Per line over 10 ......3 a

Repetitions Per line ,, 2 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 7 SEPTEMBER 1903 NO 35

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ७ माहे सप्तंबर सन १९०३ इ० अंक ३५

## NOTICE

—:०*०:—

Wanted a cushion tyre second hand bicycle in thorough working order. Price and particulars to be communicated.

29/8/03 } GOVIND B. OKE
*Akola.*

## चातुर्मासा करितां

खालीं दर्शविल्या प्रमाणें पुस्तकाचे ६ गट केले आहेत. या गटांत प्राकृतग्रंथ पोथ्या, पुराणयुक्त, गोष्टी, कादंबऱ्या, संगित व साधी नाटकें, फार्स, पहसनें, शिवाय हरएक तऱ्हेची पुस्तकें आहेत. करितां त्वरा करा संधी व्यर्थ दवडूं नका.

| ग. नं० | पुस्तकें | मूळ.किं. रु. | मिळणा. किं. |
|---|---|---|---|
| १ | १० | ८ | २ |
| २ | २० | १९ | ४ |
| ३ | ३१ | २० | ६ |
| ४ | ४० | ३१ | ८ |
| ५ | ५० | ३० | १० |
| ६ | १०० | ५० | १५ |

किंमती शिवाय पोस्टेज खर्च निराळा पडेल. गट मागविणारांनीं संपूर्ण पत्ता बाळबोध अक्षरांनीं कळवावा.

पत्ताः— सन्मार्ग बोधक मंडळी
कसबा पेठ पुणें-सिटी.

## फर्दापूरचीं लेणीं

या लेण्यासंबंधानें एक सुरस निबंध रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी यांनीं लिहिलेला आहे. गेल्या उन्हाळ्याच्या सुट्टींत हे तीं लेणीं पाहण्यासाठीं गेले होते त्यांनीं फार चोकस दृष्टीनें हीं लेणीं पाहिलीं असें त्यांचा निबंध सांगतो. प्रेक्षणीय स्थळें पुष्कळजण पाहतात परंतु त्या स्थळांचें अंतरंग इतिहास दृष्टीनें पाहून मनाला निरनिराळा बोध व करमणूक करून घेण्याची कला राजश्री रामभाऊ महाजनी यांस बरीच साधली आहे त्यांनीं गेल्या ३० वे तारखेला जो निबंध लायब्रींत वाचून दाखविला त्यावरून त्यांच्या ह्या कलेची चांगली अटकळ होते. राजश्री रामभाऊ यांचा हा स्थळवर्णनाचा प्रयत्न पहिला आहे तथापि तो फार चांगला साधला आहे.

काव्याची माधुरी कळण्याला सहृदयता पाहिजे; तद्वत् निरनिराळीं स्थळें पाहण्यापूर्वीं एका प्रकारची सहृदयताच लागते. ही सहृदयता येण्याला कोणत्याही स्थळाचा पूर्व वृत्तांत शोधला पाहिजे, तद्विषयक गोष्टी अगोदर कळल्या पाहिजेत, निरनिराळ्या वर्णनांचे ग्रंथ वाचण्यांत आलेले पाहिजेत, आणि एखाद्या कवीच्या प्रसादानें दृष्टीला सृष्टीसौंदर्य पाहतां आलें पाहिजे. या निबंधांत कांहीं कांहीं स्थळीं ही सहृदयता दृष्टीस पडते ह्मणून आह्मी या निबंधांतील बराचसा भाग आमच्या पत्रांत छापणार आहों.

आजंठ्याच्या डोंगरांत हीं लेणीं कोरलेलीं असून तेथून अजिंठा गांव दोन कोसावर आहे. फर्दापूर व लेणीं हीं मोंगलाईंत अजिंठ्याच्या तहशिलींत औरंगाबाद जिल्ह्यांत आहेत. अजिंठा तहशील ही मोंगलाईंतील प्रसिद्ध सरदार सर सालरजंग ह्याची जहागीर होय.

"लेण्यांचें विस्तरशः वर्णन देण्यापूर्वीं, ज्या काळांत तीं कोरलीं गेलीं त्या काळाचें थोडक्यांत सिंहावलोकन करणें जरूर आहे. त्या पासून ह्या लेण्यांचा उपयोग काय होता ह्या शंकेचें निरसन सहज होणार आहे. लेण्यांमध्यें जागोजाग दिसून येणाऱ्या बुद्धाच्या मूर्तीवरून साधारण प्रेक्षकाच्या सहज लक्ष्यांत येईल कीं ज्या काळांत बौद्ध धर्माचा प्रसार महाराष्ट्रांत झाला होता त्या काळांत हीं लेणीं कोरलीं असावीं. चीन देशांतील प्रसिद्ध प्रवासी हुएनसंग ह्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून इ. स. ६२९ पासून ६४५ पावेतों प्रवास केला. त्यानें आपल्या प्रवासाचें जें वर्णन केलें आहे त्यांत ह्या लेण्यांविषयीं निर्देश केलेला आढळतो. पुलकेशीच्या राज्याच्या पूर्व भागास हीं लेणीं होतीं असें हुएन संगच्या लेखांवरून समजतें. सबब हीं लेणीं इ० स० ६२९ पूर्वीं अस्तित्वांत होतीं गोष्ट निर्विवाद आहे. ह्या करितां गौतम बुद्धाच्या काळा पासून सुमारें इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंतच्या काळाचें अवलोकन केलें असतां, वर दर्शविलेल्या शंकेचें निरसन होईल. प्रसिद्ध धर्म गुरु गौतम बुद्ध ह्याचा जन्म ख्रिस्तीशका पूर्वीं ५५७ ह्या सालीं नेपाळच्या पायथ्याशीं असलेल्या कपिल वस्तु ह्या गांवीं झाला. गौतम बुद्ध ह्याचें मूळचें नांव सिद्धार्थ. हा राजकुळांत जन्मला असल्यामुळें साधारण मनुष्यास संसारांत येणाऱ्या अडचणी ह्यास प्राप्त झाल्या नसल्या परंतु त्या काळीं ब्राह्मणानीं धर्म भांडार आपल्या जवळ ठेवलें असून त्यांची सर्व मदार स्वर्गप्राप्ति व तीस साधनीभूत अशीं वेदांत सांगितलेलीं यज्ञ यागादिक कर्में ह्यांजवर होती; ह्या मुळें कर्माचें स्तोम फार माजलें असून सदाचरणाकडे जशी नजर असावी तशी नव्हती. यज्ञ यागादि कर्मांकरितां पशुवध फार होत असे; व बाकीचे तीन वर्ण अज्ञानांधकारांत चांचपडत होते. ही स्थिती पाहून गौतम बुद्धाचें मन फार कळवळें; व व ह्या प्रमाणें ह्याच्या मनाची स्थिती झाली असतां, एकदां तो राज्य लक्ष्मीस व तिला अनुषंगिक असलेल्या वैभवास लाथ मारून वनांत निघून गेला. त्या काळीं प्रचलित असलेल्या धर्मतत्वां विषयीं त्यानें बरेच दिवस विचार केला परंतु त्याच्या मनाचें समाधान होईना अखेरीस ह्याच्या वयाच्या पस्तीसाव्या वर्षीं तो एके दिवशीं बोधी वृक्षाच्या छायेखालीं बसला असतां आत्मोन्नति, मनोनिग्रह, व भूतदया ह्या तीन तत्वांच्या सहायानें मनुष्यास हा संसारार्णव सहज तरून जातां येईल असें ह्यास वाटलें. बुद्धाच्या धर्मांतील चार मुख्यतत्वें आहेत तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ हें आयुष्य दुःखमय आहे.

२ वासना ही दुःखाचें मूळ होय.

३ वासना दमन केली असतां दुःखाचा नाश होतो.

४ निर्वाण किंवा दुःख ध्वंस प्राप्त होण्याकरितां जन्म मरणाचे फेरे चुकविले पाहिजेत; व ह्या करितां कर्मनाश झाला पाहिजे; व कर्मनाश करण्या करितां सदाचरणानें वागलें पाहिजे. आणि सदाचरणानें वागणें ह्मणजे सम्यक्, संकल्प, सम्यग्वाक्, सम्यक्कर्मांना, सम्यगाजीव, सम्यग्व्यायाम, सम्यक्स्मृति, सम्यक्समाधि ह्या अष्ट उपायांचें अवलंबन केलें पाहिजे. ह्या नंतर गौतम बुद्धानें आपलें राहिलेलें आयुष्य ह्या तत्वाचा प्रसार करण्यांत घालविलें. त्यानें आपल्या उपदेशामृतानें आपल्या हयातींत बरेच शिष्य जमविले; त्यांपैकीं कित्येकांनीं बुद्धा प्रमाणेंच संसारावर पाणी सोडून वनवास स्वीकारला होता. त्यांची मदत बुद्धानें आपल्या मताच्या प्रसारार्थ घेतली. आपल्या शिष्यांपैकीं पुरुष व स्त्रिया ह्यांना त्यांच्या इच्छेनुरूप संसारावर पाणी सोडण्यास बुद्धाची परवानगी असे. ह्या प्रमाणें बुद्धानें भिक्षु व भिक्षुणी ह्यांची संस्था हिंदुस्थानांत प्रथम सुरू केली. ह्या प्रमाणें बुद्धाच्या शिष्य मंडळांत भिक्षु, भिक्षुणी व त्याच प्रमाणें संसारांत राहून काल क्रमणा करणारे पुरुष व स्त्रिया हीं होतीं. श्रमणक होण्यापूर्वीं मनुष्य कोणत्याही जातीचा असला तरी श्रमणक झाल्यानंतर त्यास इतरा प्रमाणें हक्क व मान मिळावयाचा असें बुद्ध ह्मणत असे. व ह्या प्रमाणें सुनीत नांवाचा एक भंगी जातीच्या मनुष्य बुद्धा सशरण गेला असतां, त्याला बुद्धानें श्रमणकाची दीक्षा दिली असें त्याच्या चरित्रावरून आपणांस समजतें. ह्या प्रमाणें गौतम बुद्धानें श्रमणकांची संस्था स्थापन केली व त्यानीं कशा रीतीनें वागावें ह्या बद्दलचे नियम घालून दिले ते बुध्दाच्या काळानंतर सुमारें पांच शतकांनीं पाली भाषेंत ग्रंथ रूपानें प्रसिध्द करण्यांत आले. तोंपर्यंत बुध्दाचा उपदेश केवळ गुरु मुखानेंच प्राप्त होत असे! ख्रिस्ती शका पूर्वीं ८० सालीं सिंहलद्वीपांत बुध्दाचा उपदेश "त्रिपीतक" ह्मणजे "तीन करंडे" ह्या नांवाच्या पुस्तक रूपानें प्रसिध्द झाला. सुत, विनय व अभिधम्म पद असे त्याचे तीन भाग आहेत. "सुत" ह्या भागांत बुध्दाचीं वचनें सूत्र रूपानें दिलीं आहेत; "विनय" भागांत भिक्षु व भिक्षुणी ह्यांनीं आचार कसा ठेवावा ह्या बद्दलचे नियम आहेत; व "अभिधम्मपद" ह्या भागांत बुध्दानें धर्माचरणा विषयीं केलेला उपदेश ग्रथित केला आहे. असो. बुध्दानें ह्या प्रमाणें व भिक्षु भिक्षुणी ह्यांच्या सहायानें बरेच उपासक मिळविले होते तरी बौध्द मतास धर्माचें स्वरूप तीन शतकें पर्यंत आलें नाहीं ख्रिस्ती शका पूर्वीं २६० ह्या वर्षाचे सुमारास घराण्यांतील चंद्र केतूचा नातू अशोक हा मगध देशच्या राज्यावर बसला; ह्याचें राज्य बहुतेक हिंदुस्थानभर व अफगाणिस्थान पर्यंत पसरलें होतें असें त्या काळच्या इतिहासावरून दिसून येत आहे. ह्या राजानें स्वतः बौध्द धर्माची दीक्षा घेतली व ह्यानें बौध्द धर्माचा प्रसार करण्या करितां चारी दिशा उपदेशक पाठविले, ह्या राजानें फार लोकोपयोगी कृत्यें केलीं त्यामुळें ह्याची कीर्ती अजरामर झाली आहे. ह्या प्रमाणें बौध्द मतास अशोक राजाचे वेळीं राजाश्रय मिळाल्यामुळें त्यास "धर्म" हें पद प्राप्त झालें. ह्या काळाचे सुमारास महाराष्ट्रांत बौध्द धर्माचा प्रसार झाला; व भिक्षु व भिक्षुणी ह्यांची संस्था बौध्दाचेच वेळीं स्थापन करण्यांत आली होती तिला अशोकाचे वेळीं बरेंच उत्तेजन मिळालें. भिक्षु व भिक्षुणी ह्यांची रहाणी अगदीं साधी असावी. थंडी, वारा व ऊन ह्यां पासून बचाव करण्या करितां तीन कफन्या, कमरबंद, मुंडण करण्या करितां एक वस्तरा, भिक्षापात्र, कफन्या शिवण्यास एक सुई, पाणी गाळावयाचें फडके ह्या अगदी जरूरीच्या पदार्थांपेक्षां जास्त पदार्थ त्यांनीं बाळगूं नये असा बुद्धाचा उपदेश असे; त्याच प्रमाणें त्यांनीं वस्ती पासून दूर एखाद्या झाडाच्या छायेखालीं रहावें अशी बुध्याची आज्ञा होती. परंतु कालान्तरानें श्रमणकांना सुद्धां आपणांस निवाऱ्याची जागा असणें बरें वाटूं लागलें असावें; व त्यांच्या शिष्यांनीं ही गुरुसेवा करण्याचे हेतुनें त्यांची इच्छा पुरी करण्याकरितां, पर्वतामध्यें विहार बांधून दिले असावे. ह्या मुळें अजिंठ्याच्या लेण्या सारखीं लेणीं ह्याच काळाच्या सुमारास अस्तित्वांत आलीं. असो. गौतमबुद्ध आपल्या हयातींत पूर्वींच्या पांचशे वर्षां पुर्वींच्या जन्मांतील हकीकत बिनचूक सांगत असल्यामुळें, व ह्याच्या वर्तनांत सदाचरण ह्या गुणाचा प्रादुर्भाव विशेष होत असल्या मुळें, लोक त्याला ईश्वरी अवतार मानूं लागले! व त्याच्या मरणा नंतर त्याच्या अस्थि कोणत्या प्रांतांत ठेवाव्या ह्या बद्दल बरीच वाटाघाट सुरू झाली. अखेरीस तंटा मिटविण्या करितां असें तोड काढण्यांत आली कीं बुद्धाच्या अस्थीं आठ समभाग करून ते आठ दिशांकडे पोंच.

विण्यांत यावे, ह्या प्रमाणें त्या अस्थि प्रांतो-प्रांतीं पोहोंचविण्यांत आल्या. ह्या प्रमाणें बुद्धाच्या किंवा एखाद्या गुरूच्या अस्थि पुरून जेथें समाधीच्या आकाराचा गर्भ तयार करून त्यावर तोरण बांधण्यांत येतें त्यास "दगोबा" असें ह्मणतात. बुद्ध हा विष्णुचा अवतार समजण्या पर्यंत लोकांची समजूत ठेवल्यामुळें बुध्दाच्या मरण्या नंतर, त्याची मूर्ति किंवा दगोबा ह्यांची पुजा लोक मनोभावानें करूं लागले. ह्या-प्रमाणें बौद्धधर्मानुयायांत मूर्तिपूजा सुरूं झाली. असो. भिक्षु व भिक्षुणी आपल्या शिष्यांनीं बांधलेल्या विहारांत, राहून आपला काळ ध्यान करण्यांत घालवीत असत त्याच प्रमाणें विहारांतील मोठ मोठ्या दालनांत आपला उपासक वर्ग जमा करून त्यांना धर्म-शिक्षण देण्याचें पुण्य काम भिक्षु भिक्षुणी त्या काळीं करीत असत. बुद्धाच्या मूर्तीची किंवा दगोबाची पुजा करण्याचा प्रघात कालान्तरानें बौद्ध धर्मानुयायांत पडल्यामुळें त्यांना हल्लींच्या देवळां सारख्या भव्य इमारतींची उणीव भसूं लागली असावी. ह्यामुळें "चैत्य" ह्या इमारती अस्तित्वांत आल्या असाव्या. अशोकाचे वेळीं बौद्ध धर्माचा प्रसार महाराष्ट्रांत झाल्यामुळें त्या काळा नंतर हीं लेणी कोरलीं गेलीं असावीं. अशोका नंतर मौर्य घराण्याचें वर्चस्व सुमारें दोन पिढ्यांचे आंत नाहींसें झाल्यामुळें बौद्ध धर्मास असलेला राजाश्रय नाहींसा झाला. अशोकाच्या नातवाच्या मागून कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकांतील नायक अग्निमित्र ह्याचा बाप पुष्पमित्र ह्यानें मगध देशाचें राज्य मिळविलें, हा राजा हिंदुधर्माभिमानी असल्याचें त्या काळच्या लेखा वरून दिसून येतें कारण ह्याच्या वेळीं हिंदु लोकांचे यज्ञ बऱ्याच काळा नंतर पुनः सुरूं झाले तथापि पुष्प मित्राच्या घराण्या नंतर, मगध व हिंदुस्थानांतील इतर प्रांतावर शक नांवाच्या घराण्यांतील परधर्मी राजांनीं स्वाऱ्या केल्या व आपलें वर्चस्व निरानिराळ्या प्रांतांतून स्थापित केलें. त्या काळच्या हिंदु रिवाजा प्रमाणें शक राजे हिंदु करण्यांत आले तरी ब्राजपासून हिंदु धर्म किंवा बौद्ध-धर्म ह्यांपैकीं एकास राजाश्रय मिळाला नाहीं ह्यामुळें एक समयावच्छेदें करून दोन्ही धर्म त्या काळीं आचारांत असावे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अखेरीस ख्रिस्ती शकाचे चौथ्या शतकाचें प्रारंभीं "गुप्त" नांवाच्या हिंदु घराण्यांतील राजांनीं आपलें वर्चस्व स्थापित केलें त्यावेळीं हिंदुधर्मास राजाश्रय मिळाला. तेव्हां पासून बौद्ध धर्मास हिंदुस्थानांत उतरती कळा लागली. या काळा नंतर "महादेव" "विष्णु" "गणपती" ह्या देवतांच्या नांवानें स्वतंत्र देवळें सुरूं झालीं परंतु ह्या काळापासून हिंदु धर्मास जें स्वरूप प्राप्त झालें आहे तें पूर्वीच्या वेदिक धर्माहून निराळें आहे; ह्मणजे हें रूपान्तर होण्यास बौद्ध मत बऱ्याच अंशानें कारणीभूत झालें असलें पाहिजे. अलिकडे यज्ञ याग कमी झाले, त्यामुळें त्या प्रीत्यर्थ होणारा पशुवध ही बंद झाला. बुद्धाची मूर्ती व दगोबा ह्यांच्या पूजेस अनुसरून "महादेव" "विष्णु" व "गणपती" ह्या देवतांची मूर्ति पुजा प्रचारांत आली; व शंकराचार्यांनीं भिक्षु भिक्षुणीं ह्यांच्या संस्थे सारखी मठ-संस्था प्रचारांत आणिली. ह्या प्रमाणें जुना वैदिक धर्म व बौद्ध धर्म ह्या दोन विरोधी शक्तीपासून हल्लींचा ब्राह्मण धर्म हें फळ अस्तित्वांत आलें. ह्या प्रमाणें बौद्ध धर्मांतील ग्राह्य भाग विरुद्ध पक्षानें घेतल्यामुळें, बौद्ध धर्माचें हिंदुस्थानांतील काम बहुतेक संपलेंच ! आणि त्यामुळेंच जणु काय बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून नाहींसा झाला. तथापि सिंहलद्वीप, ब्रह्मदेश, सियाम, चीन, कोरिआ व जपान ह्या देशांत त्या धर्माचा फैलाव ह्या काळा नंतर बराच झाला. जगांतील एकंदर प्रजेपैकीं $\frac{1}{3}$ प्रजा हा धर्म पाळीत आहे तथापि ह्या धर्माच्या माहेर घरीं हा निव्वळ नामशेष होऊन रहावा व ह्याच्या वैभवाची स्मृति विहार, चैत्य किंवा स्तूप ह्यावरून मात्र व्हावी ह्या गोष्टींचा विचार मनांत आला ह्मणजे मनुष्य क्षणभर दैववादी बनतो ! असो. ह्यावरून ह्या लेण्यांचा उपयोग बौद्ध युगांत कसा होत असेल ह्या संबंधानें आपणास अटकळ बांधण्यांत येते. त्याच प्रमाणें हीं लेणीं ज्या काळांत कोरलीं गेलीं त्याचें ही अनुमान करतां येतें. असो. आतां आपण लेण्यांकडे वळूं या.

पुढें चालूं.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य १ शके १८२५

---

## राजगुह्य स्फोट कायदा.

हल्लीं अमलांत असलेल्या राजगुह्य स्फोट कायद्यांत कांहीं सुधारणा करण्याचें हिंदुस्थान सरकारच्या मनांत घाटत आहे व ह्याच हेतूनें सरकारच्या मनांतून सदर्हु कायद्यांत ज्या सुधारणा कर्तव्य आहेत त्यांचा लार्ड गेल्या महिन्याच्या २८ व्या तारखेस हिंदुस्थान सरकारच्या विधायक मंडळापुढें विचारा करितां मांडला गेला त्यामुळें ह्या सूचनां संबंधानें एतद्देशीय वर्तमानपत्रकर्त्यांना आपलें मत कळविण्याची संधी मिळाली आहे. आमच्या मतें हल्लींच्या कायद्यांत सरकारानें सुचविलेल्या सुधारणा शेरीक केल्या असतां त्यांपासून वर्तमानपत्रकर्त्यांच्या स्वातंत्र्यास जबरदस्त धक्का बसणार आहे. खुन, चोरी वगैरे भयंकर गुन्ह्याची चौकशी सुरूं असता कायद्याच्या दृष्टीनें आरोपी हा निर्दोषी आहे असें गृहीत मानण्यांत येत असतें, व ते ते गुन्हे करतांना त्याचा हेतु अप्रामाणिक होता ही गोष्ट फिर्यादीनें शाबीत करावी असा हल्लींच्या कायद्याचा नियम असून तो राजगुह्य स्फोट कायद्यात मात्र लागूं नाहीं असें सरकारचें मत दिसतें; कारण राजगुह्याची बातमी मिळविण्याबद्दल ज्या इसमावर खटला करण्यांत येईल, त्याचा हेतु सदर्हू माहिती मिळविण्यांत अप्रामाणिक होता ही गोष्ट शाबीत करणें असाध्य असतें ह्या सबबीवर तो हेतु शाबीत करण्याची अवश्यकताच नाहीं अशा तऱ्हेचा बदल हल्लींच्या कायद्यांत करावयाचा आहे! त्याचप्रमाणें सदर्हु माहिती मिळविण्यास परवानगी होती किंवा नाहीं ही गोष्ट आरोपीस मात्र माहीत असण्याचा संभव आहे. ह्या हेतूनें सदर्हू परवानगी शाबीत करण्याचा बोजा आरोपीवरच लादण्याचा सरकारचा हेतु दिसतो !! ह्यामुळें आरोपीनें सदर्हू बद्दल योग्य पुरावा न दिल्यास तो अपराधी आहे असें समजण्यांत येईल. एतावता ह्या दोन्ही सूचना अमलांत आल्या असतां वर्तमानपत्र कर्त्यांना आपला धंदा चालविणें हे मोठें कष्टाचें काम होणार आहे त्याच प्रमाणें आज पावेतों लष्कर व आरमार ह्या खात्यांतील मात्र गुह्य बातमी मिळविली असतां गुन्हा होत असे परंतु ह्यापुढें ह्या कायद्याची व्यापकता वाढणार आहे ह्मणजे मुलकी, दिवाणी, फौजदारी वगैरे हरएक खात्यांतील बातमी मिळविली असतां किंवा तसें करण्याचा प्रयत्न केला असतां ही सदर्हू कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा घडला असें समजण्यांत येईल. ह्या योगानें सरकारी अधिकाऱ्यांना मात्र दुटप्पी वर्तन ठेवण्याची संधि मिळेल अशी आह्मांस भीति वाटते; कारण आज पावेतों बाहेर त्याचें जें वर्तन असतें, व सरकारी कागदपत्रांतून त्याच प्रश्ना संबंधानें त्यांनीं जे जे विचार प्रसिद्ध केले असतात त्यामध्यें एकवाक्यता आहे किंवा नाहीं हें पहाण्याची संधि जनतेला मिळत असे परंतु ह्या पुढें सरकारी कागदपत्रांतून त्यांनीं प्रसिद्ध केलेलें मत हें राजगुह्य पदास चढल्यामुळें त्यांना लोकमताची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ही स्थिति निदान सुधारलेल्या राष्ट्रास शोभणार नाहीं असें आमचें मत आहे. अशा तऱ्हेचा कायदा एकाद्या पौर्वात्य जुलमी राज्याच्या अमदानींत झाला असता, तर त्या बद्दल कोणास आश्चर्य वाटलें नसतें. परंतु हल्लींचे व्हाइसराय साहेब हे लोकमताला योग्य मान देतात व लोकमत जागृत करण्या सारखें पुण्य काम ज्यांनीं अंगीकारिलें आहे अशा वर्तमानपत्र कर्त्यांबद्दल त्यांचा बराच आदर आहे अशी त्यांची ख्याती असतांनां त्यांच्याच कारकीर्दीत अशा तऱ्हेचा बदल करण्याची सूचना निघावी हें मोठें आश्चर्य होय! ह्याबद्दल वर्तमान पत्र कर्त्यांनीं इतर हिंदी प्रजेच्या रिवाजास अनुसरून, आपल्या दैवासच दोष दिला पाहिजे। असो. ह्या कायद्यांत सुधारणा करण्या संबधानें ज्या सूचना केल्या आहेत त्यांपैकीं वर्तमानपत्र कर्त्यांच्या स्वातंत्र्यास विशेष विघातक अशी एक सूचना आहे तिचा उल्लेख ह्या प्रसंगीं करणें जरूर आहे. ह्या कायद्याच्या कलमा अन्वयें जो गुन्हा घडेल त्यांत वारंट वांचून आरोपीस पकडतां यावें व त्याला जामिनावर मोकळा सोडण्यात येऊं नये अशा आशयाचें कलम नवीन कायद्यांत शरीक होणार आहे! पोलीस अधिकाऱ्यानें किंवा खानगी इसमानें आरोपीस पकडल्यानंतर त्यानें त्यास जवळच्या लष्करी अधिकाऱ्याकडे किंवा ह्या कामा निमित्त सरकारानें नेमलेल्या अधिकाऱ्या पुढें हजर करावें. सदर्हु आरोपी विरुद्ध खटला करण्यात दाखील नाहीं असें सदर्हु अधिकाऱ्याचें मत झाल्यास, त्याला तावडतोब सोडून देण्यांत येईल परंतु खटला करावा असें त्याचें मत झाल्यास सदर्हु आरोपीस पोलीसच्या अटकेंत दिलें जाईल व इतर गुन्ह्यां प्रमाणें त्याची चौकशी मॅजिस्ट्रेट पुढें करण्यांत येईल. मॅजिस्ट्रेट पुढें त्याजवर खटला करण्यापूर्वीं स्थानिक सरकारची परवानगी मिळविली पाहिजे; ह्मणजे गुन्हा केला असा संशय आल्याबरोबर आरोपीस तावडतोब पकडण्याचा कायद्यानें अधिकार देण्यांत येणार आहे; व पुढें लष्करी अधिकारी किंवा मुद्दाम नेमलेले अधिकारी ह्यांनीं त्यास न सोडल्यास, त्याला सदर्हु खटला करण्याबद्दल परवानगी मिळे पर्यंत आपलें आयुष्य आरोपीच्या पिंजऱ्यांत घालवावें लागणार ! ह्या पद्धतीनें आरोपीवर जो खटला करावयाचा तो शुष्क असल्यास, त्याला लवकर अटकेंतून सुटता येईल असें सरकारचें ह्मणणें आहे. परंतु वस्तुस्थिति ध्यानांत आणिली असतां, लष्करी किंवा मुद्दाम नेमलेले सरकारी अधिकारी आरोपीस सोडून देण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतील किंवा नाहीं ह्या बद्दल संशय आहे. सेशन कोर्टात ज्या गुन्ह्याची अखेर चौकशी व्हावयाची असते अशा कित्येक खटल्यांत कमिटिंग मॅजिस्ट्रेट पुढें झालेला पुरावा सबळ नसला तरी आरोपीस सोडून देण्याची जबाबदारी सदर्हू मॅजिस्ट्रेट घेत नाहींत हें ज्यांच्या अवलोकनांत आलें असेल त्यांना आमचें ह्मणणें सहज खरें वाटेल. ह्या कायद्यास भयंकर स्वरूप दिल्या पासून, वर्तमानपत्र कर्त्यांच्या स्वातंत्र्यास हरताळ लागण्याचा संभव आहे. कित्येक प्रसंगीं जें राजगुह्य कळलें असेल त्यांत थोडी कल्पनासृष्टीची भर घालून तयार केलेला मसाला वाचकांपुढें मांडण्यात येईल; ह्या वल्लप्तीनें कायद्याच्या कचाटींतून सदर्हु लेखक सुटेल ही गोष्ट खरी परंतु निराळेंच अनिष्ट उद्भवेल! कित्येक प्रसंगीं जी बातमी हिंदुस्थानांतील वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करतां येत नाहीं ती विलायतच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत जाईल; ह्या सरकारच्या कृत्यानें विलायतेंत निघत असलेल्या कांग्रेस पक्षाच्या "इंडिआ" पत्राचें महत्व सहजच वाटेल ही मात्र आनंदाची गोष्ट होय. ह्या प्रमाणें वरील प्रकारच्या सुधारणा हल्लींच्या कायद्यांत केल्या पासून वर्तमान पत्रकर्ते, सरकारी अधिकारी व त्यांची राज्यव्यवस्था ह्या सर्वांचे अवहित होणार आहे तेव्हां अशा तऱ्हेचा अनिष्ट कायदा पसार होणार नाहीं असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

## प्रयाण.

सुखकर समागम सुटतो तेव्हां बाहेर जात असलेल्या अधिकाऱ्याचे सद्गुण डोळ्यापुढें उभे राहतात. तेव्हांच आपण गोळाबेरजेनें फलाणा गृहस्थ बाराव ईट ठरवितो. रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर हे मलकापुरास बदलले पण त्यांच्या त्या बदलीला आमचें

मन रुकार देईना. हे जुने अधिकारी आहेत. त्यांचा परिचय या जिल्ह्याशी बारा वर्षांपासून अधिक निकट आहे. यांचा अधिकार मोठा पण तो कोणाला जड वाटला नाहीं. उलटें, त्यांच्या अधिकाराला त्यांच्या गुणांनी मोठी शोभा आहे. स्वभाव फार गोड असून नियमितपणा, उद्योग व प्रामाणिकपणा हे त्यांचे मोठे सद्गुण आहेत. ते केव्हां काय करितात हें पाहून कोणीही आपलें घड्याळ दुरुस्त करावें. त्यांचा उद्योगीपणा पाहून लोक त्यांस यंत्राची उपमा देतात. कोणाचें अकल्याण करूं नये, व कोणाला दुखवूं नये असें त्यांचें मुख्य धोरण आहे. शिष्टाचार हे फार पाळतात व हसून खेळून हे काम करितात. यांस जसा जो सरळ मार्ग दिसेल तसा ते न्याय देतात. गोष्ट चटकन कापण्याकडे दृष्टी विशेष असते. अव्यविचारी यांस वादीचे न्यायाधीश ह्मणतील परंतु व्यवहारांत एकंदरीनें यांचेच निवाडे चांगले ठरतील. हे गरिबीची ओळख थोडी अधीक करून घेतील तर यांच्या कार्यदर्शीर निवाड्यांत न्यायाचे रंग अधीक खुलतील. गुन्हेगाराला शिक्षा देतांना हे फार कडक असतात. सार्वजनिक कार्यांत हे नेहमी दक्ष असतात. यांच्या शब्दाला आकोला जिल्ह्यामर फार मोठा मान आहे. मुनसिपालिटी, काटन मार्केट, लायब्ररी इत्यादि संस्थांत हे चांगले चालक आहेत. सरकारी कामा प्रमाणेंच हे सार्वजनिक कार्य परिश्रमानें व नियमानें करितात. येथील काटन मार्केट इतका चांगला होण्याचें पुष्कळसें श्रेय त्यांच्याकडे आहे. मुनसिपालिटीला हे आपल्या अनुभवाचा व नियमित कार्यक्रमाचा लाभ नेहमी देत असत. येथील मित्रसमाजाची स्थापना यांच्या तीर्थरूपांनीं केली पण तिची सुंदर, रमणीय व भव्य इमारत ही यांच्याच श्रमानें उभारलेली आहे. यांचें खानगी वर्तन बाळबोध आहे. फार प्रेमळपणानें सर्वांशी वागतात. हे मितव्ययी आहेत. टापटीप अगदी विलक्षण आहे. कॉलेजात हे जरी थोडे दिवस पर्यंत होते तरी कामाच्या रावतपानेंच हे चांगले विद्वान प्रवीण झाले आहेत. विचारा उदार असून सुधारणेच्या मार्गाचे आहेत. यांनी आपल्या चिरंजीवाच्या लग्नाबद्दल हुंडा ह्मणून घेतला नाहीं. सगळा गुणलुब्ध असतात तेव्हां असा निर्व्यसनी व सद्गुणी गृहस्थ धनवान व भाग्यशाली आहे हें शब्दानें पुनरुक्त करण्याची गरज नाहीं. पुनरागमनायच असें ह्मणून आह्मी यांस मलकापुरास जाण्याचा निरोप देतों.

---

## प्लेगाच्या देवी

प्लेगाच्या देवी काढण्याविषयीं कांहींसा प्रयत्न आकोल्यास चालू आहे. कांहीं शिपाई त्यावे राजी दिसले ह्मणून त्यांस देवी काढण्यांत आल्या. ज्याची प्रकृती निकोप असते त्याच्या डाव्या हातावर या देवी टोंचतात. अशक्त, काळजाच्या व्यथेच्या, संधिवाताच्या माणसांनीं या काढूं नयेत असें ह्मणतात. या देवींनें कांहीं दिवस हात लुळा पडतो. डाक्टर लोक या देवी काढण्या पूर्वी चांगली तपासणी करीत असतातच आणि तसें करण्याविषयीं त्यांनीं आळस करूं नये असें आह्मी मुद्दाम सुचवीत आहों.

## झोपडीं

### ( गरीब लोकांसाठीं )

प्लेगावर औषध ह्मणजे स्थानत्याग होय. गरीब लोकांस हा उपाय फार जड व असाध्य वाटतो ह्मणून मे. रुस्तुमजी साहेब व येथील प्रमुख मंडळीं गरीब लोकांसाठीं मोफत झोंपड्या बांधून देण्याच्या खटपटींत आहेत. या कार्यासाठीं पुष्कळशी वर्गणी जमा आहे आणि नवीन वर्गण्या जमा होत आहेत. धनवानांनीं उदार हस्त पुढें करावा. प्लेगाच्या वेळीं मे० रुस्तुमजी साहेब व म्युनसिपल मंडळी शहर सफाईच्या कामांत जितकी दांडगी मेहनत घेत आहेत तितकीच ते लोकांस उपदेश करून जंगलांत राहण्याविषयीं आग्रह करीत आहेत. पावसाळ्यामुळें मोठी निराशा होते पण त्याला इलाज नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 7 1903

The commercial policy of England is one of free Trade in her message to the world at large. The principle is at present undergoing vast changes. The new spirit is to restrict it with new limitations. The change is found necessary because the British commerce is at stake. The other nations and colonies have come to the front and have pushed competition so far as to eclipse the British commerce and to put it in the back—ground. There is a sure and certain tendency which means a decline of the British commerce. The empire has begun to lose its hold of the commercial supremacy and if the present state of affairs continue the future seems to be fraught with evils of unknown dimensions. The British Parliament intends to launch a new scheme of preferential tariffs and the whole intention is to regain for Greater Britain its old footing of industrial & commercial excellence. The English nation declares the policy of protection though history tells us that, by a successful policy of protection, England rose to the pre—eminent and topmost position in the ladder of nations. From that high eminence England dictated a policy of free Trade because it served her well in her first days of glory and advancement. For over a century and a half, the principle worked excellently well. The markets of the eastern world were opened for the English manufacture and commerce. India is thus the diadem in the British crown because she contributed to the manufacturing and commercial greatness of England. Free trade built up the fortunes of the English people whereas it brought to India evils of colossal dimensions. Though once a prosperous nation in the field of industry and commerce, India is now in the condition of chronic starvation and unrelieved dispair. If you put aside her vast agricultural wealth, India is purely a continent of consumption. She is dead as the industrial and commercial nation. In this connection, We confess that the British rule has brought home to us a dead lull to our activities. The nation is reduced to a slavery of consuming the articles of English manufacture. The development in the means of communications supply a province of consumption with cheap and suitable produce but if it does not develop the productive powers of the provinces of production and does not augment the variety and extent of home—markets the civilized appliances of communication ceased to enrol that nation in the catalogue of living nations.

The last famines have proved to the built that there is not so much a famine of food but a famine of wages. A famine of money rules supreme in India though her agriculture is a redeeming element in the gradual decline of our people. Agriculture continues, in a living formulæ, the body and soul of the nation. But without manufacturing industry, the national pulse will beat very slow and will in course of time cease to show signs of life and activity. The स्वदेशी movement must take up the task, if we hope to rise once more. The consumption of home—manufactures must be the essential tenor of our life. A liberal policy must be introduced to retain skilled workmen in order to teach them the new forms of skill. All this is possible if a policy of protection be enjoined. If the Government do not help us we must rise up to the emergency of the occasion and have a crusade against English goods. Free trade has been the cause of our ruin and let us hope to make amends for the mistakes in the past.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस पुष्कळ झाला. पिकांची वाढ ज्या जोमानें व्हावी त्या जोमानें होत नाहीं. कांहीं दिवस पाऊस थांबेल तर ठीक! प्लेगाचा रोग वाढत आहे. सार्वजनिक असमाधानकारक आहे. एक दोन दिवस मंदावल्या सारखें वाटतें परंतु पुन्हा एकदम ४।५ मृत्यु होतात. प्लेगाचें बीज अकोल्यास रुजलें आहे यांत शंका नाहीं.

काल सायंकाळीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचा गृहशिक्षणावरील निबंध वाचण्यांत आला. विषयाची मांडणी फार मनोहर आहे. हा निबंध सर्वांनीं अवश्य वाचावा.

उमरावतीला प्लेगाचें मान दररोज ४३ मृत्यूवर चढलें आहे. आकोटाला प्लेग पुनः वाढला आहे. वाशिमाला प्लेगाचा क्रम चालूच आहे. आकोल्याला देखील प्लेगाचे मृत्यु नित्यशः होऊं लागले आहेत.

एक्स्ट्रा असि. कमिशनरच्या बदल्या खालील प्रमाणें झाल्या आहेत:—

| रा. रा. | स्थळ |
|---|---|
| विश्वनाथ नारायण दांडेकर | मलकापूर |
| रंगनाथ विष्णु ढोकस | तेल्हारा |
| गोपाळ वामन बापट | आकोला |

गेल्या आठवड्यांत येथें गणेश उत्सवाची बरीच गंमत झाली. वतनदार छावण्यांत एकंदर मेळ्याचें संमेलन झालें. कसरती झाल्या. या उत्सवास सार्वजनिक स्वरूप बरेंच येत चाललें आहे. ज्यां मेळेवाल्यांचीं पदें उत्तम ठरलीं त्यांना त्यांच्या योग्यते प्रमाणें बक्षिसें देण्यांत आलीं. एकंदर मेळे सुमारें ७ होते. या सर्व गोष्टींचे श्रेय रा० रा० यज्ञेश्वर अनंत वैद्य यांजकडे आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८— |
| सोनें २४॥ | | चांदी ७३ |
| ज्वारी | ३०।३५।४० | जवस ९०-९५ |
| गहू | | ८९ ते १०० |
| बाजरी | | ५०।५१॥ |
| मीठ | ४।= | रु. मण |
| चणे | ३८— | रु. मण |
| तूप | ७॥ ८ | रु. मण |
| तेल | | ५८= रु, मण |
| रुई | | ९० |

### नोटीस

रा० रा० खंडेराव माधव देशपांडे तर्फे मुखत्यार गोपाळ माधव देशपांडे राहाणार आकोला यांसः—

या जाहिर लेखानें कळवितों कीं तुह्मी मला निजामपूर आकोलें येथील सर्व्हे नंबर ६ चें सालीम शेत ४०० रुपयांस विकलें आहे. त्या विक्रीबद्दल तुह्माला इसाऱ्याचे रुपये १२--८ आणे मी पूर्वीच दिलेले आहेत. ही रकम उणी करून बाकीचे रुपये मी अनामत ठेविले आहेत. तुह्मी खरेदीखत लिहून नोंदून दिलें नाहीं. खरेदीच्या दिवसा पासून शेत माझ्या ताब्यांत आहे. या शेतावर आणि दुसऱ्या इतर शेतावर मिळून राजश्री जानकीराम गंगाधर साहू दुकान आकोला यांचा गहाणाचा हुकूमनामा झालेला आहे. तर माझ्या शेतावरील गहाणाचा बोजा दूर करावा ह्मणजे सावकाराकडे ठेविलेले अनामत रक्कम तुह्मास देतो. ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत गहाणाचा हक्क दूर करून खरेदीखत लिहून नोंदून द्यावें आणि आपली रक्कम चुकती घेऊन जावें. असें करण्यास चुकल्यास रिती प्रमाणें फिर्याद करून योग्य ती दाद मिळविण्यांत येईल. कळावें. ही विनंती. तारीख ५ माहे सप्तेंबर सन १९०३ इसवी.

(सही)
शेख रमजान वल्द महमद
हयात बकर कसाई
दस्तूर खुद्द.

## वर्तमानसार

मुंबई इलाख्याच्या गव्हरनरच्या जागीं लॉर्ड लॅमिंगटन यांची नेमणूक झाली आहे. मि. लीवार्नर यांची स्वारी गव्हरनर होऊन इकडे आली नाहीं ही या इलाख्यांतील लोकांवर ईश कृपाच होय.

बेरूट येथील अमेरिकन वकिलाचा खून झाल्यामुळें अमेरिकन सरकारनें फौज तिकडे तावडतोब रवाना करण्याविषयीं हुकूम दिले आहे.

प्रत्येक जाणाऱ्या येणाऱ्या गव्हरनरांना मानपत्र देणाऱ्या मुंबईच्या लोकांनीं एक कायमचाच फंड उभारून प्रत्येकाचे दगडी पुतळे तयार करवावे म्हणजे वरचेवर याद्या फिरविण्याचें काम पडणार नाहीं. गव्हर्नर साहेबांची कारकीर्द सुखावह झाली किंवा त्रासदायक झाली याचा जर विचारच करावयाचा नाहीं तर कायमचाच फंड तयार करण्यास काय हरकत आहे? लॅंडरिव्हिनियु बिलाचे वेळीं जे सभासद आपल्या मानहानी मुळें उठून गेले त्यानींच अशा मंडळींत अग्रसरत्व पतकरावें हें मोठें आश्चर्य आहे. लार्ड नाथकोर्ट सारखा देखील दयाळू व उदार गव्हरनर विरळा! कोणतीहि कारकीर्द संपून पांच दहा वर्षे होईपर्यंत पुतळ्याचा प्रश्नच हातीं घेऊं नये!

ज्या वेळेस पावसाच्या अतिवृष्टिमुळें निजाम सरकारची रेल्वे कांहीं दिवस अनियमित झाली त्यावेळीं त्या रेल्वेस दर आठवड्यास १ लाख रुपये प्रमाणें तोटा सोसावा लागला.

ट्रान्सफर ऑफ प्रापर्टी आक्टाच्या दुरुस्तीचें बील कायदेकौन्सील पुढें येणार आहे. स्थावर जिनगीची सर्व गहाणखतें व भाडेपट्टा मग ते कितिहि रकमेचे असोत राजिस्टर झालेच पाहिजेत आणि लागणीचा तोंडी करार असेल तर जमीन लागणदाराचे ताबडतोब कबजांत दिली पाहिजे अशी दुरुस्ती होणार आहे.

रशियाचे राज्यांत पेत्रोव्हस्कोई नांवाच्या शहरीं भयंकर आग लागून ५०० घरें, दोनशें वखारी, व १० बोटी जळून जाऊन २॥ लक्ष पौंडाच्या वर किंमतीचे मालमत्तेची नुकसानी झाली.

थर आणि पारकरचे डेपुटि कमिशनर मि. मेकंझि यांचे मुनशी शहा महमद यांनीं आपल्या वरिष्टाकडे एक मुखत्याराची सनद मिळावी म्हणून अर्ज पाठवून त्याबरोबर ५०० रुपयांची नोट ठेविली होती, त्याबद्दल त्यांचेवर खटला होऊन त्यांस ४ महिन्याची कैद व ५०० रुपये दंड या प्रमाणें शिक्षा झाली.

प्लेग व कॉलऱ्याचे दिवसांत झोपड्यांचे ऐवजीं तंबूंत राहण्याची सोय मुंबई इलाख्यांतील सर्व जिल्ह्यांतील पोलिसांना करून देण्याबद्दल मुंबई इलाख्याच्या इन्स्पेक्टर जनरल साहेबांनीं सरकारकडे शिफारस केली होती. व ती सरकारनें मंजूर केली. वऱ्हाडांतील अधिकारी या प्रमाणें कांहीं करणार आहेत काय!

प० लो० व्हिक्टोरिया मेमोरियलची इमारत आणखी २ वर्षे सुरू होत नाहीं कारण ती ज्या ठिकाणीं बांधावयाची आहे ती जागा तुरुंगानें अडविली आहे सबब तुरुंगाची दुसरीकडे सोय केल्यावर मग त्या जागीं ही इमारत होण्यास आरंभ होईल.

मि. कुवरजी डोसाभाई यांनीं पुण्यापासून महाबळेश्वरपर्यंत मोटार गाड्या चालविण्याची कंपनी काढली आहे. ५०० रुपयाचा एक प्रमाणें ३०० भाग काढून १॥ लाख रुपये भांडवल जमविलें आहे.

मुंबईच्या भेंड्यांनीं मेळे विरोधी मंडळी असे नांव धारण करून मेळेवाल्यास सवाल केले आहेत, ते इतके शुष्क आहेत कीं त्यांचा विचार करणेंच सोडून द्यावें. दिव्याचा प्रकाश अंधारामुळेंच समजतो. रा. टिळकांची योग्यता त्यांचे निंदकांच्या प्रयत्नामुळेंच अधीक अधीक वाढत चालली आहे. तद्वत मेळे पुष्कळ व्हावे अशी परमेश्वराचीच इच्छा असल्यास त्यास भेंड्या मोपळ्यांनीं प्रतिकार करण्यास तयार झालेच पाहिजे. या अर्थानें पाहिलें असतां त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे!

खासगी व सरकारी शाळेंतील फी योग्य असली पाहिजे. फी अगदीच कमी करून अयोग्य स्पर्धा शाळांच्या व्यवस्थापकांनीं सुरू करूं नये असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

एडनहून उत्तरेकडील सरहद्दीवरील छावणीकडे इंग्रजी शिपाई अन्न सामुग्री घेऊन जात असतां, त्यावर अरबांनीं छापा घालून रसद लुटून नेली.

गेल्या आठवड्याच्या काळाच्या अंकांत उमरावतीहून चित्रगुप्त या सहीनें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. उमरावतीस सुशिक्षित लोकांच्या मुलींचा नाच बक्षिस समारंभाचे वेळीं परकीय लोकांपुढें झाला असें त्यांत ध्वनित केलें आहे. सामाजिक सुधारणा पाहिजे परंतु ती अशा गोष्टींत नको. असें कित्येकाचें मत आहे. ज्या हिंदु कुलीन स्त्रियांचें नख दिसण्याची पुर्वीच्या दिवसांत मारामार असे, त्यांच्याच वंशांतील मुलींनीं आपल्या अंगविक्षेपानें परकीयांना खुष करण्यांत आनंद मानावा ही काळाची विचित्र गती आहे. दुनिया झुकती है. झुकनेवाला चाहिये.

काँग्रेस सभेच्या अध्यक्षाचा मान सर्व प्रांतांतील सुशिक्षित लोकांपैकीं एक दोघांना मिळालेला आहे. पंजाब व वऱ्हाड या प्रांतास मात्र तो मिळालेला नाहीं. यंदाचा मान पंजाबांतील सुप्रसिद्ध हरिकीसनलाल, बी. ए. बार-एट-लॉ, यांना मिळावा अशी सुचना बंगाली पत्रांत झाली आहे.

व्हियेन्ना येथें राजेसाहेबांची स्वारी गेली असल्यामुळें फार जारीनें त्यांच्या स्वागताची तयारी सुरू आहे. या ठिकाणीं इंग्लंडचा राजा पुर्वीं कधींहि गेला नव्हता ह्मणतात.

गेल्या शनवारीं विलायती डाकेच्या गाडींत क्रील येथें एकाएकीं विस्तवानें पेट घेतला, त्यामुळें ३९ टपालांच्या पिशव्या जळून खाक झाल्या; व तितक्याच साधारण होरपळून निघाल्या.

ता. ३१ रोजीं कोल्हापूरचे महाराज व कागलचे महाराज पुण्यास गाडींतून चालले असतां घोडा बुजून गेल्यामुळें गाडी पोलीस चौकीवर जाऊन आदळली. कागलचे महाराजास थोडीशी इजा झाली आहे.

कचरचे सेशन्स जज्ज यांनीं नि. वेन चहाच्या बागेचे मॅनेजर याला एका मजुरास दुखापत केल्याच्या आरोपावरून ६ महिन्याची साधी कैद सुनाविली होती. परंतु हायकोर्टानें त्याला सर्व आरोपांतून निर्दोषी करून सोडून दिलें!

मुसलमानी स्त्रियास शिक्षण देण्याविषयीं पुण्यास एक स्त्रियांची सभा भरली होती. गोषांतील स्त्रियांस हें शिक्षण देण्यास फार त्रास पडेल, या विषयींची कल्पना त्यांच्या मनांत कशी आली नाहीं कोण जाणें!

डा. विस्चॉफ यांना निलगिरीच्या पहाडांत शिकार करण्याचा पास होता परंतु तो निलगिरीचे कलेक्टरनीं रद्द केला म्हणून मि. विसचाफ यांनीं सरकारावर ५०० रुपयांचा दावा केला आहे.

जमाइका बेटांत भयंकर तुफान होऊन लोकांच्या मालमत्तेचें अतिशय नुकसान झालें, पुष्कळ जहाजें फुटून गेलीं पुष्कळ उसाचे मळे उद्ध्वस्त झाले. एकंदर नुकसान ५००००० पौंड झालें.

व्हेसुवियस ज्वालामुखीचा पुन्हां स्फोट होऊन अतिशय नुकसान होत आहे. पुष्कळ लोक उघडे पडले आहेत. व पुष्कळ लोक त्याना मोठ्या उदारपणानें देणग्या देत आहेत.

पुण्यांत ग्रामण्य करणारांस शांडिल्य गोडाऱ्यानें सुधारकांत १९ सवाल विचारले आहेत; व १९ सवालांत नमुद केलेल्या गोष्टी जर राजरोस होतात तर पुनर्विवाहितांशीं संबंध ठेवण्यांत काय हरकत आहे असें लिहिलें आहे; क्रमाक्रमानें एकापुढें एक गोष्टी मांडल्यास पर्यायानें गो (मास) खाण्यास, युरोपियनांशीं उघड उघड रोटी व्यवहार करण्यास, बबर्चीं कडून दररोजचा स्वयंपाक करण्यास, किंवा या पेक्षांही दुर्धर अशा गोष्टी घडवून आणण्यास, शांडिल्य गोडाऱ्याच्या मतानें अडचण पडणार नाहीं. गाईच्या चरबीचा अंश गाईचे दुधांत असतोच मग दुध काय व चरबी काय एकच असे कुतर्क काढणाऱ्यांना उत्तर न देणें हेंच ठीक नव्हे काय!

बांकीपूरच्या ज्योतिष्याचें भविष्य!!— बांकीपुरास पंडित रामप्रसाद शर्मा ऊर्फ ऋषीजी नांवाचा ज्योतिषी राहात आहे. त्यानें इंडियन मिरर पत्रास लिहिलें आहे!— 'येत्या सप्तंबर महिन्यांत ६ ग्रह वक्री होणार आहेत व त्या वेळीं खग्रास सूर्यग्रहण होईल; हें ग्रहण हिंदुस्थानांत कोठेंही न दिसतां दक्षिण ध्रुव प्रदेशांत दिसेल; तरी त्याचीं फळें सर्व जगास भयंकर रीतीनें भोंवतील; सातवे एडवर्ड बादशहा यांनीं आपल्या प्रकृतीस विशेष जपावें व आपल्या शत्रू विषयीं सावध राहावें!'

उदिनें स्टेशनवर एक मालगाडी व लष्करी गाडी यांची टक्कर होऊन ९ सोजीर ठार व ८० जखमी झाले. हें स्टेशन ऊत्तर इटालींत आहे.

हायपोस्कोप नांवाचें नवीन यंत्र—हें यंत्र मि. विल्यम बोल्टन नांवाच्या मनुष्यानें तयार केलें आहे. हलक्या धातूची एक लहानशी चौकोनी नळी करून त्यांत त्यानें भिंगें बसविलीं आहेत. हे यंत्र बंदुकांस लाविलें म्हणजे, शिपाई खंदक वगैरेंत दडून किंवा कोणत्याही अडोशाचे मागें बसला असतांहि त्यास २००० यार्डावरचे पदार्थ स्पष्ट दिसतात व त्यावर नेम बिनचुक मारतां येतो!

काशीच्या महाराजांनवळचें फार किंमतवान व कारागिरीनें भरलेलें असें कांहीं सुंदर हस्तीदंती सामान लार्ड कर्झन यानीं घेतलें असें म्हणतात. या गोष्टीची वार्ता आजपर्यंत हिंदुस्थानच्या लोकांस मुळींच कळली नव्हती, पण ती आतां पार्लमेन्ट सभेपुढें येऊन इकडेही प्रसिद्ध झाली आहे. हा आरोप पार्लमेन्टचे मेंबर मि० मॅक्नील यांनीं आणला आहे. त्यांनीं त्या सभेंत स्टेट सेक्रेटरी यांस या संबंधानें एक प्रश्न केला असून त्याचा मतलब असा आहे कीं, त्या वेळच्या काशीच्या महाराजांनीं १८५७च्या बंडांत सरकारास मदत केल्याबद्दल सरकारानें त्यांस कांहीं हस्तीदंती जिनसा दिल्या असून त्या जिनसा लार्ड कर्झन यांनीं घेतल्या व त्यांच्या बदला महाराजांस एक लहानशी बंदुक मात्र दिली. हें खरें आहे काय? हें खरें असेल तर ते कायदेशीर आहे काय? त्याचें लिलाव झालें कीं नाहीं व त्या अजून कर्झन साहेबांच्याच ताब्यांत असतील तर त्या वस्तु परत त्या महाराजांस देण्यांत येतील काय?

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांस लार्ड नॉर्थकोट साहेबांनीं १००० रुपये दिले! अशा कामीं लाट साहेब बरेच उदार आहेत!

लार्ड नार्थकोट साहेबांस मानपत्र देऊन त्यांचें कायमचें स्मारक करण्याचा, त्यांच्या मित्र व चहाते मंडळींनीं विचार केला होता पण मुंबई इलाख्यांतील लोकांच्या सुदैवानें व त्या कंपनीच्या दुर्दैवानें लाट साहेबांनीं वरील दोन्ही गोष्टी करण्याचें सोडून देण्याविषयीं त्या कंपनीस सुचविलें आहे! बिचाऱ्यांची निराशा झाली! तरी एक पार्टी (मेजवानी) मात्र देण्यांत आली.

---

## स्त्रियांच्या शिवण कामाचें व इतर कामाचें प्रदर्शन.

यवतमाळ येथें येत्या दिवाळीच्या सुमारास कुशलतेचें प्रदर्शन भरविण्याचा विचार केला आहे. प्रदर्शनात पाठविलेल्या जिनसा पैकीं परिक्षकांच्या मतें ज्या जिनसा उत्तम ठरतील त्यांबद्दल तीन बक्षिसें त्या जिनसा करणारांस दिलीं जातील. बक्षिसाचे तीन वर्ग होतील. सदरहु बक्षिसें ठरविण्याची व्यवस्था तीन सभ्य स्त्रियांच्या कमिटी कडून केली जाईल त्यांचीं नांवें व बक्षिसांच्या रकमा मागाहून कळविण्यांत येतील. सदरहु प्रदर्शनास सर्व सभ्य स्त्रियाची मदत पाहिजे आहे. ती त्यांनीं वर्गणी द्वारा व प्रदर्शनाला जिनसा पाठवून करावी अशी त्यांस विनंती आहे जिनसा पाठविणें त्या चांगल्या व्यवस्थीत रितीनें पेट्यांतून बंद करून पार्सलानें पाठवाव्या जिनसा विकण्याच्या अगर पाठवावयाच्या ह्याबद्दल पाठविणारांनीं स्पष्ट खुलासा करावा. परत पाठविण्याच्या जिनसा काळजी पूर्वक पेट्यांत घालून ज्यांच्या त्यांच्याकडे पाठविल्या जातील व विकलेल्या जिनसांची किंमत ज्यांची त्यांच्याकडे मनीआरडरीनें पाठविली जाईल. जिनसा पाठविणें त्या सौ० वती रखमाबाई भट यांचे नांवें रा० गोपाळ नारायण भट वकील ह्यांचें घरीं अशा पत्यावर पाठवाव्या.

रेल्वे पार्सलानें पाठवावयाच्या जिनसा धामणगांव स्टेशन जी० आय० पी० रेल्वे नागपूर ब्रॅंच येथें पाठवाव्या.

सौ० पार्वतीबाई द्रवीड.
सौ० रखमाबाई भट.
सौ० राजूबाई नायडू.

REGISTERED No. N. 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० १
दर ओळीस..........८१ ०१
दुसरे खेपेस.... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

VOL XXXVII AKOLA MONDAY 14 SEPTEMBER 1903 NO 36

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १४ माहे सप्तंबर सन १९०३ इ० अंक ३६

## फर्दापुरचीं लेणीं.

( नंबर. २ )

लेण्यांच्या पायथ्याशीं वाघरा नदी वहाते हें पूर्वींच सांगितलेंच आहे. लेण्यांपासून जवळच वाघरा नदीचा धबधबा आहे. त्यास "सात कुंड" असें ह्मणतात. त्याची उंची सुमारें ७०।७५ फूट आहे. इतक्या उंचीवरून पाणी पडतानां पडणें मजेचें होईल परंतु उन्हाळ्याच्या दिवसांत नदीच्या पात्रांत पाणी नसल्यामुळें देखावा रुक्षच दिसणार! ज्या खडकांत हीं लेणीं कोरलीं आहेत तो खडक नदीच्या पात्रापासून सरळ पण २५० फूट उंच असून अर्धचंद्राकार असा पसरलेला आहे; व लेण्यांच्या समोरच्या बाजूला ह्मणजे वाघरा नदीच्या दुसऱ्या कडेला खडकाळ पण झाडझुडपांनीं आच्छादित असें डोंगराचें टोंक आलें आहे. ह्या लेण्यांनीं सुमारें १/३ मैल जागा व्यापलेली आहे; व हीं लेणीं नदीच्या पात्रापासून ३५ पासून १०० फूट उंचीवर आहेत; ह्यामुळें हीं लेणीं पहातानां डोंगर चढण्या उतरण्याचे विशेष श्रम होत नाहींत. ह्या डोंगरांत एकंदर २७ लेणीं आहेत त्या पैकीं २३ विहार असून बाकीचीं ४ "चैत्यें" किंवा बौद्ध धर्मानुयायांचीं देवळें आहेत. ह्यां पैकीं थोडीं दुभजलीं आहेत. ह्या लेण्याचें सर्व काम पुरें झालेलें नाहीं कारण कित्येक ठिकाणीं काम अपुरेंच राहिलेलें दिसून येतें. त्याचप्रमाणें लेण्यांतील कांहीं भागांचें काम इतर भागांहून भिन्न आहे, ह्यावरून हें सर्व काम एकदम झालें नाहीं हें उघड दिसून येत आहे. विहार ह्मणजे श्रमणकांना रहावयाच्या जागा होत अगदीं साधें विहार ह्मटलें ह्मणजे खडकांत कोरलेली एक कोठडी किंवा ओवरी होय! आंत एक लहानसा ओटा असतो त्याजवर श्रमणकानें विश्रांती घ्यावयाची. पुढें कालान्तरानें एका रांगेनें पांच सहा कोठड्या वरील प्रमाणेंच वाढून त्यांच्या समोर एक सोपा काढण्यांत आला. हे विहार हल्लींच्या आंग्ल सैनिका करितां बांधलेल्या घरांच्या रांगे प्रमाणें होत. परंतु पुढें अशाच तीन बाजूनीं तीन रांगा व चवथ्या बाजूनें दालन असा एकच विहार करण्याचा प्रघात पडला. अशाच तऱ्हेचे विहार अजिंठ्याच्या लेण्यांत दृष्टीस पडतात. विहाराच्या दालनांत उभें राहिलें असतां समोर बुद्धाची मूर्ती असून बाकीच्या दोन बाजूनीं व मूर्तीच्या मागच्या बाजूस सर्व ओवऱ्या आहेत व मध्यें बऱ्याच खांबांचा एक मोठा सभामंडप असतो विहाराच्या आंतील भागाचें काम अगदीं साधें आहे. दरवाजे व खिडक्या ह्यांवरील काम मात्र बरेंच नकशीचें आहे; फक्त एका विहाराच्या सर्व दर्शनी भागावर नकशीचें काम काढण्यांत शिल्पकारानें आपलें कौशल्य खर्च केलें आहे.

चैत्यांचें बाह्यांग विशेष दर्शनीय नवतें; परंतु बाहेरील दरवाजावर व आंतील भिंती खांब व दगोबा ह्यावर बरेंच खोदीव काम दृष्टीस पडतें. दरवाजांतून आंत गेल्याबरोबर समोर दगोबा व मोठें दालन लागत असून दोन्हीं बाजूना दोन मोठे सोपे लागतात. मधल्या दालनांची लांबी रुंदी बहुशः २ - १ ह्या प्रमाणांत असते; हें प्रमाण दिसण्यांत सुबक दिसतें सर्वांत मोठें जें दालन आहे त्याची लांबी रुंदी अनुक्रम ९४॥ फु व ४१ फुट आहे. लेण्यांची व्यवस्था ठेवण्या करितां जो नोकर ठेवलेला आहे त्यानें "दगोबा" हें राणीचें तुळशी वृंदावन असल्याचें आह्मास सांगितलें ! मनुष्य हा कुपमंडुक असून, त्याचे विचार त्याच्या नेहमीच्या व्यवहारा बाहेर सहसा जात नाहींत ह्या तत्त्वाची आठवण होऊन, त्या गरीब मनुष्याच्या अज्ञानाची आह्मांस कींव आली. चैत्यांच्या आंतील भागातील भव्य महिरापी प्रेक्षणीय आहेत. वरील महिरापीस टेका देण्याकरितां, खालून लांकडाच्या किंवा लांकडा प्रमाणेंच केलेल्या दगडाच्या कमानी जोडल्या आहेत. चैत्यांच्या आंतील भागात जें विशेष प्रेक्षणीय असेल तें पहाणाऱ्याच्या एकदम नजरेस यावें ह्या हेतूनें चैत्यांच्या दर्शनी भागाच्या वरच्या बाजूनें किंवा कित्येक मध्येंच एखादा झरोका पाडून त्या द्वारें प्रकाश आंत घेण्याची विलक्षण सोय केली आहे. विहारांच्या बाहेरील भागावर व चैत्यांच्या आंतील भागावर जें खोदीव काम दृष्टीस पडतें तें विशेष उच्च प्रकारचें नाहीं तथापि साधारणपणें तें बरें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांत बुद्ध किंवा बौद्ध गुरु निरनिराळीं आसनें घालून आपल्या शिष्यांनां शिक्षण देत आहेत असें दर्शविलें आहे. कित्येक चित्रात मात्र बीभत्स देखावे दाखविले आहेत. उ० एका चित्रांत एक वृद्ध दाढीवाला ऋषी एका तरुणीशीं रत झाला आहे असें दाखविलें आहे. अशाच तऱ्हेचीं दुसरीं कित्येक चित्रें तेथें आमच्या दृष्टीस पडलीं तीं चित्रें 'चैत्या' सारख्या पवित्र ठिकाणीं काढण्यांत शिल्पकाराचा हेतु काय असावा ह्या संबंधानें मात्र आमची अक्कल गुंग होऊन गेली ! कारण सदाचरणा विषयीं बेफिकीर असलेल्या एखाद्या हिंदु ऋषीची विटंबना करण्याच्या हेतूनें सदर्हू चित्र काढलें असावें असें ह्मणावें तर अशा चित्रापासून तरुण विद्यार्थ्यांच्या कोमल मनावर काय अनिष्ट परिणाम होतील ह्या गोष्टीचा विचार त्या काळच्या लोकांनीं केला असेल हें संभवत नाहीं! ह्या शिवाय गौतम बुद्ध मरणवयास टेकला असतां, त्याचे शिष्य- भिक्षु, भिक्षुणी व स्त्री आणि पुरुष उपासक ह्याच्या भोंवतीं विलाप करीत आहेत ह्या प्रसंगाचें चित्र खोदलेलें आहे तें प्रेक्षणीय आहे. गौतम बुद्धानें आपल्या हयातींत आपली छाप कशी बसविली होती ह्या संबंधाची कल्पना ह्या चित्रावरून सहज करितां येईल. ह्या लेण्यांपैकीं १९ नंबरच्या लेण्यांत विष्णु व लक्ष्मी ह्या देवतांच्या मूर्ति दृष्टीस पडतात सहा—तुडी शेष व चौरी ढाळणारा सेवक ह्या दोन चिन्हांवरून त्या मूर्ती विष्णु व लक्ष्मी ह्या देवतांच्याच आहेत ह्या विषयीं शंका रहात नाहीं ह्यावरून असं दिसून येतें कीं ह्या मूर्ती बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्या नंतर ह्मणजे अलीकडील ब्राह्मण धर्माच्या काळांत कोरल्या गेल्या असल्या पाहिजेत. ह्या लेण्यांतील कोरीव चित्रांपेक्षां कार्ले येथील लेण्यांतील चित्रें जास्त दर्शनीय आहेत परंतु ह्या लेण्यांतील विशेष फरक हा आहे कीं येथें जशीं रंगी चित्रें काढलेलीं दिसतात तशीं हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही लेण्यांत दिसून येत नाहींत. हें रंगीत चित्रांचें काम बहुतेक चैत्यांतील भिंती व कडीपाट ह्यांजवर मात्र केलेलें दिसून येतें. भिंती व कडीपाट हे पाषाणमय असल्यामुळें, प्रथमतः त्यांवर एक प्रकारचें मातीचें सारखें लुकण देऊन मग त्यावर पक्या रंगाचें नकशीचें वगैरे काम काम केलेलें दिसून येत आहे. ज्या मातीचें लुकण तयार करीत असत, ती माती कोठून आणीत असत ह्या संबंधाची माहिती आज उपलब्ध नाहीं. परंतु कित्येक भुयारांतून जो एक प्रकारच्या पिवळ्या मातीचा ढीग दिसून येतो त्याच मातीचें तयार करीत असल्यास न कळे; आमच्या एका मित्राच्या मतें तो मातीचा ढीग पावसानें आलेल्या गाळापासून झाला आहे. ह्या प्रमाणें ज्या माती पासून लुकण तयार होत असे तिचा शोध लागला अशी जरी आपल्या मनाची समजूत करून घेतली तथापि ज्या रंगांनीं हीं चित्रें काढलीं आहेत ते रंग कसे तयार करीत असत ह्या संबंधाची माहिती मुळींच उपलब्ध नाहीं. हीं चित्रें काढल्यास आज जरी २००० वर्षांवर काळ होऊन गेला आहे तरी त्या चित्रांचे रंग अगदीं ताजे दिसत आहेत. पक्के रंग तयार करण्याची विद्या जर आपणांस २००० वर्षां मागें इतक्या चांगल्या रीतीनें अवगत होती तर आज तारखेस ती नामशेष होऊन रहावी ह्या बद्दल प्रेक्षकास खेदाश्चर्य वाटल्या वांचून रहात नाहीं! निरनिराळ्या पक्या रंगांचीं जीं चित्रें काढिलीं आहेत. त्यांत महेरापी, वर्तुळें, व निरनिराळ्या प्रकारचीं साधीं व मिश्र कमळें ह्यांच्या आकृती प्रमाणांत काढलेल्या दिसून येतात. त्याच प्रमाणें व्यवहारांत रोज घडून येणाऱ्या गोष्टी चित्र रूपानें दाखविण्याचा प्रयत्न कित्येक ठिकाणीं केलेला दिसून येतो. राजदरबार, लग्न समारंभ, स्मशान यात्रा, लढाईचा प्रसंग, स्नानाविधी वगैरे रोज घडून येणाऱ्या प्रसंगाचे देखावे हुबेहुब आपणां समोर दिसतात व क्षणभर हीं चित्रें सजीवच आहेत कीं काय असा प्रेक्षकास भास होतो. रहदारीच्या रस्त्यावर गाड्या घोड्यांची गर्दी व त्याच प्रमाणें जाणाऱ्या येणाऱ्या इसमांची गर्दी ज्या चित्रांत दाखविली आहे तें चित्र पाहून अलिकडील चिताऱ्यानें काढलेल्या रस्त्याच्या चित्राची आठवण होते. त्याचप्रमाणें हत्ती, सिंह, वाघ ह्यांची शिकार वानरें, चिमण्या, घोडे, नाग व इतर पाळींव व रानटी जनावरें, मासे, जहाजें ह्यांची चित्रें हुबेहुब काढलेलीं दिसतात. एके ठिकाणीं तीन घोडे आडवे एकास एक लागून उभे केलेले दिसले. मग ते सर्व रथास जोडले होते कीं काय ह्याचा उलगडा त्या चित्रावरून होत नाहीं. ह्या चित्रांतील पुरुष व स्त्रिया ह्यांचे चेहेरे आर्य लोकांच्या चेहेऱ्या प्रमाणें आहेत. चित्रांतील स्त्रियांचा रुंदट पण सुंदर चेहरा, व त्यांचे लांबसडक केश व त्यांजवरील फुलांचा मुकुट हें पाहून प्रेक्षकाचे मन प्रसन्न होतें व त्यास ह्या प्रसंगीं आपल्या माझी दयाळु राणी सरकारची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं! त्याच प्रमाणें गौतम बुद्धाच्या चरित्रांतील भाग चित्र रूपानें उमटविण्याचा चित्रकारांनीं प्रयत्न केला आहे. बुद्धानें आपल्या पूर्वीच्या जन्मांतील हकीकत सांगितली ती दर्शविणारीं कांहीं चित्रें आहेत. तसेंच बुद्धाचा जन्म झाल्या नंतर असित ज्योतिषानें त्याला पाहून त्याचें भविष्य वर्तविलें ह्या प्रसंगाचेंही एक चित्र आहे. त्याचप्रमाणें गौतम बुद्ध आपल्या वयाच्या पस्तीसाव्या वर्षी बोधी वृक्षाच्या छायेंत बसण्या करितां जात असतां मार व त्याचे सोबती ह्यांनीं त्याला मोह घालण्याचा प्रयत्न केला त्या प्रसंगाचें चित्र काढलेलें दिसून येतें. त्याच प्रमाणें गौतम बुद्धाचें देहावसान झाल्या नंतर त्याच्या अस्थि सिंहलद्वीपांत नेल्या ह्या प्रसंगाचें काढलेलें चित्र येथें दिसून येतें. ह्या प्रमाणें ह्या चित्रां पासून गौतम बुद्धाच्या चरित्राचा बराच भाग कळण्या सारखा आहे, त्याच प्रमाणें ह्या चित्रांपासून त्या काळच्या समाज स्थिती विषयीं बराच बोध होण्याचा संभव आहे. हीं चित्रें काढणाऱ्या चित्रकारांस अलिकडे नांवाजलेल्या चित्रदर्शन शास्त्रांतील (Perspective) त्याचप्रमाणें शारीर शास्त्रांतील (Anatomy) मुख्य तत्वें अवगत होतीं हें त्यांच्या चित्रांवरून दिसून येतें.

ह्या लेण्यांत एकंदर २५ लेख आहेत, त्यांपैकीं १७ रंगांत लिहिलेले असून बाकीचे ८ कोरलेले आहेत हे लेख संस्कृत व मागधी भाषेंत लिहिलेले आहेत. ह्यावरून हीं लेणीं मगध देशच्या राजांचें वर्चस्व असतानां कोरलीं

गेलीं असें मानण्यास जास्त बळकटी येते. ह्या लेण्यांमध्यें ज्या उदार अंतःकरणाच्या गृहस्थांनीं लेण्यांचे निरनिराळे भाग कोरण्यास मदत केली त्यांचीं नांवें दर्शविलीं आहेत.

चैत्यांतील कांहीं भागांत आतां मधमाशांनीं आपली वस्ती केली असल्यामुळें, त्या पवित्र ठिकाणीं प्रेक्षकास विश्रांती घेण्याकरितां क्षणभर बसण्याची सोय नाहीं. तथापि कांहीं भाग इतके स्वच्छ आहेत कीं, तेथें गेल्यावर क्षणभर बौद्ध धर्मोंच्या गतवैभवाची आठवण झाल्या वांचून रहात नाहीं. दगोबाचें दर्शन झाल्या बरोबर तेथें ज्यांनीं कौपीन परिधान केलें आहे असे भिक्षु भिक्षुणी, व त्याच प्रमाणें चित्र विचित्र रंगाचे पोषाख ज्यांनीं परिधान केले आहेत असे स्त्री व पुरुष उपासक ह्यांचा समूह बुद्धाच्या पुण्य मूर्तीचें किंवा त्याच्या अस्थींचें तरी दर्शन सुख व्हावें ह्या हेतूनें वनांतील निरनिराळ्या प्रकारचीं फुलें घेऊन आला आहे व तीं फुलें त्यांना योग्य अशा पुण्य स्थळीं वहाण्यांत येत आहेत असा क्वचित् भास होतो; तर दुसऱ्या चैत्यांत एक श्रमणक गुरु नुकत्याच झालेल्या अपराधा बद्दल, आपल्या हाता खालील श्रमणकांनें वाक्ताडन करीत आहे असा भास होतो, तिसऱ्या स्थळीं एक गुरु गौतम बुद्धाच्या अभिधम्मपदाची संथा आपल्या प्रिय शिष्यांना मनोभावानें देत आहे असा क्षणभर भास होतो; चवथ्या स्थळीं चैत्याच्या मध्य दालनांत गुरु आपले शिष्य जमवून, "वैरानें वैर शांत होत नसून तें प्रेमानें शांत होतें" हें तत्व आपल्या शिष्यांच्या कोमळ मनांत उत्तम रीतीनें ठसविण्याकरितां, तो दृष्टांत दाखल गौतमबुद्धानें आपल्या शिष्यांस सांगितलेली ब्रह्मदत्त व दिघावु ह्यांची कथा मोठ्या मनोभावानें आपल्या शिष्यास सांगत आहे असा क्षणभर भास होतो. ह्याप्रमाणें बौद्धधर्माच्या इतिहासाची माहिती ज्याला आहे असा इसम हीं लेणीं पहावयास गेला असतां त्याला क्षणोक्षणीं बुद्धाच्या चरित्रांतील व त्या काळांतील वेगवेगळ्या प्रसंगांची क्षणोक्षणी आठवण झाल्यावांचून रहात नाहीं व अखेरीस त्या बौद्धधर्माचा अंमल आपल्या देशांत किती होता याची आठवण देणारी हल्लींचीं लेणीं होत हा विचार मनांत आला म्हणजे मनास दुःख होतें व मनुष्यप्राणी किती क्षुद्र आहे ह्याविषयीं मनाची खात्री होते. परंतु त्या बरोबरच असाही विचार मनांत येतो कीं गत इतिहास-वैभव ही जबरदस्त पुंजी आपणाजवळ असतांना आपल्याला आपल्या भावी स्थितीबद्दल निराश होण्याचें कारण नाहीं; हा विचार मनांत आल्याबरोबर मात्र पुनः थोडी उल्हासित वृत्ती होते व ह्या पुंजीवर व्यापार करून किफायत मिळविण्या करितां, उद्योग व नियमितपणा हे आपल्या अंगीं आणण्याची खटपट करावी असा मनाचा निश्चय होतो. असो.

उपसंहार. येथवर लेण्यांचें वर्णन मला जसें देतां आलें तसें मीं दिलें आहे. मी शिल्प शास्त्राभिज्ञ नसल्यामुळें मजकडून वर्णन करतांना कांहीं चुक्या झाल्या असतील तर त्याबद्दल आपण मजला माफी करावी. अशा प्रकारची इतिहास प्रसिद्ध स्थळें पहातांना, त्याजविषयीं उपलब्ध असलेली माहिती मिळवून मग तीं स्थळें पाहिलीं असतां आपल्याला पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे. असें न केल्यानें वर सांगितलेल्या अजिंठा येथील शिपायाप्रमाणें "दगोबा" हें तुळशी वृंदावन होय किंवा इतर सामान्य जनांप्रमाणें "हीं लेणीं पांडवांनीं कोरलीं" अशा तऱ्हेच्या अप्रगल्भ उत्तरांना आपल्या मनाचें समाधान करून घ्यावें लागेल. ह्यास्तव ज्यांनीं अशीं इतिहास प्रसिद्ध ठिकाणें अस्तित्वांत आणिलीं, त्यांचे हेतु समजण्याकरितां, वर दर्शविलेला प्रयत्न करण्यास जगन्नियंता परमेश्वर आपणांस बुद्धि देवो अशी त्याची मनोभावानें प्रार्थना करून व आपणही माझे वेडे वांकडें बोल आतां पावेतों शांतपणें ऐकून घेतलें ह्याबद्दल आपणां सर्वांचे व ज्या पूज्य तीर्थरूपांनीं आजचा निबंध तडीस नेण्यास वेळोवेळीं प्रेमपूर्वक मला प्रोत्साहन दिलें त्यांना प्रेमपूर्वक नमन करून आपली रजा घेतों.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ८ शके १८२५

---

अबकारी खातें ही एक सरकारी उत्पन्नाची मोठीच बाब आहे. गेल्या १९०२-०३ सालीं या खात्याचें उत्पन्न १६,३०,८२६ रुपये झालें. या खात्याचा वार्षिक खर्च २४७४१ रुपये आहे. तो वजा जातां बाकी नक्की उत्पन्न १६,०६,०९ रुपये झालें. १९०१-०२ साला पेक्षां हें उत्पन्न सवाईनें वाढलें आहे. सरकारी अभिप्राय असा पडतो कीं ही उत्पन्नाची वाढ म्हणजे लोकांची सुखसंपन्नता होय. लोक सुखी होऊं लागले आहेत, यांच्या जवळ पैसा खेळूं लागल्यामुळें ते अबकारीचे कर देतात व राजीखुषीनें दारू अधिकाधीक पीत आहेत. मद्यादिकांची लोकांस अधीक गोडी लागली ही गोष्ट नैतिक दृष्टीनें मोठी असमाधानाची आहे तथापि लोक अधीक संपन्न व सुखी झाले आहेत असें जर निश्चय होत असेल तरी देखील आह्मी त्या गोष्टीत आनंदच मानूं.

पण वस्तुस्थिती तशी नाहीं. लोक गरीब होत चालले आहेत. ही गरिबी आह्मांस पदोपदीं दिसून येते. लोक अगदीं खालावत चालले आहेत आणि हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं लोकांची प्रवृत्ति व्यसनाकडे अधिकाधीक आहे.

सरकारी कागदपत्र सांगतात कीं वाशिम जिल्हा, वणी जिल्हा व पळकापूर तालुका खेरीज करून बुल्ढाणा जिल्हा येथें लोकांच्या खाजगी भट्या आहेत, व तेथून किती दारू तयार होऊन खपली गेली याचा हिशोब उपलब्ध नाहीं तथापि सरकारी भट्टींतून जी दारू दिली जाते तिचा खप बाकीच्या चार जिल्ह्यांतून होतो. हा खप १९०२-०३ सालीं पुष्कळ वाढला. बेवडा दारू म्हणजे दारूचा अर्क ३९७३२ ग्यालन विकण्यांत आला आणि राशी दारू, ३,८२,०१६ ग्यालन खपली. पूर्वीच्या वर्षापेक्षां हा खप २२ हजार ग्यालनांनीं वाढला आहे. अफूची विक्री २८०० शेरांनीं वाढली असून एकंदर १३२९७ शेर अफू खपली. गांजाचा खप ११७१ शेर असून ८६८ शेर भांग विकली गेली या आकड्यांमध्यें विलायती दारू किती खपते याचा हिशोब उपलब्ध नाहीं. विलायती दारूचा खप कमी कमी होत असेल असें मानण्याला आमच्या जवळ मोठासा पुरावा नाहीं, पूर्वी देशी दारूच्या खपाचा हिशोबच मिळत नसे तो आतां सरकारी भट्टीमुळें मिळतो. सरकारी भट्टीचे आंकडे म्हणजे विश्वसनीय प्रमेयें आहेत आणि त्यांच्या आधारानें ही गोष्ट पक्की दिसते कीं लोकांत दारूचें व्यसन अधीक जडलें आहे.

तेव्हां लोक अधीक दारू पितात व सरकारी कर कितीहि वाढला तरी तो देतात. आणि ही गोष्ट लोक अधिक श्रीमान झाल्याशिवाय घडणारी नाहीं असा सरकारी अभिप्राय आहे. साधारण दृष्टीनें सरकारी अभिप्राय खरा वाटतो आणि तो पुष्कळ अंशीं वादाच्या युक्तीला जुळतो परंतु खऱ्या वस्तुस्थितीशीं त्याचा मेळच पडत नाहीं. लोक अधिकाधीक गरीब होत चालले आहेत ही गोष्ट आह्मी पुनः पुनः प्रतिपादित असतों आणि आमची प्रतिपाद्य गोष्ट खरी आहे असें धरलें आणि सरकारी अभिप्रायांतील लोकांची निशा करण्याचा प्रयत्न केला तर आमच्या मतें विद्यमान संवृद्ध मद्यपानाचें खरें कारण इतरच आहे.

मद्यपानादि व्यसनांची अभिवृद्धि समाजाला अहितकारक आहे आणि तिच्यामुळें सामाजिक हीन अवस्था दृष्टीस पडते. आपला समाज नीच पायरीला जात आहे असें आह्मी जरी म्हणत आहों तरी एक समाधानाची गोष्ट सांगितल्या वांचून राहवत नाहीं. गरिबीचें अंजन निळूं लागल्यामुळें आमच्यांतील पुष्कळ मंडळी मद्यपानाच सूत दूर दूर जाऊं लागली आहे. पण या बरोबरच आपल्या समाजांतील एक मोठा वर्ग असा आहे कीं गरिबीमुळें तो निराश होऊं लागला असून उधळपट्टीचे अ गुण या वर्गाला अधीक जडले आहेत. जो तो आपल्या पुरतें पाहतो. स्वतःची चैन झाली म्हणजे पुरें आहे आणि अशा दृष्टीनें जनसमाजाचा एक मोठा वर्ग दारूसाठीं पैसा अधीक खर्चण्यास शिकला आहे. एकच मागविलीच पाहिजे असा त्यांचा सिद्धान्त ठरल्या सारखा दिसतो या असमार्गाच्या बुद्धीशीं दुसरी एक घातुक प्रवृत्ति आहे. हल्लींचा काळ व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आहे. या स्वातंत्र्याचा अतिरेक होत जाऊन कुटुंबाची खरी कल्पना लयास जात चालली आहे. लोकांचा दूरदर्शिपणा कमी झाला आहे. त्यांस त्यांच्या दोन प्रहरच्या वेळे पलिकडे पाहण्याची इच्छा दिसत नाहीं. इंग्रजीच्या नाना सुलकारी वस्तूमुळें स्वभावच थोडाबहुत चैनी व रंगेल असा बनत चालला आहे. कुटुंबाची पर्वा फारशीं कोणी करीत नाहीं. कुटुंबाचें हित तेंच आपलें हित होय. हा विचार दिवसानुदिवस मोडत चालला आहे. ज्याचा तो किंवा माझा मी हा प्रकार फार आढळतो. मी म्हणजे माझें सर्व कुटुंब असा विचार मनाला चांगलासा पटत नाहीं. ही सामाजिक अवनती मद्यपान वाढण्याला कारणीभूत आहे. कुटुंबासाठीं कांहीं शिल्लक ठेवावी, त्याची भावी तरतूद करावी आणि सर्व कुटुंबीयांचें कल्याण साधावें अशी मनोवृत्ती अधिकच लोपली आहे. गरिबी फार झाली म्हणजे एका प्रकारची निराशा येते, निराशेनें मनुष्य निष्काळजी बनूं लागतो. त्याच्या कुटुंबाची काळजी त्याला कमी वाटूं लागते, आणि आपमतलबीपणा वाटून स्वतांच्या चैनीकडे दृष्टी वळते. असाच प्रकार आमच्या समाजाच्या बुडाशीं आहे आणि म्हणून गरिबींत देखील मद्यपानाला तेजीच आहे. वरील गोष्टी लक्षांत आणिल्या म्हणजे असें वाटेल कीं जर मद्यपानाचा प्रकार नाहींसा होण्या सारखा नाहीं आणि लोक तर गरीब आहेत त्या अर्थी सरकारानें व्यसनी माणसांचीं मादक द्रव्यें महाग करून लोकांस अधीक खोल पाण्यांत घालूं नये. सरकाराला अबकारी उत्पन्न मिळतें पण रयतेची हानी होते.

---

## झोपड्या

(सरकारी नोकरासाठीं)

या प्लेगाच्या दिवसांत खालच्या दर्जाच्या सरकारी चाकर मंडळीस गांव बाहेर जाऊन राहण्यास सांगावें लागतें. कचेऱ्यांत सर्वांस एकत्र जमावें लागतें आणि तशा ठिकाणीं प्लेगानें दूषित असलेल्या भागांतून कोणी येऊं नये म्हणून वरील प्रतिबंधाचा उपाय सरकारी अधिकारी योजीत असतात. स्थानत्यागाचा उपाय चांगला आहे आणि त्याच्या इतका चांगला उपाय उपलब्ध नाहीं तेव्हां त्याचा अंगीकार करण्यास चाकर मंडळीसच काय पण इतर लोकांस देखील भाग पाडावें हे उचितच होय. उपदेशाच्या बाजूनें लोकांचीं मनें स्थानत्यागाकडे प्रवृत्त केलींच पाहिजेत. परंतु या गोष्टीला व्यवहाराची व खर्चाची अडचण मोठी येते. गरिबी पुढें सर्व इलाज लटके होतात ! सरकारी नोकरासाठीं झोपड्या बांधाव्या आणि माफक भाड्यानें त्यांस त्या राहण्याला द्याव्या असा उमरावतीला सरकारी प्रयत्न चालूं आहे. आमच्या जिल्ह्याचे मुख्य कर्णधार मे. रुस्तुमजी साहेब हें उमरावतीचें उदाहरण लक्षांत घेऊन आकोल्यास कांहीं तशी तजवीज करितील अशी आह्मास उमेद आहे. गरीब लोकांच्या सोयी देखील करण्या करितां मे. रुस्तुमजी साहेब वर्गणी गोळा करून निराळी खटपट करीत आहेत. त्यांच्या या स्तुत्य परिश्रमाबद्दल लोक यांचे ऋणी आहेत.

---

हिंदुस्थानांतील बऱ्याच प्रजेचा उदरनिर्वाह शेतकीवर होत असल्यामुळें, शेतीची व शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्या करितां

हरतऱ्हेचे प्रयत्न सुचविण्यांत येतात; त्यांपैकीं कित्येकांचें महत्त्व सरकारास ह्या पूर्वीच कळून चुकलें आहे व ह्या सूचना अमलांत आणण्या विषयीं सरकार आपल्या कडून होईल तो प्रयत्न करीत आहे. तथापि ह्या बाबतींत आपल्या देशांत शेतकऱ्यांची व शेतीची स्थिति सुधारण्याकरितां सरकार जे प्रयत्न करित आहे ते इतर सुधारलेल्या राष्ट्रांत सरकाराकडून जे प्रयत्न करण्यांत येतात त्यांशीं ताडून पाहिले असतां, कमी आहेत ह्याबद्दल संशय नाहीं. प्रजेचीं सर्व कामें करण्याचा बोजा सरकारानें आपल्या शिरावर घेतला असतां, प्रजा विशेष परावलंबी होईल व तिच्यांत सत्व राहणार नाहीं हें राज्यनीतीचें तत्व आम्हांस संमत आहे; तथापि जें राष्ट्र बाल्यावस्थेंत आहे त्याला कांहीं काळपर्यंत तरी त्याची सांपत्तिक व औद्योगिक स्थिति सुधारण्याचे कामीं मदत करणें हें सरकारचें कर्तव्य होय. ह्याच तत्वास अनुसरून डेनमार्क, जर्मनी, हालंड, फ्रान्स, इटली, युनायटेड स्टेटस वगैरे देशांतून शेतीची सुधारणा कोणत्या प्रकारें करण्यांत येईल हें ठरविण्या करितां व त्या संबंधानें हरतऱ्हेचे प्रयोग वेळोवेळीं करण्याकरितां एक स्वतंत्र खातें नेमलेलें आहे. ह्या खात्यांत कृषिकर्म शास्त्र, रसायन शास्त्र, वनस्पति शास्त्र वनस्पति जीवनक्रियशास्त्र वगैरे शास्त्रांत पारंगत असलेल्या विद्वान लोकांची नेमणूक करण्यांत येत असते; हे विद्वान लोक प्रयोग करून जे सिद्धांत ठरवितात त्यांची माहिती शेतकऱ्यांनां करून देण्याची खटपट सरकाराकडून करण्यांत येत असते. अशा तऱ्हेचे प्रयत्न एखाद्या विवक्षित संस्थेकडून होऊं शकणार नाहींत. कारण ह्या कामीं लागणारा पैशाचा बोजा एका संस्थेकडून उचलला जाणार नाहीं. ह्याच तऱ्हेचे प्रयत्न डच सरकारच्या ताब्यांत असलेल्या जावा बेटांत तेथील सरकाराकडून करण्यांत आले आहेत व ते बऱ्याच अंशानें फलद्रुप झाले आहेत असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. मारिशिअस बेटांत उसाची लागवड वाढविण्या करितां तेथील सरकारानें अशाच तऱ्हेची मदत केली असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. ही स्थिती सुधारलेल्या राष्ट्रांत जर दिसून येत आहे तर हिंदुस्थान सारख्या मागसलेल्या देशांत ती कां लागू पडूं नये ह्याचें कारण आमच्या ध्यानांत येत नाहीं. हिंदुस्थानांत स्वतंत्र शेतीखातें स्थापण्यांत आलें आहे व वर दर्शविलेलें काम सदर्हू खात्याचें आहे ही कल्पना आज पावेतों आमच्या सरकारास सुचली नाहीं मग त्या प्रमाणें वर्तन घडणें लांबच राहिलें! ही उणीव दूर करण्याचे हेतूनें कित्येक वजनदार गृहस्थांनीं मुंबई सरकाराकडे नुकताच आपल्या सहीनिशीं अर्ज पाठविला आहे. त्याचा योग्य विचार मुंबई सरकार करीलच ह्या विषयीं संशय नाहीं,

---

मुंबई व पुणें ह्या ठिकाणीं मोठमोठीं फार्मस (मळे) सरकारानें करावे व तेथें बाहेरच्या देशांत उत्पन्न होणारी विशेष जातीचीं धान्यें, फळें, फुलें वगैरे उत्पन्न करण्याची तजवीज सरकारानें करावी त्याच प्रमाणें ह्या देशांत प्रचारांत असलेल्या खता शिवाय इतर कोणत्या खताचा व कशा प्रकारें उपयोग करितां येईल ह्या संबंधाचे प्रयोग सरकारानें सदर्हू "फार्म" मध्यें करून पहावे. व ते प्रयोग फलद्रूप झाले ह्मणजे त्यांची माहिती सरकारानें शेतकऱ्यांस त्यांच्या मार्फत लिहिलेल्या पत्रकांच्या द्वारें देण्यांत यावी. अशा तऱ्हेची कांहीं माहिती (Agriculture ledger) ह्या नांवानें इंग्लिश भाषेंत प्रसिद्ध होत असलेल्या पत्रकांत वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत येत असते, परंतु ती माहिती विशेष शास्त्रीय पद्धतीनें दिली जात असल्यामुळें तिचा उपयोग साधारण वाचकांस व्हावा तसा होत नाहीं; व ती माहिती देशी भाषांतून प्रसिद्ध होत नसल्यामुळें शेतकऱ्यांस तर तिजपासून मुळींच उपयोग होत नाहीं. ही स्थिति इष्ट नव्हे.

---

वर दर्शविलेलें काम जरी सरकारानें आपल्या शिरावर घेणें रास्त आहे असें जरी आमचें मत आहे तरी सरकारानें तें पत्करिलें नाहीं तों पर्यंत अकोले डिस्ट्रिक्ट बोर्डा सारख्या एखाद्या लोकसंस्थेनें तें पत्करिलें तर त्याबद्दल सदर्हू संस्थेचें अभिनंदनच केलें पाहिजे; आणि अशा तऱ्हेचा प्रयत्न करण्याचें सदर्हू बोर्डाचें मनांत घाटत असल्याचें ऐकून आह्मांस आनंद वाटतो. अकोले येथें बंधाऱ्या जवळ असलेला बगीचा हल्लीं अकोले म्युनिसिपल कमीटीच्या देखरेखी खालीं आहे तेथें भाजीपाला वगैरे रोजच्या उपयोगातील सामान्य जिन्नस उत्पन्न करण्यांत येत असल्यामुळें सदर्हू बगीचा चांगल्या स्थितींत ठेवणें हें सदर्हू म्युनिसिपालिटीस बरेंच खर्चाचें काम वाटूं लागलें आहे ह्यामुळें सदर्हू बगीचा अकोले डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या ताब्यांत देण्यांत येणार आहे; व त्याचा उपयोग जिल्ह्यांतील शेतकरी लोकांनां नमुन्या दाखल फार्म तयार करण्याचे कामीं करण्यांत येणार आहे असें आह्मी ऐकतों. ह्या तऱ्हेची व्यवस्था अमलांत आल्यास अकोले डिस्ट्रिक्ट बोर्डानें इतर बोर्डास व खुद्द सरकारास ही उत्तम कित्ता घालून दिल्यासारखें होईल ह्मणून सदर्हू व्यवस्था लवकर अमलांत येवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

## प्लेग.

उमरावतीस प्लेगानें कहर उसळून दिला आहे. दररोज ४७।५८ वर लोक मरत असतात. आकोटास प्लेग मंदावला होता परंतु त्यानें आतां तेथें मोठी उचल केली आहे. दररोज १५।२० इसम मरण पावतात. वाशीम येथें प्लेगाचे मान दर आठवड्याला ८०।९० पर्यंत मृत्यू असें आहे एलिचपुरला ही कांहीं प्लेगाचे मृत्यु घडल्याचें समजते. आकोल्यास कधीं २ कधीं ३ कधीं ४ या बेतानें प्लेगाचे मृत्यु दररोज घडत असतात.

बुलढाण्यासही प्लेगामुळें २ माणसें मेलीं असावी असा संशय उत्पन्न झाला आहे या शिवाय पुष्कळ ठिकाणीं तुरळक तुरळक प्लेगानें लोक मरूं लागले आहेत.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस उघडल्यामुळें हवा रूक्ष व आरोग्य कारक वाटते. दिवसा ऊन कडक वाटतें. शेतीचीं कामें झपाट्यानें चालूं आहेत प्लेगाचा रोग बळावत चालला. असून तो इतरत पसरत आहे ईश्वर कृपा करील तेव्हां खरें!

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर ए० असि० कमिशनर हे गेल्या गुरुवारीं मलकापुरास गेले. त्यांच्या सन्मानार्थ स्टेशनावर पुष्कळ मंडळी जमली होती; आणि त्यांस निरोप देतांना सर्वजणांस वाईट वाटलें.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. ए० असि० कमिशनर हे तेल्हाऱ्याहून येथें आल्यानंतर त्यांची नेमणूक आकोल्याच्या स्मालकाज कोर्टावर होईल.

आणि मि० सी. एज. प्राइस साहेब हे येथील सिव्हील जज्जाचे जागीं बदलले जातील असें ह्मणतात.

मे. जे. ए. क्राफर्ड साहेब कमिशनर वऱ्हाड हे फर्लो रजा संपतांच पेनशनदार झाले. आणि त्यामुळें खालील आक्टींग नेमणुका पक्क्या होतील.

वऱ्हाड प्रांत नागपूर प्रांताला जोडला आहे आणि त्याची राज्य कारभाराची व्यवस्था तारीख १ आक्टोबर पासून अमलांत येणार आहे. रंगून प्रमाणें नागपूर येथें चीफ कोर्ट स्थापलें जाणार आहे. बरींच वरिष्ट आफिसें मोडलीं जाणार असून खालीं काय काय कम जास्त फेर फार होतात तें पाहावें.

मेहेकर— श्रीगणपतीचा महोत्सव चांगला उत्कृष्ट झाला; या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप येत आहे हें पाहून पुष्कळांस आनंद वाटतो. रोषनाई, देखावे, छबिना इत्यादि गोष्टि फार नामी झाल्या. येथील असि. मास्तर रा. रा. नारायण केशव पिंपळखरे यांचे वार्षिक निकाल चांगले आहेत व छात्रसमूह त्यांच्यावर फार खुष आहे. त्यांची बदली झाल्यामुळें त्यांच्या सद्गुणाबद्दल पानसुपारी करून त्यांचा गौरव करण्यांत आला.

जळगांव— पाऊस उघडल्यामुळें पीकें चांगलीं आहेत. गुरांचा आजार वाढला आहे. लायब्ररीची नवी पक्की इमारत बांधण्याचा विचार आहे. सध्यां १००० रुपये जमा आहेत आणि अधिक वर्गणी इतकीच पाहिजे. कांहीं वर्तमानपत्राबद्दल व श्रीगजाननाचे खर्चा बद्दल वाद आहे पांच सार्वजानिक उत्सव झाले. ४ मेळे होते. राजश्री पुराणिक येथील थाट प्रेक्षणीय झाला. येथील उत्सवांत एक नाटकाचा प्रयोगही करण्यांत आला. 'नरवीर मालुसरे' हा खेळ झाला. व त्यांत तानाजी, सूर्याजी व मोहनलाल यांची कामें प्रशंसनीय होतीं.

पहापळ ता० केळापूर— येथील मक्तारीचे पेरे फारच मागसले आहेत. येथील साहूकारामध्यें लावणी सट्टे पुष्कळ होतात आणि गरीब शेतकरी फार डुबतात. आतांच शेतीचा होणारा माल सावकाराकडे खरिदी दिलेला आहे. येथील मराठी पांचव्या इयत्तेला इंग्रजी क्लास जोडला जाईल तर बरें. राजश्री सदाशिवराव काळे यांच्या घरीं श्रीगणपतीचा उत्सव फार चांगला झाला.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८= |
| सोनें २४॥ | | चांदी ७३ |
| जवारी ३०।४० | | जवस ९०-९६ |
| गहू | | ९० ते १०० |
| बाजरी | | ४६ |
| मीठ | ४। | रु. मण |
| चणे | ३।- | रु. मण |
| तूप | ९॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई | | ९० |

## नोटीस

गंगाराम वल्लद शामजी, भगवान वल्लद शामजी, लक्ष्मण वल्लद शामजी, पुंजाजी वल्लद शामजी कोळी राहाणार ताजनापेठ. आकोला यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी आह्मांस ता० २८।६।०३ रोजीं आपलें घर धर्मशाळेनजीकचें किंमत रुपये ६०० पांचशास विकलें व इसारा बद्दल पांच ५ रुपये घेतले. खरिदीखत लिहून नोंदून देण्याची व घर ताब्यांत देण्याची पूर्णता झाली नाहीं यामुळें सदरहु संबंधाची तुमची करार चिठ्ठी आह्मांस नोंदून घेणें आहे यासाठीं त्या करार चिठ्ठींत तुह्मी आह्मास स्थावर मिळकतीचें वर्णन नोटीस पावल्यापासून दोन दिवसांत लिहून द्यावें त्यावांचून ती सबरजिष्टरकडे नोंदली जात नाहीं याप्रमाणें न कराल तर तें नोंदून देणें व वर्णन लिहून देणें याबद्दल जे कायदेशीर इलाज असतील ते योजिले जातील दुसरें असेंही कळविलें जातें कीं सदरहू घराचें खरेदीखत लिहून व नोंदून द्यावें. आह्मी खरेदीच्या पैशापैकीं जयराम पाटील याचें गहाणाचे रुपये रीतीप्रमाणें निघतील तितके त्यास व बाकी रहातील ते तुह्मास देण्यास तयार आहों या संबंधीही तुह्मांकडून कांहीं हरकत आल्यास याबद्दलही लागलीच योग्य तजवीज होईल. कळावें, ता० ११।९।०३ इसवी. आकोला.

सही.

नरहर धोंडदेव वैद्य दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं तारीख २८।६।०३ रोजीं गंगाराम वल्लद शामजी, भगवान वल्लद शामजी, लक्ष्मण वल्लद शामजी, पुंजाजी वल्लद शामजी कोळी सर्व राहणार अकोलें ताजनापेठ यांनीं आपलें घर धर्मशाळेनजीकचें आह्मांस किंमत रुपये ६०० पांचशास विकलें आहे. आणि इसारा बद्दल रुपये ५ पांच घेतले या साठीं कळविलें जातें कीं सदरील इसमांपासून सदरील घर कोणी कोणतेही शर्तीवर खरेदी, गहाण, बक्षीस वगैरे घेऊं नये. घेतल्यास तो नकारदार होऊन त्याचें घेणें व्यर्थ होईल सबब कळविलें आहे. तारीख ११।९।०३ इसवी आकोला.

सही.

नरहर धोंडदेव वैद्य दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

कलकत्ता येथें मि. डब्लू मॅारगन नांवाच्या असिस्टंट स्टेशन मास्तरनें इलाई स्मिथ नांवाची एक तरुण मुलगी घरीं पळवून नेली ती आईबापांच्या घरीं होती परंतु याच्या जाण्या येण्यानें उभयतांची प्रीति जडली, व तिची आई तिच्या मतास नाकबूल असताहि तिनें आपल्या जारा बरोबर पोबारा केला! खटला पोलिसांत चालूं आहे.

सर्व्हियाच्या ७०० लोकांनीं पीटर राजाकडे अर्ज करून मागच्या राजाचा खून करणाऱ्यांना शिक्षा देण्याविषयीं विनंती केली आहे. व जर पीटर साहेब तसें करण्यास कबूल नसतील तर ते स्वतःच यांचे पारिपत्य करण्याच्या विचारांत आहेत.

महापुरामुळें कराची जिल्ह्यांत मुजवल येथें १५० फूट रुंदीची एक भेग पडली आहे. व यामुळें सुमारें २०००० रुपयांचें नुकसान झालें आहे.

मुंबईहून पुण्यास येणाऱ्या गाडींतून पुष्कळ लोक बिन तिकिटानें प्रवास करतात अशी माहिती पुण्यास कळल्याबरोबर स्टेशनावर पुष्कळ पोलीस, रेल्वे आफीसर मागील शनवारीं हजर राहिले व बारकाईनें तपासूं लागले परंतु एकही प्रवासी बिन टिकिटाचा आढळला नाहीं. वरील खोटी माहिती देणाराची कमालच ह्मणावयाची.

सरकारी गुप्त बातम्यांच्या स्फोट करण्याच्या कायद्याच्या दुरुस्तीच्या बिला संबंधानें अमृतबझार पत्रिका, बंगाली, इंडयन मिरर पत्रांनीं व्हाईसराय साहेबांचे खासगी सेक्रेटरीस तारा पाठविल्या होत्या. त्याचें व्हाइसराय साहेबाकडून खालील प्रमाणें उत्तर आलें:– "या बिला विरुद्ध येणाऱ्या सर्व टीकांचा विचार केल्याशिवाय हें बील विचारांत घेतलें जाणार नाहीं."

तंबाखूचा मान– मेक्सिको व सयाम या देशांत कोर्टांत एकादी केस चालली असतांनाहि न्यायाधीश, ज्युरर्स, वकील इत्यादि मंडळी खुशाल चिरुट वगैरे ओढतात. कैद्याला सुद्धां मर कोर्टांत चिरूट ओढण्याची मनाई नसते.

चमत्कारिक सभ्य–इंडोचायनीज द्वीपकल्पाचे पूर्वेस अॅनम ह्मणून प्रांत आहे. त्याची लोकसंख्या ६० लक्ष आहे. पण मौज ही कीं पुरुष व स्त्रिया यांच्यांत मुळींच फरक दिसत नाहीं. पुरुषांस दाढी मिशा नसतात. दोन्ही वर्गाचे पोषाख अगदीं सारखे असतात. त्यांना ओळखण्याची मोठी पंचाईत पडते. इतकें मात्र खरें आहे कीं स्त्रिया कानांत बाळ्या व हातांत आंगठ्या घालतात. पुरुष मात्र मुळींच घालित नाहींत.

तीन घरास एक– जगांतील सर्वांत सुंदर शहर जें पारीस त्यांत दारू विकण्याची इतकीं दुकानें आहेत कीं प्रत्येक तीन घरास एक दुकान असें प्रमाण पडतें.

एक विद्वान असें सांगतो कीं, जे लोक लवकर झोंपीं जात नाहींत ते फार दिवस वांचतात.

प्रिन्स बिसमार्क यांच्या हजामानें त्यांच्या डोक्याचे जवळ जवळ आठ वर्षचे केंस राखून ठेविले आहेत हे केंस तो सध्या थोडे

थोंडे एका सोन्याच्या पेटींत घालून विक्रीत असतो पैसे चांगले मिळतात.

बेळगांवांत सध्यां १७ वर्षांनीं दुर्गेचा रथोत्सव सुरू झाला असून यात्रा अतोनात जमली आहे. हा रथ ६ मजली असून ६४ फुट उंच आहे. हा रथ यात्रेकरूं शहरांतून १०।१२ दिवस मिरवीत नेणार आहेत.

येत्या विजयादशमीची ह्मैसूरची पार्लमेंट महाराज स्वतः उघडणार असून त्यावेळीं बजेट सादर केल्यानंतर ते स्वतः भाषण करून आपल्या राज्यकारभाराचें धोरण आपल्या प्रजाजनांस कळविणार आहेत.

सन १८१४ पासून सन १८९७ पर्यंत हिंदुस्थानांत कलकत्ता, मद्रास, मुंबई, कोलंबो रंगून लाहोर, त्रावणकोर, कोचीन, तिनेवल्ली नागपूर, लखनौ, पाळमकोटा, या ठिकाणीं बिशप नांवाच्या बड्या ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या. या बिशपांचा पगार दरमहा १००० रु. पासून ३८३१ रु. पर्यंत आहे! यांचा हा सर्व पगार व इतर खर्च मिळून एकंदर, रकम दरसाल या बाबतींत ४० लक्ष खर्च होतो! विशेष आश्चर्य हें कीं हा सर्व खर्च हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान, शिख, पारशी व जैन प्रजेस सोसावा लागतो!

देहरा येथें एका मुसलमान तरुणावर संमतिवयाचे कायद्याखालचा आरोप येऊन सेशन जजपुढें चौकशी झाली. आरोपीवर आरोप शाबीत होऊन त्यास ६ महिने सक्तमजुरीची व २५ रु. दंडाची शिक्षा झाली.

निजामसाहेब हे विधवाविवाहास अनुकूल असून हैद्राबादेच्या प्रसिद्ध घराण्यांतील तरुण विधवांचीं लग्नें लावून टाकावीं, अशी यांनीं इच्छा प्रगट केली आहे व या बाबतींत उत्तेजन देण्यासाठीं यांस चालू असलेली नेमणूक त्यांनीं दुसरें लग्न केलें तरी चालूं ठेवावी, असा यांनीं दिवाणास हुकूम दिला आहे, असें 'हिंदु' ह्मणतो!

बंगालप्रांत फार मोठा असून राज्यकारभारास त्यामुळें बरीच अडचण येत असल्या कारणानें त्यांपैकीं ओरिसाप्रांत, मध्यप्रांत वऱ्हाडास जोडून व चितागंज आसाम प्रांतांत सामील करण्याचा व मध्य प्रांतावरचे जागेचा हुद्दा ले. गव्हर्नराचा करण्याचा विचार चालला आहे, असें 'इंग्लिशमन' पत्रावरून समजतें.

हिंदुस्थानांतील जुन्या ऐतिहासिक व धार्मिक इमारती, लेणी, वगैरेचें संरक्षण करण्याची तजवीज करण्याकरितां एक बिल तयार झालें असून तें वरिष्ठ कौंसिलपुढें लवकरच येणार आहे.

मद्रासेंतील येलोर तालुक्यांत ताम्मिलेरु नदीस भयंकर पूर येऊन ५००० एकरांतील पीक बुडून शेतकऱ्यांचें नुकसान झालें आहे.

हिंदुस्थानांत जे जे पराक्रमी व शूर पुरुष होऊन गेले त्या सर्वांचा हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं वीराष्टमीचे दिवशीं उत्सव करून शौर्यपूजा दर्शविण्यासाठीं तरवारीचें पूजन करावें, अशी कुमारी सरळा देवी घोसळ या सुशिक्षित बंगाली स्त्रीची सूचना आहे

शांघाय येथील राजद्रोही चिनी पत्रकार चिनी सरकारचे स्वाधीन करीत नाहीं, असें त्यास कळविण्याबद्दल अमेरिकन सरकारानें चिनांतील आपल्या वकीलास लिहिलें आहे.

प्रिन्स फर्डिनंड राजाच्या सोफिया येथील राजवाड्याचे खालीं मोठमोठे भोगदे पोखरलेले आढळले आहेत. यांमध्यें डायनामैट भरून राजवाडा उडवून देण्याचा कोणाचा तरी प्रयत्न हा असावा असें ह्मणतात.

आस्ट्रेलिया व युनायटेड स्टेटस देशांतील दोघे गृहस्थ बुद्धिबळाचा एक डाव पांच वर्षें खेळत होते. पत्रव्यवहारानें खेळाचें काम चाललें होतें हें सांगणें नकोच.

विद्यार्थ्यांस शिक्षा– मुंबईस बळवंत नरहर बहुलेकर नांवाच्या विद्यार्थ्यानें मांडारकर लायब्ररी, युनिव्हर्सिटी लायब्ररी, वगैरे पुस्तकालयांतून वाचण्यासाठीं ह्मणून बुकें आणून ती बाजारांत विकल्याबद्दल त्याला चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

जत संस्थानांतील कांहीं उपद्व्यापी मंडळींनीं तेथील एका मोठ्या अंमलदारानें लांच खाल्ल्याबद्दल पोलिटिकल एजंटाकडे अर्ज केला होता पण तो खोटा ठरल्यामुळें त्या मंडळीस दीड वर्ष व एक वर्ष अशा शिक्षा झाल्या.

गुडसक्लार्कास शिक्षा– सहारणपूर स्टेशनावरील एका गुड्स क्लार्कानें तेथें रवाना होण्याकरितां आलेल्या खडीसाखरेच्या पोत्यांतून कांहीं खडीसाखर चोरल्याबद्दल त्याजवर खटला चालून त्यास दोन वर्षाची शिक्षा देण्यांत आली.

तुरुंगामध्यें तपकीर नेणें व तिचा उपयोग करणें हा तेथील नियमा प्रमाणें गुन्हा असून त्याबद्दल मद्रास येथील एका कैद्यास माजिस्ट्रेटनें ३० फटक्याची शिक्षा दिली.

लंडन येथें सन १९०६ सालीं, फारच मोठ्या प्रमाणावर सगळ्या जगांतील प्रेक्षणीय वस्तूंचे एक जंगी प्रदर्शन, क्रिस्टल पॅलेसचे जागीं भरविण्याची चळवळ तेथें जोरानें चालूं झालेली आहे.

शेतकरी आक्टाप्रमाणें नेमलेले गांव मुन्सफ यांस आपल्यापुढें, प्रतीवादी अगर साक्षीदार गैरहजर राहिल्यास, त्याला सक्तीनें हजर ठेवण्याचा सिव्हिल कोर्टांचा अधिकार देण्यांत आला आहे.

लाहोर येथील एका गोऱ्याची एका मांगिणीवर प्रीती जडली! तेव्हां त्याणें तिच्याशीं लग्न लावलें! हें कळतांच तिच्या नवऱ्यानें, त्या गोऱ्यावर फिर्याद केली. तो गोरा, त्या मांगाला, त्याच्या बायकोबद्दल २०० रुपये देण्यास तयार आहे; पण तो मांग तसें करण्याला नाकबूल आहे असें कळतें!

नवीन चहा—पाण्यांत विरघळणारा चहा आतां बाजारांत विक्रीस येणार आहे; आमच्या उमेदवार लोकांची यांत विशेष सोय झाली. लष्करी अंमलदार त्याचा अनुभव घेणार आहेत.

---

नोटीस

वेशमी सिवराम वल्लद महादु चिंचोळकर राहणार गोरेगांव तालुके बाळापूर जिल्हा आकोला यास खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला माझे आईबापाचे घरीं ठेऊन सुमारें पाच वर्षें झालीं मला आपण घेऊन जात नाहीं व माझे खाण्यापिण्याची व्यवस्था करीत नाहीं व तुह्मी आईबापाचे घरीं सोडून गेल्याचे आगोदर सुमारें आठ वर्षें तुह्मी शेगांवात राहत होता त्यावेळीं नारायण वल्लद भगवान माळी राहणार सेगांव याजपासून आठ वर्षांत खाण्याकरितां सुमारें रुपये १०० कर्ज काढिलें होते. तें नेहमीं मला मागत आहे तर त्याचे शंभर रुपये देऊन त्याची पावती घ्यावी व मला घेऊन जावें आणि माझ्याशीं प्रपंच करावा. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला घेऊन जावे तसें न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा पाटाचा नवरा करून घेईन मग आपले नवरेपणाचा हक्क मजवर कांहीं एक राहणार नाहीं. कळावें. तारीख १०।९।०३

सही

सोनी मर्द सिवराम चिंचोळकर राहणार
गोरेगांव हल्लीं वस्ती शेगांव
इचे हातची निशाणी
बांगडी असे.

---

स्मालकाज मु० नंबर ८००
१९०३

सन १८८२ चा आक्ट नंबर १४ यांतील कलम ३० अन्वयें ज्यांचा हित अनहिताचा संबंध आहे असे अनेक पक्षकारांपैकीं एकाच पक्षकारा विरुद्ध एका पक्षकारानें दावा केल्याबद्दल जाहीरात विद्यमान सी. एच. प्राइस साहेब बहादुर जडज्य स्मालकाज कोर्ट आकोलें यांचे कोर्टांत:—

वादी— सेक्रेटरी श्री कुमार शंकरसिंग नेटिव्ह जनरल लायब्ररी पातूर शेखबाबू या नांवचा दस्तारेवज मालक श्री कुमारशंकरसिंग नेटिव्ह जनरल लायब्ररी तर्फे सेक्रेटरी सिवरतनसिंव्ह वर्मा राहणार पातूर शेखबाबू तालुके बाळापूर जिल्हे आकोलें.

प्रतीवादी— शंकरसिंग वल्लद सरदारसिंग राहणार पातुर शेखबाबू तर्फे कुलमुखत्यार भगवान सदाशिव माहाजन राहणार पातुर सेखबाबू तालुके बाळापूर.

दावा— हित अनहित असलेले सर्व पक्षकार यांस.

ज्या पेक्षां सदर्हू दाव्यांत ज्यांचा एकच प्रकारचा हित अनहिताचा संबंध आहे असे अनेक पक्षकार आहेत.

१ [ अ ] सिवरतन सिंव्हवर्मा सेक्रेटरी श्री कुमार शंकरसिंग नेटिव जनरल लायब्ररी पातूरशेखबाबू.

यानें सदर्हु प्रकारचा हित अनहिताचा संबंध असलेल्या सर्व पक्षकारांतर्फे सदर्हू दावा चालविणें याबद्दल कोर्टाची परवानगी घेतली आहे त्यापेक्षां सदर्हू प्रकारचा हित अनहिताचा संबंध असलेल्या सर्व पक्षकारांस नोटीस देण्यांत येत आहे कीं या कोर्टांत सदर्हू दावा तारीख १ माहे सप्टेंबर सन १९०३ इसवी रोजीं केला आहे. त्यांस ही जाहिरात प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तारीख ४ माहे सप्टेंबर सन १९०३ इ.

C. H. Price
जडज्य

## नोटीस

बेशरमी पार्वती मर्द नथु उर्फ लक्ष्मण पाटील राहणार शेळद तालुका बाळापूर—यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मला एक छापील नोटीस दिलीस ती पावली. नोटिशींतला मजकूर पाहून मला फार वाईट वाटलें आणि मी देवाला बोल लावला. अशी नोटीस देणारी तूं बायको कसची! त्राटिका किंवा अवदसा आहेस. ज्या खरेदी लताच्या गोष्टी तूं लिहितेस त्याची वरची हकीकत मी योग्य प्रसंगीं उजेडांत आणीन. तूं मुलींची व जावयाची घरें भरत आहेस व अद्वातद्वा ही नोटीस दिलीस. तुला घरांतून काढून मी दिलेंच आहे. त्या तुझ्या खरेदीतील शेती व घर ताब्यांतच आहेत. तूं कृतघ्न आहेस. तूं घरांतला सोन्या चांदीचा दागदागिना अदमासे ३ तीन हजार रुपये किंमतीचा लांबविला आहेस तर गुण्या गोविंदानें माझ्यापाशीं आणून दे. नाहीं तर, फौजदारी कोर्टात तुझ्यावर व तुझ्या साथीदारावर दागदागिन्याबद्दल फिर्याद करण्यात येईल. तुझ्या दुर्गुणामुळेंच मी दुसरी बायको केली आहे. ती सवत तुझ्या डोळ्यांत सलते आणि ह्मणूनच तूं दागिने चोरण्याचा प्रयत्न चालविला आहेस. ह्या खरेदींतील घराचा व शेताचा मी मालक आहे. त्या खरेदीच्या भरण्याची रकम रुपये १०० तूं आपल्या बापाच्याच घरची आणली असली तर ही नोटीस कांहीं तरी शोभली असतीस असो. दागदागिना आणून आठ दिवसांत पोंचता करावा, नाहीं तर योग्य ती तजवीज केली जाईल. कळावें. तारीख ७ माहे सप्तेंबर सन १९०३ इसवी.

सही
नथू उर्फ लक्ष्मण उतराजी पाटील
राहणार शेळद ता. बाळापूर
निशाणी खबर.

## जाहिरात

सर्वत्र साहू सावकारांस व इतर लोकांस या जाहिर लेखानें कळवितो कीं माझी बायको नामें पार्वती इनें सोन्या चांदीचा दागिना मला न कळत लांबविला आहे. तर जो कोणी तिच्या कडून किंवा तिच्या मार्फतीनें विक्री किंवा गहाण घेईल तर तो व्यवहार माझ्या इस्टेटीला बांध शकणार नाहीं; आणि ती चीजवस्तु मुकाट्यानें परत करावी लागेल. ह्मणून सूचनार्थ ही जाहिर नोटीस दिली आहे.

सही
नथू उर्फ लक्ष्मण उतराजी पाटील
राहणार शेळद तालुके बाळापूर निशानी खबर.

नोटीस

शेख वजीर महमद राहणार चांदूर तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा मी सही करणार असें कळवितों कीं तुह्मी माझी खानदान काढली आपण आमचे काय पाहिजे याचा जबाब आपण असिस्टंट कमेटींत जबाब द्यावा नाहीं तर पंचामध्यें येऊन सही गाई करावी. सदरहू कारणास आह्मी तह्मास आज ८ दिवसाची मुदत देतों जर तर आह्मी फौजदारी करूं. कळावें, तारीख ५।९।०३ इसवी.

सही
नावदारखा यासीनखा दस्तुर
निशाणी खुद्द.

नोटीस

सेख अमीर व० वजीरमहमद राहणार चांदुर तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा यांस

नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्नास सात वर्षे झालीं आपासून आपण मला दोन वेळ घरीं नेलें मला आपण मारहाण करून ह्मणून दिले सात वर्षे झालीं तेव्हांपासून मी आईचे बापाचे घरीं राहिले आहे तेव्हांपासून आजपर्यंत सावकाराचें कर्ज रुपये २०० करून निर्वाह केला. आतां कर्ज मिळत नाहीं मी नांदण्यास कबूल आहे सबब सावकाराचे कर्ज देऊन मला नांदण्यास घेऊन जावें या प्रमाणें ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तजवीज न केल्यास मी माहेतराचा नवरा करीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. कळावें. ता. ५।९।०३ इ०

सही
अनवर बी मर्द सेख अमीर राहणार मजकूर ता. मलकापूर
जि० बुलढाणें नि. खुद्द

## स्त्रियांच्या शिवण कामाचें व इतर कामाचें प्रदर्शन.

यवतमाळ येथें येत्या दिवाळीच्या सुमारास कुशलतेचें प्रदर्शन भरविण्याचा विचार केला आहे. प्रदर्शनात पाठविलेल्या जिनसा मध्यें परिक्षकांच्या मतें ज्या जिनसा उत्तम ठरतील त्याबद्दल तीन बक्षिसें त्या जिनसा करणारांस दिलीं जातील. बक्षिसाचे तीन वर्ग होतील. सदरहु बक्षिसें ठरविण्याची व्यवस्था तीन सभ्य स्त्रियांच्या कमिटी कडून केली जाईल त्यांचीं नावें व बक्षिसांच्या रकमा मागाहून कळविण्यांत येतील. सदरहु प्रदर्शनास सर्व सभ्य स्त्रियाची मदत पाहिजे आहे. ती त्यांनीं वर्गणीद्वारा व प्रदर्शनाला जिनसा पाठवून करावी अशी त्यांस विनंती आहे जिनसा पाठविणें त्या चांगल्या व्यवस्थित रितीनें पेट्यांतून बंद करून पार्सलानें पाठवाव्या जिनसा विकण्याच्या अगर पाठवावयाच्या ह्याबद्दल पाठविणारांनीं स्पष्ट खुलासा करावा. परत पाठविण्याच्या जिनसा काळजी पूर्वक पेट्यांत घालून ज्यांच्या त्यांच्याकडे पाठविल्या जातील व विकलेल्या जिनसांची किंमत ज्यांची त्यांच्याकडे मनीआरडरीनें पाठविली जाईल. जिनसा पाठविणें त्या सौ० वती रखमाबाई भट यांचे नावें रा० गोपाळ नारायण भट वकील ह्यांचे घरीं अशा पत्यावर पाठवाव्या.

रेल्वे पार्सलानें पाठवावयाच्या जिनसा धामणगांव स्टेशन जी० आय० पी० रेल्वे नागपूर ब्रँच येथें पाठवाव्या.

सौ० पार्वतीबाई द्रवीड.
सौ० रखमाबाई भट.
सौ० राजूबाई नायडू.


ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

ह्याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रमेह, कोंच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व धारण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांचा कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:—

३६ गो० १ रु० ७६ गो० २ रु०
११६ गो० ३ रु० १६६ गो० ४ रु०
२७६ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा कयाटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंबरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी



छपत आहे !

लवकरच प्रसिद्ध होणार

सरस्वतीप्रकाशमाला

किरण दुसरें!

रा० रा० रामचंद्र यशवंत वेसकर (राणी संयोगिता नाटकाचे कर्ते) कृत.

प्रतापशाली

प्रतापसिंह

एक वीररस परिप्लुत पंचांकी नाटक.

वरील नाटकाचें कथानक चटकदार व संस्मरणीय असून यांत वीररस प्रधान आहे. केवळ दुःख रस अथवा वीर रसच परिप्लुत नाटक कित्येक कोमल अंतःकरणाच्या वाचकांना आणि प्रेक्षकांना सर्वतोपरि रुचत नाहीं असा अनुभव आल्यावरून या नाटकात कांहीं ठिकाणीं हास्य व श्रृंगार या दोन्हीं रसांना जागा दिली आहे.

फक्त तारीख १५ सप्टेंबर पूर्वी नांवें रजिष्टर करणारांसच किंमत ८ आणे. पुढें १२ आणे.

K. D. CHAUHAN
संपादक सरस्वती प्रकाश
उमरावती.



जाहीर खबर

खरेदी करा !

रास्कोपची पेटंट व खरी पेटेंट वॉचेस

नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकाचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट रेन्स ऑफिसर व इतर प्रवासी लोकांस हें वाच देणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रतीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपलीस्वतःच शिफारस

आजपर्यंत करीत आलों आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखी मदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस ....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ...........२५०

मेटलचें तीन वर्ष ग्यारेंटीचें.

[illegible] पेटंट २१ लाईन एकदटा स्प्रींग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलें ................१२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ...................२०

इनामलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग.......................२८
१४ ,, रिस्टवॉच...................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग.......................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ...........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .....................४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिंगीगर आणि कंपनी.

ओरिजनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY*.

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु. १॥.

तापावर एग्युक्श्चर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता—खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यासह. पाठव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवचन यांसह. मार्चपसून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५॥६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

## मुंबई बॅंकची सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकी एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

अति स्वस्त! **ज्ञानविलास** अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी युउपक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी. नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापू.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अकसीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंडते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणे, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे

REGISTERED No.

आकोल्यांतील लोकांस.................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास...................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०|१ ०|
दुसरे खेपेस.... ....... ०|

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 a

Advertisement
below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ...... 3 a
Repetitions Per line ,, 2 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 21 SEPTEMBER 1903 NO 37

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २१ माहे सप्तंबर सन १९०३ इ० अंक ३७

THE
*GLOBE STORES Co.,*
GENERAL MERCHANTS

*Transacts Business of all Sorts.*

UNDERTAKES AGENCY FOR:
Supplying Machinery for
Mills, Presses, Gins &c.

**CONTRACTORS AND IMPORTERS**

OF EVERY DESCRIPTION OF MACHINERY & MATERIALS IN BRASS, COPPER, GUN-METAL, WROUGHT AND CAST IRON

Building Materials, Gin and Mill Stores.

*Water Tanks Fencing &c.*

Beams Columns, Road Rollers. Straight & Spiral Stairs.

*Orders Promptly and Carefully Executed On The Most Reasonable Terms.*

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अभ्रक सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ०।६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ गो० | १ रु० | ७९ गो० | २ रु० |
| ११९ गो० | ३ रु० | १६९ गो० | ४ रु० |
| २७९ गो० | ६ रु० | ५९० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—-अलिकडे २।३ वर्षे अंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळयांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

## कर्मयोग.

( रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांचा निबंध )

ही सर्व सृष्टि निष्कारण निर्माण झाली असें नाहीं. प्रत्येक सृष्ट-वस्तूला इतिकर्तव्यता म्हणून आहेच हें, सृष्टींतील नेहमीं चालणाऱ्या घडामोडी वरून आपले लक्षांत आलेंच पाहिजे. या नियमानुरूप मनुष्यास ही इतिकर्तव्यता आहे, हे सांगणें नको. हें इतिकर्तव्य कोणतें तें, अनादिकाळापासून होत आलेल्या सर्व ज्ञाते पुरुषांच्या मतानें ठरलें आहे. तें हें कीं जन्ममरणापासून मुक्त होणें. अशी मुक्ति कशी मिळूं शकते हेंही पण त्यांनीं अनुभवसिद्ध सांगितलें आहे. मुक्ति मिळविण्याचे तीन मार्ग आहेत; कर्म मार्ग, ( याला भक्तिमार्ग असें ही म्हणतात ) उपासना मार्ग आणि ज्ञानमार्ग. या तिहीं पैकीं कर्ममार्गाविषयीं दोन शब्द आपले कानावर घालावे असा माझा विचार आहे; आपण सुप्रसन्न चित्त करून तिकडें अवधान द्याल, अशी उमेद बाळगून, या कार्यास आरंभ करितों.

मुक्ति प्राप्तीचे मार्ग तीन आहेत असें सांगितलें आहे हें खरें तथापि ते एकच होत असें एका दृष्टीनें म्हणणें भाग पडतें. या प्रत्येक मार्गाच्या आचारांत मात्र फरक आहे, तथापि सर्वांचे पर्यवसान एकेच ठिकाणीं होतें. त्यांची बाह्य स्थिति निरनिराळी दिसते पण ते सर्व एकाच वस्तूची प्राप्ति करून देतात. या प्रत्येक मार्गाचें अवलंबन करून आचरण ठेविलें असतां कालांतरानें प्रत्येक मार्ग दुसऱ्या दोन मार्गांत मिसळतो व यांचे व याचे गुण एक होतात. जेव्हां हे मार्ग " योग " या नांवाला पात्र होतात. तेव्हां वर सांगितल्या प्रमाणें ते एकमेकांत मिसळून त्यांचें वास्तविक स्वरूप एक होतें. या मार्गांचे पृथकत्वें आचरण करण्याचा सर्व मनुष्यांचें आंगीं सारखीं लक्षणें दिसूं लागतात; शेवटीं ते सर्वजण एकाच तोडीचे होतात. ह्या वेळेपासून तिन्ही मार्गांचें पर्यवसान ( आत्मस्वरूपीं मिळणें ) एकच आहे असें स्पष्ट दिसूं लागतें.

३ या तिन्ही मार्गांचें विवरण भगवान श्रीकृष्णांनीं फार उत्तम रीतीनें केलेलें आहे व या पूज्य निबंधास " भगवद्गीता " हें नांव आहे. आसक्ति न ठेवितां कर्म कसें करावें, व त्यामुळें कर्मबंधाचा नाश कसा होतो, व अखेरीस जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मनुष्य कसा मुक्त होतो, हें या " गीतेंत " सांगितलें आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या दोन मार्गांनीं गेलें असतांही भगवंताची प्राप्ति कशी होते, हें ही तींतच सांगितलें आहे. या तिन्ही मार्गां पैकीं कोणत्याही मार्गाचा स्वीकार करून वर्तन ठेविलें असतां " तो परमात्मा " खास्त्रीनें भेटले असें स्वतः भगवान सांगतात.

४ आपण या सृष्टीकडे पाहूं लागलों असतां असें दिसून येतें कीं, प्रत्येक वस्तु " आत्म्या " चा शोध करित आहे. आता सर्वच तसें समजून करितात असें म्हणतां येत नाहीं बहुतेक तसें न समजतांच वागत आहेत. सृष्टींतील सर्व वस्तु आत्म्याचा शोध करीत आहेत असें सिद्ध करण्यास बरेंच स्पष्टीकरण करावें लागेल; व तो ज्या अर्थी आपला आमचा मुख्य विषय नाहीं, त्या अर्थीं, त्यांचे मागे न लागतां, मनुष्य सृष्टीचाच आपण आज विचार केला तरी पुरे आहे असें मला वाटतें. कोणताही मनुष्य घ्या. तो आपण काय करीत आहों हें न समजून आंधळ्या सारखा वागत असो, मूर्खपणानें वागत असो, चुकीनें वागत असो, सद्भाव रीतीनें वागत असो, तरी तीं त्याची वागणूक आत्म्याचे शोधार्थच आहे असें यापुढें आपणास दिसून येईल. सृष्टींतील सर्व वस्तूंची हालचाल याच हेतूनें चालली आहे. यास अधुनिक पाश्चिमात्य शास्त्रकार " Evolution " असें म्हणतात. असो. मनुष्यमात्र आत्म्याचा शोध करीत आहे असें म्हटलें यावरून त्यांचे कर्तृत्वाचा व्हावा तसा बोध होत नाहीं. तो व्हावा या करितां आत्म्याचें, स्वरूप काय हें सांगितलें पाहिजे. तो आनंदस्वरूप आहे असें संतजन सांगतात. या व्याख्ये प्रमाणें वरील सिद्धांताचा असा अर्थ होतो कीं मनुष्यमात्र आनंद म्हणजे सुख मिळविण्याचे खटपटींत आहे.

५ आतां सर्वांनींच एकाच गोष्टीकरितां खटपट कां करावी बरें ? यावरून असें अनुमान निघतें कीं सर्वांचा आत्मा एकच आहे. या आत्म्याच्या शोधार्थ प्रत्येकजण निरनिराळी खटपट करीत आहे, या वरून, स्थूल दृष्टीनें पाहिलें असतां, वरील सिद्धांतावर अविश्वास उत्पन्न होण्याचा संभव आहे. तो होऊं देऊं नये अशी प्रार्थना करितों. शिष्याला गुरूनें एकादी त्याच्या माहितींत नसलेली नवीन गोष्ट सांगितली म्हणजे तो प्रथम. बुचकळ्यांत पडतो कीं हें असें कसें असेल. त्या सरसें त्यानें गुरुवाक्यावर अविश्वास ठेविला तर त्याचेंच नुकसान होतें. चांगला शिष्य गुरू सांगतात तें बरोबर असलेंच पाहिजे, आपल्या समजुतींत तें भरत नाहीं, असें जाणून समजूत होण्या करितां काळाची अपेक्षा करितो. सर्वांचा आत्मा एकच आहे या सिद्धांताची सत्यता समजण्या करिता अति सूक्ष्म दृष्टि पाहिजे. तशी दृष्टी प्राप्त होई पर्यंत जगद्गुरु भगवान् श्रीकृष्ण यांनी गीतेंत उक्ति आहे तिजवर भरंवसा ठेऊन चाललें असतां यथाकालीं योग्य ज्ञान होईल. भगवान म्हणतातः—

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्व विनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥

२७ ॥ अ. १३

अस्तु. मनुष्यमात्र समजून अगर न समजून सुखाच्या मागें धांवत आहे ही गोष्ट तर आपणा सर्वांस मान्य असलीच पाहिजे. प्रथमतः आपण करीत आहों हें बरोबर आहे किंवा चुकीचें आहे याचा विचार न करितां तो आंधळ्या सारखा सुखप्राप्तीच्या मागें लागतो. कालांतरानें त्याचें वर्तन ज्ञानयुक्त होतें. अमुक एक प्रकारचें सुख चांगलें आहे व तें प्राप्त करून घेण्यास अमुकच उपाय केला पाहिजे असा विचार उत्पन्न होऊन तो त्यापुढें त्या प्रमाणें वागूं लागतो.

( पुढें चालूं )

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ३० शके १८२५

## प्लेग

ही आपदा आमच्या प्रांताच्या मार्गे पुरी लागली आहे. ही ईति ह्मणजे ईश्वरी क्षोभाचें प्रत्यक्ष दर्शन होय. हा रोग असा भयंकर आहे कीं तो एक वेळ कोणाला झाला ह्मणजे तो रोगी मेलाच असें लोक गृहित धरतात. अशा प्राणसंकटांत मनुष्याचा इलाजच हरतो! या रोगाचा संसर्गदोष फार मोठा आहे; किंबहुना रेल्वे गाडी जशी तारेचा एक एक खांब घेत घेत पुढें धावत जाते तद्वत हा रोग फैलावत जातो. त्या मार्गांत जो भाग येईल तो दूषित होऊं लागला ह्मणजे तेथें असलेलीं माणसें या रोगाला बळी पडतात. या रोगाचें बीज एक रोगी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेत असेल परंतु त्याचा क्रम असा दिसतो कीं तो हळूं हळूं दावानळा प्रमाणें सर्व भाग उध्वस्त करीत सुटतो, ह्मणूनच आह्मी ह्मणतों कीं हा रोग स्थलविशिष्ट जितका होतो तितका व्यक्तिविशिष्ट होत नाहीं. जर एका वेटाळांत रोग उद्भवला तर निदान कांहीं काल पर्यंत निदान दुसऱ्या वेटाळांतील लोकांस या रोगाविषयीं निःशंक राहतां येते. स्थलसान्निध्यानें हा जसा वाढत जातो तसा व्यक्तिसान्निध्यानें वाढत जात नाहीं. या ह्मणण्याचा भावार्थ इतकाच कीं प्लेगाचा दूषित भाग सर्वथैव त्याज्य समजावा. प्लेगाच्या भागाला स्मशाना प्रमाणें समजलें पाहिजे. त्या भागांतून जो रोगी येईल तो आपल्या रोगाचें बीज दुसरीकडे नेतो. आणि तसेंच त्याच्या जवळील मंडळीस तो रोगाचा संसर्ग लवकर पोंचवितो. परंतु ही गोष्ट प्लेगाच्या दूषित भागांतून येणाऱ्या निरोगी लोकांस लागूं नाहीं. प्लेगानें मृत झालेल्याचें प्रेत हा रोग फार विस्तृत करितें ह्मणून प्रेताचा संसर्ग न होईल अशीच व्यवस्था पाहिजे.

वरील प्रकारचा अनुभव पुनः पुनः आह्मी सांगतो यांत आमचा एक हेतु आहे. या माहितींतच प्लेगापासून निवारण करण्याचे मार्ग ध्वनित केलेले आहेत. पहिला आणि सर्वोत्तम प्रतिबंधक उपाय ह्मटला ह्मणजे स्थानत्यागाचा होय. हा उपाय पुराणान्तरींही सांगितलेला आहे. जंगलांत पर्णकुटिका बांधून त्यांत राहावें ह्मणजे सृष्टींतील मोकळी हवा व सूर्यप्रकाश यांनीं शरीरास आरोग्य होऊन पुष्टीही येईल. वानप्रस्थ आश्रमाचा अंगिकार हीच प्लेगावर रामबाण मात्रा होय. दुसरा उपाय कनिष्ठ प्रतीचा आहे. निरुपायामुळें स्थानत्यागाचा आश्रय करवत नाहीं तेथें गृहाच्या शुद्धीकरणाचे उपाय अगोदर योजावे. होमहवनादि कार्यांनीं एक विलक्षण [illegible]

इत्यादि द्रव्यें नित्यशः घरीं जाळावीं ह्मणजे हवा शुद्ध व निरोगी होते. शुद्धता ही परमेश्वराला फार आवडते. उजेड आणि हवा हीं बरोबर जितकीं खेळतीं राहतील तितकीं तीं फार हितकर होतील. लिंबाचा पाला जाळून घरांत त्याचा धूर कोंडल्यानें प्लेगाचे कृमी मरतात असा गुजराथेकडील लोक अनुभव सांगतात; आणि आमच्या प्रांतांत लिंबाचा पाला पुष्कळसा पिकल्या सारखा आहे. तेव्हां याचा उपयोग करण्यास आळस करूं नये. लिंब हा वृक्ष मोठा औषधिक आहे. क्षयरोगी याच्या छाये खालीं वास्तव्य करून दीर्घायु होतात असें ह्मणतात. तेव्हां याच्या पानाचा धूर चांगला उपयोगी असावा असें वाटतें. जी जागा ओलसर, दमट व दुर्गंधीची असेल तेथें आणि जेथें मोऱ्या, गटारें व डाहरे असतात तेथें राकेल तेल जाळावें ह्मणजे त्याच्या दर्पानें व तापानें दोषिक द्रव्यें व जीव जंतु नाहींतसे होतात असा अनुभव आहे. हा उपाय योजल्या पासून हिंवतापाची सांथही दूर होते असा अनुभव डाक्टर लोक सांगतात.

प्लेगाचा रोग झाल्यानंतर कोणता उपाय करावा या विषयीं एकवाक्यता नाहीं आणि एखादा रामबाण उपायही अजून आढळला नाहीं. तथापि विद्वान डाक्टर लोक, हकीम, व वैद्य अनुभवानें सांगतात कीं शरीराचीं द्वारें ह्मणजे त्वचा, मुख, गुद व लिंग हीं होत. यांच्या द्वारानें शरीरांतील दोषिक द्रव्यें बाहेर पडतील अशी औषधाची तजवीज पाहिजे. मलमूत्राचा उत्सर्ग होईल, त्वचेच्या रंध्रांतून घर्म चांगला बाहेर येईल, आणि श्वासोच्छ्वास नीट चालूं लागेल असे उपाय केले पाहिजेत. या रोगांत मलमूत्राचें विसर्जन होण्यासाठीं बस्तीचा प्रयोग चांगला उपयोगी पडतो. घाम आणण्यासाठीं बाह्यतः वाफारा वगैरे देण्याचा उपाय करणें धोक्याचें नाहीं. श्वासोच्छ्वास आरोग्यप्रद होण्यासाठीं गृहाची शुद्धता उत्तम राखली पाहिजे. वरील कथनांत रोगावरील उपायाची दीशा दाखविली आहे. रोग्याला तकवा व शक्ति वाटण्यासाठीं हलकें पेय व सहज पचणारें अन्न द्यावें. अन्नपाण्याची शुश्रुषा जितकी व्यवस्थशीर होईल आणि जास्त अन्न पोटांत न जाईल तितकें बरें.

---

पंजाबांतील प्रसिद्ध राजा गुरुदयाल सिंह हे मरण पावले त्यापूर्वीं त्यांनीं आपल्या मिळकतीचा बराच भाग मृत्युपत्रानें लोकोपयोगी कृत्याकरितां राखून ठेवल्याचें आमच्या वाचकांस माहीत असेल. परंतु राजा गुरुदयाळ सिंह हे शीखधर्मानुयायी असल्यामुळें व शिवाय भक्ष्याभक्ष्य, पेयापेय ह्या संबंधाचा निर्बंध यथास्थित आपल्या हयातींत पाळीत नसल्यामुळें, त्यांना हिंदुधर्म शास्त्राचे नियम लागूं नाहींत अशा आशयाची तक्रार त्यांच्या विधवेतर्फे घेण्यांत आली होती. सदर्हू दोन्ही तक्रारींचा निकाल पंजाबांतील वरिष्ठ कोर्टानें विधवेविरुद्ध केला होता. ह्या प्रकरणांत अखेर अपील विलायतेंत असलेल्या प्रिव्ही कौन्सिलकडे करण्यांत आलें आणि त्याचा निकाल सदर्हू विधवे विरुद्ध करण्यांत आला आहे. ह्या ठरावा अन्वयें दोन महत्वाच्या कायदेशीर मुद्यांचा निकाल लागला आहे. शीख धर्मानुयायी हे आचारांत जरी मुसलमानासारखे आहेत तरी त्यांचा विवाहसंबंध हिंदु लोकांशी होत असल्यामुळें व खानेसुमारीचे वेळीं बरेच शीख लोक आपणांस हिंदु ह्मणवीत असल्यामुळें, शीख लोकांनां हिंदुधर्म शास्त्रच लागूं असावें हें रास्त होय. त्यांच्या प्रमाणें भक्ष्याभक्ष्य किंवा पेयापेय केल्यामुळें हिंदुधर्मशास्त्राचें बंधन कमी झालें असतें तर एखादा मनुष्य ओंवळ्यानें जेवतो, किंवा इतर हिंदु आचार तो पाळीत नाहीं अशा सबबीवर त्याला हिंदु धर्मशास्त्र लागूं होत नाहीं अशा तऱ्हेच्या कित्येक क्षुल्लक तक्रारी ह्यापुढें अस्तित्वांत आल्या असत्या व त्या योगानें कुटुंबांतील स्वास्थ्य व शांतता हीं बऱ्याच अंशानें कमी झालीं असती. परंतु सुदैवानें तो प्रकार ह्या निकालानें बंद होईल.

---

मुंबईंत ट्रेचर आणि कंपनीच्या एका युरोपिअन नोकरानें दुकानांतील चांदीचे पेले, बशा वगैरे अजमास ९०० रुपये किंमतीचा माल चोरला अशा बद्दल सदर्हु युरोपिअनावर मुंबई येथील प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट मि० दस्तुर यांचेपुढें नुकताच खटला करण्यांत आला. त्यांत आरोपीवर गुन्हा शाबीत झाल्याचें ठरवून, मास सदर्हु माजिस्ट्रेट साहेब ह्यांनीं ३ महिन्यांची शिक्षा दिली. तसेंच पंजाब प्रांतांत ले. रेनिक ह्या नांवाच्या लष्करी अधिकाऱ्यावर नुकताच खटला करण्यांत आला होता. त्याची हकीकत थोडीशी चमत्कारिक आहे. लेफ्टनंट साहेबाच्या पैशांनीं चोरी केल्याबद्दल संशय आल्यावरून, त्यांचा झाडा घेण्याकरितां अल्लारख्ख ह्या नांवाचा इसम, पोलिस इन्स्पेक्टर व दोन युरोपिअन शिपाई इतके इसम गेले असतां लेफ्टनंट साहेब ह्यांनीं अल्लारख्ख यास चोप देऊन व लत्ताप्रहार करून खांबाशीं बांधून ठेविलें असा त्यांजवर आरोप होता. सदर्हू गुन्ह्याची चौकशी लाहोरच्या डे० कमिशनर साहेबापुढें झाली. लेफ्टनंट साहेब ह्यांनीं फिर्यादीस चोप दिल्याबद्दल कबूल केलें परंतु त्यास लत्ताप्रहार देऊन कांहीं काळ पावेतों बांधून ठेवल्याचें नाकबूल केलें. अखेरीस सदर्हू चौकशींत आरोपी विरुद्ध दोन्ही गुन्हे शाबीत झाले असल्याचें डे० कमिशनर यांनीं आपल्या ठरावांत ह्मटलें आहे. परंतु हल्लीं खात्यांतून आरोपीस बरीच शिक्षा ह्या पूर्वीं देण्यांत आली आहे ह्मणून दयार्द्र अंतःकरणानें न्यायाधिशांनीं आरोपीस फक्त ९० रुपये दंड केला आहे. आमच्या प्रांतांत आरोपीस कडक शिक्षा देण्याची ज्या माजिस्ट्रेटांस सवय आहे त्यांनीं ह्या दोन्ही खटल्यावरून योग्य बोध घेतल्यास बरें होईल!

---

उमरावतीस प्लेगानें तर कहर उसळून दिला! त्या शहरची लोक संख्या ३४ हजार होती पण निदान दहाबारा हजार लोक गांव सोडून गेले आहेत तरी देखील तेथें प्लेगाच्या मृत्यूंची संख्या दररोज ६०।७०।८० अशी आहे. हा आंकडा फारच भयंकर स्थिती दाखवितो. सर्व शहर उध्वस्त झालें आहे. आकोटास प्लेगाची संख्या २०।२५ वर गेली आहे, आकोल्यास अगरवेशीचा वायव्यभाग अगदीं प्लेगग्रस्त झाला आहे. दररोज चार पांच मृत्यु होतात. तेथून तो पूर्वेकडे हळूं हळूं पसरत आहे. अगरवेशीच्या निरोगी लोकांनीं तो दूषित भाग सोडावा ह्मणून मे. रुस्तुमजी साहेब फार प्रयत्न करीत आहेत. प्लेगाची वृद्धि होऊं नये ह्मणून हर प्रयत्न चालूं आहेत. आमचे डिपुटी साहेब फार काळजी वाहतात आणि ते प्लेगाच्या रोग्याकडे स्वतां जाऊन शोधसमाचार घेतात. हें त्याचें धारिष्ट व कनवाळूपणा हीं खरोखर प्रशंसनीय आहेत. आकोल्यास हल्लीं उमरावती व आकोट येथून पुष्कळ लोक वस्तीला येऊं लागले आहेत आणि त्यांच्या संसर्गानें हा रोग अधीक जबर होण्याची मोठी भिती पडली आहे. आकोल्यास मृत्यूचें प्रमाण अधिकाधीक वाढत आहे. गरीब लोकांच्या झोंपड्यांची योजना केली आहे. शिलोडे, नागगांव, खडकी, मलकापूर, शिवणी, शिवर, उमरी व अकोली या आसपासच्या खेडेगांवांतील एक एक गोठाणाचा, बिनआकारी, किंवा माफी चराईचा नंबर मुद्दाम आकोल्यांतील लोकांसाठीं राखून ठेविला आहे. त्या जागेवर लोकांनीं झोंपड्या बांधाव्या अशी सदर परवानगी आहे.

सध्या प्लेगानें उमरावती, आकोट, आकोला, वाशिम, मूर्तिजापुर इत्यादि गांवें पछाडलीं आहेत तरी त्याचा तुरळक प्रदुर्भाव बुलढाणे जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं होऊं लागला आहे. गेल्या दीड दोन वर्षांत रेल्वेचा टापू प्लेगानें घेतला होता पण त्याचा प्रवेश आतां या प्रांताच्या अंतर्भागांत विशेष होऊं लागला आहे. ईश्वरी नेमानेमा पुढें माणसाचा इलाज नाहीं!

प्लेगामुळें प्रापंचिक आपत्ति कोणत्या उद्भवतात यांची अटकळ शब्दद्वारा होण्यासारखी नाहीं. हा प्लेग तरुण मंडळीला फार लवकर पछाडतो. प्रपंचाचा भार वाहण्यासारखी कर्ती मंडळी पटापट मरत आहेत. कोणाचें दुःख कोणाला सांगायला नको व तें कोणाला ऐकायलाही नको असा प्रकार झाला आहे. ईश्वरावर भरंवसा ठेवून तो जो दिवस आणील तो सुदीनच ह्मणून मनांत शांति धरण्याला शिकावें!

---

स्थानिक कारभाराचा मूळ पाया ह्मणजे जिल्हा बोर्ड व मुनसिपालिट्या या संस्था समजतात. या श्रीगणेशा धड्या पलिकडे आमची पारंगतता होत नाहीं इतकेंच नाहीं तर अलिकडील धोरण या संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबी कमी करण्याकडे आहे आणि सर्व सूत्रें सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं ठेवण्याकडे आहे. खरोखर या संस्थांस पैशाचें साधन मिळावें ह्या साठीं स्थानिक सरकारानें आपल्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं कांहीं सदर्हू संस्थांकडे सोंपविल्या पाहिजेत; व त्या बाबीं पासून उत्पन्न होणारी रक्कम इतकी असावयास पाहिजे कीं कालानुसार खर्च वाढविणें जरूर पडलें तरी तो सदर्हू रकमेंतून भागवितां आला पाहिजे. हें तत्व हिंदुस्थान सरकारानें वेळोवेळीं आपल्या

खलित्यांतून प्रसिद्ध केलें आहे; तथापि ह्या विरुद्ध तत्व आमच्या प्रांतांत प्रचारांत असलेलें पाहून आह्मास फार दुःख होंत. अकोलें म्युनिसिपालिटीच्या हद्दींत असलेल्या घरें बांधावयाच्या जागा वरील मालकी खरोखर म्युनिसिपालिटीकडे असणें रास्त आहे आणि सदर्हू जागांवरील भाडें वसूल करण्याचा हक्क म्युनिसिपालिटीचा आहे असा सदर्हू म्युनिसिपालिटीचा व सरकारचा आज पर्यंत समज होता असें दिसतें आणि ह्मणूनच सदर्हू भाड्याची रक्कम म्युनिसिपालिटी घेत असे. परंतु अलिकडे सरकारची कल्पना जास्त अकुंचित झाल्यामुळें कीं काय सदर्हू उत्पन्ना वरील मालकी म्युनिसिपालिटीची नसून आपली आहे असें सरकारानें ठरविलें! आकोलें येथचा व्यापार दिवस दिवस वाढत चालल्यामुळें सदर्हू भाड्याचें उत्पन्न दिवसें दिवस वाढत जाणार व त्या मानानें लोकांच्या सोयी पुरविण्या करितां म्युनिसिपालिटीस खर्चही जास्त करावा लागणार असें असून म्युनिसीपालिटीचा हक्क संकुचित केल्यानें तिजवरील बोजा मात्र अधीक वाढत जाणार! अशा तऱ्हेची विलक्षण स्थिति दृष्टोत्पत्तीस येत आहे; व खर्चाचा बोजा वाढविण्याविषयीं सरकाराकडून एका विवक्षित बाबींत येथील म्युनिसिपालिटीस आग्रह सुरू असल्याचें आह्मी ऐकतों. येथील लकडगंज ज्या जागीं पूर्वीं होता ती जागा सरकारानें अलिकडे येथील एका युरोपियन व्यापारी मंडळीस दिली व लकड गंजास दुसऱ्या ठिकाणीं ह्मणजे हल्लीं ज्या जागीं लहान व मोठे कमेले व सार्वजनिक पायखाना आहेत तेथें जागा देण्यात आली. त्या ठिकाणीं वरील इमारती असल्या मुळें, लकड गंजांत राहाणाऱ्या लोकांस व त्याच प्रमाणें गिऱ्हाईकांस बरीच गैरसोय होत असेल यांत संशय नाहीं. परंतु ही गैरसोय दूर करण्या करितां म्युनिसिपालिटीस जो खर्च करावा लागणार तो सरकारानें सोसावा हें रास्त आहे, कारण मागील लाभावर दृष्टी ठेऊन सरकारानेंच हा खर्च सोसला पाहिजे. पण ही न्याय्य गोष्ट मान्य होईल असें दिसत नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 14 1903

A new change is coming upon us. We shall pass from the administration of the Resident at Hyderabad into the hands of the Local Government of the Central Provinces. The first day of October 1903 is the most auspicious Dusara holiday of the Hindus and will mark the beginning of a new administration in Berar. Henceforth we shall not have the independence of a Local Government which was the special privilege of this province. The province was something like a Native State under the direct British administration. Berar looked like Greece of the Indian Europe. Hereafter it will be a part and parcel of the larger Central Provinces. The history of Berar under the British administration for over half a century is one of the gradual province into a smiling and promising 'Garden of the Deccan.' The British civilization has done an immense work in this province. It is exploited in an admirable manner and the British Government could hardly think of restoring such a rich and resourceful province to His Highness the Nizam. The question about rendition was shelved for years together and it was reserved for the august statesmanship of Lord Curzon to cut the Gordian knot in a happy and satisfactory manner. Whatever is done in the matter of the final arbitration of this question is now a matter of history. The future historian will record his views about the argument, persuation and reason that prevailed with His Highness the Nizam and will also lend his weight and support to the dignifying self—assertion of the paramount will. We shall cease to use the significant appellation of the province. The Hyderabad Assigned Districts will cease to exist as a politically independent unit of the Nizam's dominions. Here we close the final chapter of the history of these Assigned Districts which is full of glory to the British administration though it is not free from the growth of poverty in the midst of the masses.

The administration of Berar was carried upto now more or less on the lines of the Bombay Presidency. The educational machinery which was founded by Dr. Sinclair is fully in accord and harmony with that of Bombay. The revenue law is also an adaptation of the Bombay Revenue Law with some necessary changes consequent on the peculiarities of the province. These two unifying cements led this province into a closer communicotion with the more advanced Bombay presidency. The position of the province as one of the Nizam's dominions and as a component of the Shivaji's Maharashtra was more congenial to the union with the Bombay provinces than with the Central Provinces. However that may be in regard to our inclinations and propensities towards Bombay, we have been ordered to prepare ourselves to welcome our union with the Central Provinces. We give below the full text of the Government resolution which is so vitally important to the future interests of the province:—

"No 4246—*I. B.*—Whereas the Hyderabad Assigned Districts (otherwise known and hereinafter referred to as "Berar") have hitherto been administered through the Resident at Hyderabad:

And whereas it has been decided that, on and with effect from the 1st day of October, 1903, Berar should be administered through the Chief Commissioner of the Central Provinces:

In exercise of powers conferred by the Indian (Foreign Jurisdiction) Order in Council, 1902, the Governor General in Council is pleased to direct that all powers or authority conferred and functions or duties imposed on the Resident at Hyderabad by or under any law in force in Berar on the said date shall, on and with effect from such date, be deemed to be conferred or imposed on the Chief Commissioner of the Central Provinces, and that all references in any such law to the said Resident or the Local Government and to the Hyderabad Residency Orders shall, on and with effect from such date, be construed as referring to the said Chief Commissioner and to the

In furtherance of the above orders the Hon'ble the Chief Commissioner of the Central Provinces is going to pay this province his inaugural official visit within the second week of his administration. There will be a grand welcome accorded to this new ruler of the province and we are told that further details of administration will be decided upon in consultation with the heads of the serveral departments. The question of dividing this province into 4 or 3 districts will also claim the major portion of these deliberations. In the heat of curtailing expenditure of the Civil administration it will be remembered that Rao Bahadur R. N. Mudholkar has proved in his important contribution to the Times of India that there is not a great scope for further ecomony in this province. A comparison was set up between the Civil establishments of this province with those of the Bombay Presidency and it was shown that the greatest ecomony is already secured here and any further curtailment means the ill—advised starvation of the most important branches of administration. Let us hope that we are going to enter upon an unknown erra of progress, opulence and prosperity.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—उत्तरा नक्षत्राचा पाऊस बराच झाला आणि तो पीकाला फार चांगला होईल. प्लेगाचा रोग वाढतच आहे. लोक हवालदील आहेत.

१ ली आक्टोबर पासून 'मुलूख जमानी हैदराबाद' या संज्ञेनें या प्रांताला न संबोधता फक्त 'वऱ्हाड' प्रांत या नावानें त्याचा उल्लेख करण्यांत येईल आणि याचा राज्यकारभार हैदराबादच्या अलिशान रेसिडेंटाच्या मार्फतीनें न चालतां मध्य प्रांताचे नामदार चीफ कमिशनर यांच्या अधिकाराखालीं चालविण्यांत येईल असें लार्ड कर्झन साहेबांनीं फर्माविलें आहे.

वऱ्हाड प्रांताच्या पुढील राज्यकारभाराचा विचार करण्यासाठीं नामदार चीफ कमिशनर साहेबांची स्वारी १० आक्टोबराला वऱ्हाडांत येणार आहे.

यंदाची देऊळगांव राजाची यात्रा प्लेगामुळें भरणार नाहीं असा सरकारी हुकूम झाला आहे.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट पेनशनदार डिपुटी इनस्पेक्टर, उमरावती यांच्या कडील स्पेशल माजिस्ट्रेटीचे अधिकार काढून घेण्यांत आले.

मे. हेअर साहेब हे डिसेंबर अखेर कमिशनर राहतील आणि मागाहून मध्य प्रांतांतील मि. क्रॅम साहेब हे वऱ्हाडचे कमिशनर होतील असें रायपूरचा बातमीदार ह्मणतो.

कर्नल वारन हेस्टिंग्ज इनस्पेक्टर जनरल हे पुढील महिन्यापासून पेनशनीवर जाणार असून त्याचें काम मध्यप्रांताचे इनस्पेक्टर जनरल मि० क्लिव्हलांड हे पाहूं लागतील असें ह्मणतात.

काल सायंकाळीं रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे यांनीं 'मनुष्याच्या उच्चतम कर्तव्या' वर लिहिलेला उत्कृष्ट निबंध वाचण्यांत आला.

यरची परीक्षा होणार होती परंतु प्लेगामुळें ती बंद ठेवण्यांत आली.

रा० रा० कृष्णाजी अनंत तहशीलदार हे पेनशन घेणार असल्यामुळें इलिचपूरचे तहशीलदार यांची बदली मोर्शीस होऊन इलिचपुरास मि० सैफुद्दीनखान लालखान यांस तहशीलदार नेमण्यांत येणार आहे. प्र.

गेल्या १३ वे तारखेला रा० रा० रामचंद्र विनायक धर्माधिकारी बी. ए. यांनीं 'वाफेचें यंत्र' या वर व्याख्यान दिलें. वाफेच्या शक्तीची ऐतिहासिक उपपत्ति सांगून कसकशा सुधारणा होत गेल्या हें त्यांनीं गेल्या वीस वर्षांपर्यंत सांगितलें. अध्यक्षस्थानीं रा. रा. गोविंद विष्णु कोल्हटकर एंजिनिअर हे होते. यांचें भाषण फार गोड व विनोदी झालें. यांस यांत्रिक माहिती चांगली भरपूर आहे आणि त्यांनीं सांगितलें कीं आमच्या फ्याक्टरींत कोणी अभ्यास आस वाफेच्या यंत्राचें यथायोग्य ज्ञान करून देता येईल. यांच्या भाषणांत असा जोम होता कीं त्यानें यांत्रिक शिक्षणाची आवश्यकता सर्वांच्या मनावर चांगली बिम्बविली.

शाळाखात्यांत कांहीं मुख्य बदल्या अशा झाल्या आहेतः—

| रा. रा. | बदलीचें ठिकाण |
| --- | --- |
| कृष्णाजी मल्हार पेठणकर. | हेडक्लार्क, आकोला |
| रामचंद्र सदाशिव ढेले बी. ए. | डिपटी इनस्पेक्टर उमरावती. |
| बळवंत विष्णु वैद्य | डिपुटी इनस्पेक्टर आकोला. |

## बक्षीस

(हरवलेला किंवा चोरीस गेलेला दागिना सांपडून देण्यासाठीं)

आमच्या बंगल्यांतून थोडे दिवसापूर्वीं एक दागिना हरपला आहे. तो दागिना ह्मणजे सोन्याचा जडावाचा ब्रूच. हा लेडींचा दागिना आहे. यांत फिक्या हिरव्या रंगाचा नीलमणी आठ आणी एवढा पण चौकोनी असा बसविला आहे. हें रत्न विलायती असून दागिन्याची किंमत १०० रुपये अंदाजानें आहे.

दागिन्याची बरोबर माहिती कोणी लाऊन देईल किंवा कोणी तो आणून देईल तर त्याला चांगले इनाम आह्मी देऊं आणि हा दागिना कोठून व कसा आणिला या विषयीं कांहींच विचारणा करण्यांत येणार नाहीं असें आह्मी आश्वासन देतों.

आकोला १८।९।०३

(सही) बी. क्रे.

असिस्टंट कमिशनर.

## वर्तमानसार

लढाई— रशिया व जपान यांच्या मध्यें शहाला कोरिआ व मांचुरिआ हीं पडलीं आहेत. लढाईनेंच या वादाचा निकाल होईल.

मि. केनेट पुण्याचे स्पेशल माजिस्ट्रेट हे मोठे कार्यदक्ष दिसतात. सरकारी दंडाचा पैसा वसूल करण्यांत यांची बहादरी होय! राजश्री टिळक यांचें अपील चालूं आहे तरी पोलीस मार्फत जप्ती करून १००० रु० दंड वसूल करविला! या महापुण्याई बद्दल सरकाराकडून त्यांस सी. आय. ई. हा

चीफ जस्टीस—— मद्रास हायकोर्टाचे जज्ज सर एस. सुब्रमणी अय्यर यांना ६ महिन्या करितां चीफ जस्टीस नेमलें.

तीन वर्षे उशीर— म्युमौंठ येथें नुकतीच एक प्यासेंजर गाडी आली. ही सप्टेंबर ८, इ. स. १९०० रोजीं निघाली होती. परंतु मध्येंच तुफानामुळें रस्ता वगैरे अगदीं मोडून गेल्यामुळें तिला तीन वर्षे उशीर झाला.

नुकसान—– ट्रानवालच्या खाणींची स्थिति फारच वाईट झाली आहे. परपूर मजूर नसल्यामुळें दरवर्षी कमीत कमी २९, २१,००० पौंडाचें नुकसान होत आहे.

मृत्यु— लेडी कर्झन यांची चुलत बहीण पेनिनसाल्व्हेनिया प्रांतांत ॲटिरम येथें आगगाडीच्या अपघातांत सांपडून मरण पावली.

मान—– बादशहा सातवे एडवर्ड यांनीं ऑस्ट्रियाचे बादशहास आपले फिल्ड मार्शल व पोर्तुगालचे बादशहास ॲडमिरल नेमिलें. इ. कि.

गेल्या मंगळवारीं रात्रीं ११॥ वाजतां रंगून येथें धरणीकंपाचा धक्का बसला. विशेष नुकसान झालें नाहीं.

इंडियन डेलीन्यूज वरून समजतें कीं वऱ्हाड व नागपूर प्रांताकरितां लेफटेनेंट गव्हरनर नेमण्यांत येणार नसून चीफ कमिशनरच राहणार आहे. व ही बातमी फार विश्वसनीय आहे असें त्यांत लिहिलें आहे.

नगरास अजून ५१८ बोअर कैदी आहेत. व ते पुर्वीच्या प्रमाणें जो पर्यंत मित्रत्वाची शपथ घेणार नाहींत तोपर्यंत त्यांची सुटका होणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

निरनिराळया दस्तऐवजांत धंदा लिहिण्याची चाल असते. परंतु तो कोणी काळजीपूर्वक लिहीत नाहीं, ह्याबद्दल कांहीं तरी उल्लेख असतो. अशा लोकांवर खोट्या प्रतिज्ञेबद्दल खटले करण्याचा बूट निघाला असून सोलापूरास त्याप्रमाणें एक दोन खटले केल्याचें समजतें.

ब्रह्मदेशामध्ये दुष्काळ कामाची सुरुवात करावी लागली आहे. हल्लीं १११७ लोक कामावर लागले आहेत. मो. वृ.

मेकॅनीकल रिडर:— या नांवाचें एक यंत्र निघालें आहे डोळ्यास इजा न होता या यंत्राच्या योगानें बुक व वर्तमानपत्राचा मजकूर कानास एकूं येतो.

हुजाराचा आयदा:—– हिंदुस्थानांतील हुजाराचा कायदा हैदराबाद रेसिडेन्सी बाजार शिकंदराबाद कॅन्टोंमेंट व औरंगाबाद या ठिकाणीं लागूं झाला आहे.

डोळ्यावरून परीक्षा— प्रामाणिक मनुष्याचे डोळे काळेभोर असतात आणि लबाड लुच्चे लोकांचे तांबूस पिंगट असतात असें एका रशियन विद्वानाचें मत आहे.

नाशीक, काशीस, मनकर्णिकाच्या घाटावर मात्र प्रेत तळाशीं जातें भागीरथीचे पाण्यांत तो सर्वत्र तळाशीं जातो यांची कारणें कोणी शास्त्रज्ञ शोधक सांगेल काय. न्या०

कोलंबियाच्या युनिव्हर्सिटीला जोडून एक वर्तमानपत्रकाराचें कॉलेज काढण्यासाठीं मि० पुलिट्झर नांवाच्या एका दानशूर अमेरिकन गृहस्थानें चार लक्ष पौंडांची देणगी दिली आहे.

गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थानांत बी. ए. वगैरे परीक्षा पास झालेले लोक १४,३३९ आहेत व कायद्याच्या बाजूची परीक्षा झालेले ३६०३ आहेत. शिवाय वकिलीची परीक्षा निराळी!

मोटार गाड्यापेक्षां सुधारून फार उत्तम प्रकारच्या बनविलेल्या मोटार बायसिकल गाड्या, युरोपचे लोक वापरूं लागले असून त्यांचा प्रसार मुंबईतही थोडाथोडा होऊं लागला आहे.

कलकत्ता येथील एका बंगाली गृहस्थानें, एतद्देशीय आणि युरोपियन लोकांची लग्नें योग्य वधुवराबरोबर करण्याची एजन्सी स्थापिली आहे व त्यानें त्या कामाचें रजिष्टरही ठेवलें आहे असें कळतें.

आजपर्यंत अमक्ष पदार्थ, ठरलेल्या किमतीपेक्षां जास्त किमतीला विकल्यास त्याबद्दल खटला होत असे; ठरलेल्या किंमतीपेक्षां कमी किमतीला विकल्याबद्दल मुंबईंत एका मारवाड्यावर खटला झाला आहे!

कलकत्त्याच्या म्यु० कमेटीला ३० लक्ष रुपये कर्जाऊ पाहिजे होते, म्हणून त्याप्रमाणें तिनें टेंडरें मागविलीं होतीं; तीं ८४ लक्ष रुपयांची आलीं! त्यांतकी कमेटीनें तीन आण्याच्या भावानें हवें तेवढें कर्ज घेतलें. वि० वि०

पोलिस लोक गुरेंढोरें फाजील बाळगून त्यांजकडून शेतकऱ्यांचीं शेतें खावतात अशी ओरड झाल्यामुळें, सुरतेचे पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं, प्रत्येक पोलिसनें एक गाय व एक बकरी याहून जास्त गुरें बाळगूं नयेत आणि त्यांचा शेतकऱ्यांच्या शेतांना उपद्रव होऊं देऊं नये अशी खडखडीत ताकीद दिली आहे.

अमेरिकेंत एका ठिकाणीं युनिव्हर्सिटीची तोंडी परीक्षा चालली असतां पूर आल्यामुळें एका विद्यार्थ्याला तेथें जातां येईना तेव्हां अशी अडचण, टेलिफोननें त्यानें कळविली व टेलिफोनच्याच द्वारें त्याची ती परीक्षा घेऊन त्यास डिग्री देण्यांत आली. ई० प्र०

मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलचे व्हाईस प्रिन्सिपाल मि० बैरामजी फ्रामजी पटेल यांच्या मुलीनें थोड्या दिवसांवर जीव दिला होता म्हणून तिच्या मृत्यूच्या दुःखास त्रासून जाऊन त्यांनीं गेल्या आठवड्यांत आत्महत्या करून घेतल्याचें प्रसिद्ध झालें आहे. अलिकडे कांहीं दिवस यांचें मस्तक ठिकाणावर नव्हतें असें समजतें.

विजापुरास एका लिंबाच्या झाडांतून रस गळूं लागला, त्यावरून तेथील भाबडे लोक हें एक दुश्चिन्ह आहे अशा गैरसमजुतीनें घाबरून गेले आहेत. वृक्षाचा हा एक नैसर्गिक धर्म आहे. यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं असें तेथील प्रकाशककारांनीं लोकांस सुचविलें आहे.

बेल्जियममधील कारखान्यांतून काळ्या धुरापासून ग्यास उत्पन्न करून त्यावर एंजिनें चालविण्याची युक्ति निघाली आहे. यायोगानें धुराचा त्रास न होतां ग्यासाचा उपयोग होण्याची सोय झाली आहे.

कलकत्ता येथील मेल स्टीमरमधून मिसेस वाल्टर्स नांवाची एक बाई प्रवास करीत असतां तिच्याजवळ ४९८० तोळे अफू दोन जस्ताच्या डब्यांत लपवून ठेवलेली आढळून आल्यावरून रंगून येथील पोलिसांनीं तिला पकडून तिजवर खटला केला आहे. आरोपीस तूर्त जामिनावर सोडण्यांत आलें आहे.

डेन्मार्कमध्यें अविवाहित मुलींचा विमा उतरण्याची एक चमत्कारिक युक्ती निघाली आहे. मुलीचा जन्म होतांच ४४ पौंड भरले म्हणजे तिच्या आईबापास ती तीस वर्षे वयानंतर अविवाहित राहिल्यास दरसाल ९ पौंडाचें वर्षासन मिळतें, चाळीस वर्षे वयानंतर अविवाहित राहिल्यास हें वर्षासन दहा पौंड देण्यांत येतें व पन्नास वर्षेनंतर अविवाहित राहिल्यास १२ पौंडांचें वर्षासन मिळतें व याप्रमाणें जसजशी अविवाहित वयाची यत्ता वाढत जाईल तसतसें वर्षासन वाढवून देण्यांत येतें तिचें लग्न तीस वर्षांच्या आंत झालें तर ही ४४ पौंडांची रक्कम आईबापास परत देण्यांत येते.

कराची येथें धनू नांवाच्या एका इसमानें आपल्या बायकोनें वेळेवर जेवावयास वाढलें नाहीं म्हणून तिचें नाक कापल्यावरून त्याजवर काम चालून त्यास नऊ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली.

मदुरा येथें कांहीं मंडळीनीं चालू सालीं गणपतीची मूर्ति बायसिकलवर बसलेली तयार केली होती व सर्व ब्राह्मणांनीं त्यामूर्तीबद्दल कोणत्याही प्रकारचा आक्षेप न घेतां तिची नेहमींच्या मूर्तीप्रमाणें यथासांग पूजा, अर्चा केली. ही सुधारणा आहे,

सोलापूर येथें, लक्ष्मी मिलमधील मजूरापैकीं तुकाराम वल्लद बंडापा नांवाच्या एका सोळा वर्षाच्या मुलास पानथरीचा आजार बरेच दिवसांपासून झाला होता. त्यावर कन्हेरीच्या मुळ्याचा रस घेतल्यास गुण येईल असें त्यास कोणी सांगितल्या वरून त्यानें तो रस घेतला पण त्यापासून गुण येण्याऐवजीं उलट त्यास जुलाब व वांत्या होऊं लागल्या व पुढें तो बेशुद्ध होऊन त्याची दांतखिळी बसली व आचके येऊं लागले. तेव्हां घरांतील सर्व मंडळी घाबरून जाऊन त्यांनीं त्यास डिस्पेन्सरींत नेलें. तेथें डाक्टरांनीं पुष्कळ उपचार केले, पण कांहीं उपयोग न होता तो मुलगा मरण पावला. औषध सांगणाराचा पत्ता नाहीं, स० वि०

यंदाच्या कांग्रेस सभेचे अध्यक्षस्थान मि. लाल मोहनघोस यांस देण्याचें ठरलें आहे मि. लाल मोहन हे एक नामांकित पुढारी असून फार विद्वान आहेत. तेव्हां यंदाच्या कांग्रेसचा समारंभ फारच वर्णनीय होईल यांत शंका नाहीं.

आशकाबाद येथें ८ बलुचि पठाण सरदार आले असून ते आपली स्वतंत्रता स्थापन करण्याकरितां रशियन सरकारची इंग्लिशाविरुद्ध मदत मागत आहेत अशा तऱ्हेच्या बाजार गप्पा प्रसिद्ध झाल्या आहेत. यांत तथ्य किंतपत आहे हें जरी सांगतां येत नाहीं तरी अशा गप्पा उठविणारांची कमाल च म्हणावयाची!

मल्लापूर जिल्ह्यांतील पेढा गांवांत रामलाल मंडल यांच्या घरावर मुसलमान चोरट्यांनीं भयंकर लूट केली. बायका पोरास व पुरुषास बेदम मारलें. व बरीच संपत्ती लांबविली. सुमारें १७ इसम ताबडतोब कैद केले आहेत. व आणखी पोलीस तपास सुरू आहे.

ग्रीसच्या राजासाठीं २०००० पौंड किमतींचा चाकांचा राजवाडा तयार करण्यांत आला आहे. त्याची लांबी ४४ फूट आहे. त्यांत स्वयंपाकाची सोय, स्नानाची सोय, दिवाणखाना वगैरे उत्तम तऱ्हेची सोय करण्यांत आली असून भेटीसाठीं येणाऱ्या पाहुण्यांच्या आदर आतिथ्याची ही सोय उत्तम रीतीनें करण्यांत आली आहे.

कोल्हापूरचें वेदोक्त प्रकरण भयंकर उग्रस्वरूप धारण करीत आहे असें आढळतें. वेदोक्त प्रकरणानें ढोंग मानऊन कोल्हापुरच्या छत्रपतीनीं किती कुटुंबाच्या तोंडात माती घातली, कितीजणांच्या अन्नांत माती कालविली याचा एक तक्ता नुकाच कोल्हापुरस्थ समर्थ पत्रानें तयार केला आहे. जवळ जवळ अडीच लाख रुपये दरसाल उत्पन्नाचीं इनामें या हिंदू बादशहानें जप्त केलीं आहेत आणि अशा अपहाराचें कारण दुसरें तिसरें कांहीं एक नाहीं. आमच्या घरीं वेदोक्त करा नाहीं तर तुमचीं इनामें जप्त असा धडाका दिवसा ढवळ्या कोल्हापुरच्या हिंदु बादशहानें चालविला आहे. आजवर प्रकरण क्षुल्लक म्हणून बहुतांनीं बहू प्रकारें उपेक्षा केली. परंतु ती उपेक्षा आतां मात्र उपयोगाची नाहीं असें स्पष्ट दिसतें.

सुप्रसिद्ध रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर वकील यांनीं रा. टिळक यांच्या खटल्यांत त्यांचेपासून रोजी १०० रुपये प्रमाणें फी घेतल्याबद्दल बरेच दिवस लोकवार्ता आहे. करंदीकरांनीं टिळकांपासून अशा संकटाचे वेळीं खरोखरच इतकी जबर फी घेतली कीं काय याबद्दल आम्हास फार संशय आहे घेतली असल्यास मोठें आश्चर्यच म्हणावयाचें.

मद्रासकडच्या रेलवेवर एक प्रकार झाला एक नाच करणारी बाई सेकंड क्लासच्या डब्यांत होती. गार्डाचा डोळा तिच्यावर होता; रात्रीं तिच्या नोकरास त्यानें तेथून काढून तो आत शिरला; व तिच्यावर जुलूम करण्याच्या रंगांत आला; परंतु त्या हुशार स्त्रीनें त्याला वचनें देऊन देऊन दूर राखिलें आणि ती चटकन सुतारीच्या खोलींत गेली व तिनें आंतून कडी लावून घेऊन त्याला बाहेर कोकलत बसावयास लाविलें. आपल्या हातावर या बाईनें तुरी दिल्या असें पाहून साहेब गलितेच्छ होऊन विन्मुख परत गेले याप्रमाणें कामातुर झालेल्या गार्डाला त्या नाच्या बाईनें ठकविलें व अब्रू संभाळली.

REGISTERED No. N 4

आकोल्यातील लोकांस..................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८।१ ०१
दुसरे खेपेस.... .... ....८।

Town ... ... ... ... I Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid, in advance.
Single copy ........................ 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line „ 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 28 SEPTEMBER 1903 NO 38

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २८ माहे सप्तेंबर सन १९०३ इ० अंक ३८

## बक्षीस

( हरवलेला किंवा चोरीस गेलेला दागिना सांपडून देण्यासाठीं )

आमच्या बंगल्यांतून थोडे दिवसापूर्वीं एक दागिना हरपला आहे. तो दागिना म्हणजे सोन्याचा जडावाचा ब्रूच. हा लेडींचा दागिना आहे. यांत फिक्या हिरव्या रंगाचा पारदर्शक नीलमणी आठ आणी एवढा पण चौकोनी असा बसविला आहे. हें रत्न विलायती असून दागिन्याची किंमत १०० रुपये अंदाजानें आहे.

दागिन्याची बरोबर माहिती कोणी लाऊन देईल किंवा कोणी तो आणून देईल तर त्याला चांगले इनाम आम्ही देऊं आणि हा दागिना कोठून व कसा आणिला या विषयीं बिलकुल विचारणा करण्यांत येणार नाहीं असें आम्ही आश्वासन देतों.

आकोला १८।९।०३

( सही ) बी. क्रे.

असिस्टंट कमिशनर.

## पत्रव्यवहार

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांसः—

खालीं लिहिलेला मजकूर येत्या अंकीं छापण्याची कृपा करावी.

( लंडन मॅगेझाईन वरून )

( प्रोफेसर 'मारकोनी यांचें तारेवांचून बातमी कशी पाठवितां येईल ह्या विचारा संबंधीं पत्र. )

प्रोफेसर 'हर्झ' ह्यांचे विद्युत प्रयोगाची माहिती इतलीतील एका विद्युत् प्रकाशक वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध झाली होती. त्यांतील मजकूर वाचीत असतां सन १८९४ सालचे वसंत ऋतूंत मला एक अशी कल्पना सुचली कीं वातावरणातील 'इथर' तत्वाच्या ऊर्मिंच्या साह्यानें आकाश मार्गानें बातमी पाठवितां येईल म्हणजे—तारेवांचून बातमी पाठवितां येईल. प्रोफेसर 'हर्झ' हा तत्ववेत्ता सन १८९४ चे जानेवारी महिन्यांत मरण पावला. ह्या पूर्वी पुष्कळ वर्षे पर्यंत मी प्रोफेसर 'हर्झ' ह्यांचे प्रयोग करून पहात होतों, परंतु त्याने योगानें मला मौजे शिवाय दुसरें कांहींच वाटत नसें. विद्युत् वाहक गोलकातून उत्क्रांत होणाऱ्या ऊर्मी दृष्टीगोचर होण्याकरितां प्रोफेसर 'हर्झ' यानें धतुच्या वाटी सारख्या एका पात्राचा उपयोग केला होता. ह्या पात्राचे एका बाजूस एक फट (चीर) ठेविली होती. ह्या पात्रावर वरील गोलकांतील विद्युत्क्षोभाचा प्रयोग केला असतां त्याला असें दिसून आलें कीं ह्या लहानशा फटींमधून निघणाऱ्या बारीक बारीक ठिणग्या इकडून तिकडे जातांना दिसतात. ह्या प्रयोगानें त्यानें असें दर्शविलें कीं विद्युत् ऊर्मी आकाशांत उत्क्रांत झाल्या पात्राचे साह्यानें दिसूं शकतात. ह्यावरून अशी कल्पना सुचली कीं विद्युत्वाहक—गोलकापासून उत्पन्न होणारा विद्युत् प्रवाह मधून मधून लहान मोठ्या मागानीं तोडतां आला तर सदरहू पात्राचे फटींत तशाच प्रकारच्या लहान मोठ्या ठिणग्या दृग्गोचर होतील. सारांश अशा रीतीनें 'हर्झियन' (प्रोफेसर हर्झ कल्पित) ऊर्मींच्या साह्यानें आकाशातुन बातमी पाठवितां येईल ती अशीः— लहान उर्मीपासून होणारी लहान ठिणगी हा बिंदु समजावा व मोठ्या ऊर्मीपासून होणारी लांब ठिणगी ही रेषा समजावी, व अशा रीतीनें प्रोफेसर 'मोरेस'च्या अक्षर पद्धतीनें, अंतरावरील विद्युग्राहक यंत्राच्या साह्यानें शद्वचे शद्व वाचता येतील.

प्रथमतः ही कल्पना मला इतकी सुगम व स्पष्ट दिसूं लागली कीं ही गोष्ट संभवनीय आहे हें दर्शविण्या करितां व्यवहारोपयोगी प्रयोग करून पहाण्याचें माझे मनांत सुद्धां येईना. कारण मला पक्कें माहीत होतें कीं 'इथर' तत्वाच्या ऊर्मींचे प्रयोग करून पहाणारीं बुद्धिवान मनुष्यें जगांत पुष्कळ आहेत, व त्यापैकीं कोणी तरी लवकरच ह्या गोष्टीचा सिद्धांत बसवितील असें मला वाटलें; म्हणून मी एक वर्ष पर्यंत वाट पाहिली तरी 'हर्झियन' ऊर्मींचा बातमी पाठविण्याचें कामीं कोणी उपयोग केल्याची हकीकत कोठेंही माझे वाचण्यांत आली नाहीं, म्हणून मी माझा पहिला प्रयोग सन १८९४ सालच्या दिसेंबर महिन्यांत सुरूं केला. व त्या पासून जो शोध लागला तो फारच अद्भुत होता व तो अगदीं नवीन होता अशी माझी पक्की खातरी झाली.

हें काम सुरू करण्यापूर्वीं पुष्कळ वर्षे पर्यंत मला फक्त विद्युत् प्रयोग करण्यांत मोठी मौज वाटत असे व तेंही केवळ करमणूकीकरितां. 'बोलोन' येथील मी आपल्या बापाचें घरीं लहानसा वेडा वाकडा एक कारखाना उभा केला होता, व तेथें प्राथमिक विद्युदुत्पादक यंत्र (प्रायमरी बॅटरी) व उष्णतेचें यंत्र (थरमॉपाइ) वगैरे यंत्रें चालूं केलीं होतीं. उष्णतेला तात्काळ विजेचें रूप कसें देतां येईल ह्या प्रश्नानें पुष्कळसे शोधक लोक बुचकळ्यांत पडले होते, त्याच शोधांत माझेंही मन त्या वेळीं गुंतलें होतें. तसेंच एंजिनांत वाफेचा उपयोग कसा करितात याचें ही प्रयोग मी केले होते. व रसायन शास्त्रांत ही मला मोठी मौज वाटत होती.

आकाशांतून बातमी पाठवितां येईल ही कल्पना 'बोलोन' विश्व विद्यालयातील प्रोफेसर 'रिघी' यांनीं प्रथमतः मला सुचविली असेंही प्रसिद्ध झालेलें मी पाहिलें. परंतु हा गोष्ट मुळींच खरी नाहीं कारण प्रोफेसर 'रिघी' ह्यांच्या व्याख्यानांला मी ...र मला आतां फारच पश्चात्ताप होतो. तथापि गुरुशिष्य ह्या नात्यानें रसायन शास्त्र व यंत्रशास्त्र ह्या विषयांवर त्यांचा माझा पुष्कळ वेळ वादविवाद झाला होता. प्रोफेसर 'हर्झ' ह्यांचे प्रयोग त्यांनीं वारंवार करून पहावेत व ते त्याना चांगले साधत; व एका कोठडींत प्रचलित केलेल्या उर्मी त्याच कोठडींत कांहीं अंतरावर दृग्गोचर होत असत. परंतु ह्या ऊर्मींचा बातमी पोंहोंचविण्याकडे उपयोग करिता येईल हें त्यांचें कधींच ध्यानांत आलें नाहीं, कारण प्रथमतः जेव्हां ही कल्पना त्यांच्या पुढें मी मांडली तेव्हां हा प्रयोग व्यवहारोपयोगी मुळींच होणार नाहीं असें त्यांनीं आपलें मत प्रगट केलें. ह्यावरून मला वाटतें कीं 'हर्झियन' उर्मींचा उपयोग तारेचे कामाकडे लावण्याचा प्रयोग मी करण्या पूर्वीं असे प्रकारचा प्रयत्न दुसरे कोणी ही केला नव्हता, हें माझें म्हणणें खरें आहे.

ह्या किरणांचा (ऊर्मींचा) उपयोग अशा रीतीनें करितां येईल ही कल्पना कोणत्याही प्रयोगकर्त्यांचें लक्ष्यांत आली असेल असें मला वाटत नाहीं. ह्याच सुमारास प्रोफेसर 'ऑलिव्हर लाज' हे प्रोफेसर 'हर्झ' यानें सुचविलेल्या मार्गानें (कृतीनें) पुष्कळ दिवसा पासून प्रयोग करीत होते. व त्यांनीं सन १८९४ सालांत प्रसिद्ध केलेल्या एक ग्रंथांत ह्या किरणांचा (ऊर्मींचा) उपयोग किती प्रकारें करितां येईल ह्याजबद्दल सुचना केल्या होत्या, परंतु तारेचे (टेलिग्राफीचे) कामीं त्यांची योजना करितां येईल असें बद्दल त्यांनीं कोठेंच उल्लेख केला नाहीं. उलट त्यांनीं असें ही म्हटलें कीं एखाद्यानें आपले डोळ्यांत लोह पिष्ट भरले तर कदाचित् त्याला 'हर्झियन' ऊर्मी दिसतील तर सांगवत नाहीं, परंतु ह्या उर्मींचा बातमी पाठविण्याकडे उपयोग करितां येईल असें त्यांनीं मुळींच सुचविलें नाहीं.

एका विद्युत प्रकाशक इंग्लिश वर्तमान पत्राचे तारीख १७ सप्तेंबर १८९७ इ. चे अंकांत असें म्हटलें आहे कीं 'हर्झियन' ऊर्मींचा अशा रीतीनें उपयोग करण्याचे डाक्टर 'लॉज' यांचें यंत्र सन १८९४ सालांत 'ऑक्सफोर्ड' येथें दाखविण्यांत आलें होतें. परंतु हें म्हणणें अगदी बरोबर नाहीं. कारण ह्या प्रदर्शना संबंधीं त्यावेळीं एकतर लोकमत फारच हलके असले पाहिजे किंवा त्याकडे कोणाचें फारसें लक्ष्य गेलें नसावें, नाहींतर ह्या प्रदर्शना संबंधाचा एखादा लेखी रिपोर्ट पहाण्यांत आला असता. शिवाय लंडन विश्वविद्यालयातील प्रोफेसर 'फ्लेमिंग' हे ह्या समयीं वेळीं हजर होते, परंतु ते एकदा असें म्हणाले कीं प्रोफेसर 'हर्झ' ह्यांचे विद्युत् ऊर्मींचा उपयोग लांब अंतरावर प्रकारची सुचना त्यावेळीं निघाल्याचें स्मरत नाहीं. परंतु पुढें मला असें ही समजलें कीं पुष्कळसे तत्ववेत्ते ह्या कल्पनेच्या अगदीं जवळ जवळ गेले होते व एका इंग्लिश वर्तमान—पत्राचे माहे एप्रिल १८९१ चे अंकांत एका लेखकानें ही कल्पना सुचविली होती ती अशीः—

" जर विद्युत् ऊर्मी निर्माण करण्याचें कामीं दोन हजार अंशानें पौनः पुन्य कमी लागुन एका सेकंदांत दोनलक्ष लहरी उत्पन्न करितां आल्या तर एक 'मिलिमीटर' लांबीच्या उर्मी तयार होतील व त्या केवळ धुक्या मधून पार निघून जातील इतकेंच नव्हे तर त्या विटेबंदी भिंती मधून ही पार निघून जातील. अशा प्रकारच्या लहरी तयार करितां येतील, निदान किनाऱ्यावरून लहान लहान बोटीवर बातम्या पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं. "

'हर्झियन ऊर्मींचे प्रयोग केले जात होते व त्यांचें सूक्ष्म किरणांशीं सारूप्य वारंवार दर्शविलें जात होतें. तरी माझे प्रयोग सुरूं होण्यापूर्वीं तारेचें कामाकडे त्याचा उपयोग कोणी ही केला नव्हता. आणि मला वाटतें कीं सन १८९४ सालीं एका प्रवासी जहाजांतून आकाश मार्गानें पहिली लेखी बातमी विद्युत चुंबक यंत्राचे साह्यानें मीच पाठविली.

माझ्या यंत्रांत मी पूर्वज्ञात कल्पनांचा उपयोग केला आहे, व माझीं यंत्रें पूर्वकालीन तत्ववेत्यांचे यंत्रापेक्षां सुधारलेलीं आहेत. व माझ्या अवलोकनामध्यें मला ज्या सुधारणा करणें जरूर दिसल्या अशा सर्व थोड्या बहुत सुधारणाही मी केल्या आहेत. ह्या नवीन तत्वांचा उपयोग मी केला हें माझ्या फार दिवसाच्या अनुभवाचें फळ आहे असें म्हटलें असतां मजकडेस आत्मश्लाघेचा फारसा दोष येणार नाहीं. कारण फारच थोड्या काळांत व फारच थोड्या श्रमानें एखादा सिद्धांत ठरविणें हें शास्त्राचें काम आहे. व कोणतेही मनुष्याच्या कामाच्या योग्यतेचें परिमाण त्यानें बसविलेल्या सिद्धांता वरून होतें.

परतवाडा ता. २१।९।०३

आपला ग.

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुद्ध ७ शके १८२९

# गृह शिक्षण

( रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि एम. ए. ह्यांचें व्याख्यान )

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि ह्यांनीं 'गृहशिक्षण' ह्या विषयावर लिहिलेला निबंध ता. ६ सप्टेंबर रोजीं येथील लायब्ररींत वाचण्यांत आला हें आम्ही पूर्वींच कळविलें आहे. सदहु निबंधाचा सारांश ह्या खेपेस आह्मी देण्याचा प्रयत्न केला आहे. मूळच्या निबंधाची भाषा व त्यांत ग्रथित केलेले विचार इतके उत्तम आहेत कीं त्याचा सारांश वाचण्यापेक्षां मूळ निबंधच वाचणें जास्त उपयोगी होईल अशी आमची खात्री आहे; तथापि ज्याना मूळ निबंध वाचण्याची संधि मिळाली नाहीं त्यांना कांहीं तरी लाभ व्हावा ह्या हेतूनें आह्मी सदहु निबंधाचा सारांश देत आहों.

कायद्याच्या दृष्टीनें मनुष्य प्राणी हा जरी समाजाचा पाया मानिला तरी सामाजिक शास्त्रदृष्ट्या कुटुंब हेंच समाजाची पहिली पायरी होय; कारण कुटुंबांतील माणसें एकमेका करितां स्वतःचा जीव सुद्धां खर्ची घालण्यास मार्गे पुढें पहात नाहींत. ह्यामुळें कुटुंबव्यवस्था ही मनुष्यप्राण्यांतील विशेष होय व तेथेंच अर्भकास तें वयांत येई पर्यंत बरें वाईट कसें कां होईना शिक्षण मिळत असतें. ह्या करितां मनुष्याच्या आयुष्यांत त्याला घरीं जें शिक्षण मिळत असतें. ह्याकरितां मनुष्याच्या आयुष्यांत त्याला घरीं जें शिक्षण मिळेल त्यावर त्याचें भावी सुखदुःख बऱ्याच अंशानें अवलंबून असतें. ह्याप्रमाणें निबंधकारांनीं आपल्या विषयाचें महत्व थोडक्यांत वर्णिलें.

आपल्या मुलांचें कल्याण व्हावें अशी जरी प्रत्येक कुटुंबांतील आईबापांची इच्छा असते तरी त्यांचें कल्याण कशांत आहे ह्या संबंधानें प्रत्येक आईबापांची कल्पना भिन्न असते. कित्येकांना आपल्या मुलांनीं सुखी असावें व त्यांनां मुलेंबाळें व्हावीं अशी इच्छा असते; तर कित्येकांना आपल्या मुलांनीं लोकांच्या उपयोगीं पडून, कीर्ति मिळवावी असें वाटत असतें. त्याच प्रमाणें प्रत्येक परिस्थितीस अनुसरून प्रत्येक युगांत, किंवा प्रत्येक वर्गांत मुलांच्या कल्याणाची कल्पना विस्तृत किंवा अकुंचित असते. वैदिक युगांत एखाद्या वसिष्ठ कुलोत्पन्न ब्राह्मणाला आपल्या मुलानें वेदाध्ययन करून एखाद्या राजाचें पौरोहित्य संपादन करून पुष्कळ गोधन मिळवावें अशी इच्छा उत्पन्न होत असेल; परंतु हल्लींच्या काळीं त्याच कुळांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणास आपल्या मुलाकडे एखाद्या यंत्राच्या कारखान्याचें आधिपत्य असावें असें वाटत असेल. तसेंच एखाद्या मारवाड्याची आपल्या मुलाच्या कल्याणाविषयींची कल्पना ब्राह्मणाच्या कल्पनेशी जुळत नाहीं. ह्याप्रमाणें हा विषय फार मोठा असल्यामुळें, हल्लींच्या काळासंबंधानेंच व ब्राह्मण वर्गासंबंधानेंच विचार करण्याचें निबंध कारांनीं आश्वासन दिलें. ह्या वर्गाविषयीं विचार केला असतां आपणास असें दिसून येईल कीं शिक्षणामध्यें हा वर्ग बराच पुढें सरसावला आहे व त्यामुळेंच ह्या वर्गाची भिस्त शाळेवर फार असते. मग ती शाळा कशी कां असेना, तेथें आपल्या मुलास शिक्षणा करितां पाठविण्याचा ब्राह्मण वर्गांतील बापाचा निश्चय ठरलेला असतो. ह्या मुळें आपल्या मुलांनां घरीं शिक्षण देण्याची अवश्यकता आहे ह्या गोष्टीचा बहुतेक विसर पडल्या सारखें दिसून येत आहे. शाळांत जें शिक्षण दिलें जातें तें त्रोटक असतें ह्या सबबीवर त्यां तील शिक्षणक्रमांत कितीही सुधारणा केली, किंवा तें शिक्षण देण्याकरितां कितीही योग्य शिक्षकाची योजना केली तरी "आपल्या कर्तव्यास जागरूक व सत्त्वनिष्ठ जनकजननींच्या प्रयत्नांस मुलांच्या शिक्षणाच्या कामीं पुष्कळ जागा राहील" हें आपलें अनुभवसिद्ध मत निबंधकारांनीं मोठ्या कळकळीनें सांगितलें. शिक्षणाच्या साधनांपैकीं शाळा ही जरी एक साधन आहे तरी तेवढ्यानें सर्व शिक्षण पुरें होत नाहीं. शाळेच्या बाहेर मुलांचा बराच वेळ जात असतो तो वेळ मुलें सत्कार्यांत घालवीत आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचें कर्तव्य त्यांच्या आईबापांचें होय. तसेंच मुलाच्या सहाव्या किंवा सातव्या वर्षीं त्याला शाळेंत घालण्यांत येतें, त्यापुर्वींचा त्याचा काळ आई बापांच्याच सहवासांत जात असतो. ह्यामुळें ह्या काळांत त्याच्या आई बापांच्या वर्तनाचा त्याच्या कोमल मनावर बराच परिणाम होत असतो. मुलें जात्या फार अनुकरणशील असतात ह्यास्तव त्यांच्या पुढें चांगलीं उदाहरणें ठेवणें हें त्यांच्या आईबापाचें कर्तव्य होय; असें न केल्यामुळें मुलांचें जन्माचें नुकसान झालेलें आपणांस परोपरीं दिसून येतें. ह्या करितां ह्या कामीं हयगय करणें इष्ट नव्हे. मुलांना शाळेंत घालण्या पूर्वीं त्याचें शरीर, धर्म, मन व नीति ह्या संबंधाच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांच्या आई बापांवर असते. परंतु शारीर शिक्षणासंबंधानें विचार सुचविण्याचा आपला अधिकार नाहीं असें निबंधकारांनीं सांगितलें.

धर्म शिक्षण देणें अवश्य आहे असें जरी आपणास वाटतें तरी तें कसें द्यावें ह्या संबंधाचे आपले विचार अपक्क आहेत असें निबंधकारांनीं प्रांजलपणें कबूल केलें व ह्या मुळें त्यांनीं आपले विचार सदहु निबंधांत ग्रथित केले नाहींत. रा० महाजनि सारख्या ज्ञानवृद्ध गृहस्थानें आपले विचार अपरिपक्व आहेत असें म्हणणें त्यांच्या शालीनतेस शोभण्या सारखें आहे. रा० महाजनि ह्याचे विचार नेमस्त असल्यामुळें ते कदाचित् इतरांस पसंत पडणार नाहींत ह्या कारणामुळें त्यांनीं आपले विचार ह्या वेळीं प्रसिद्ध केले नसतील तथापि ते आपले विचार निराळ्या प्रसंगीं स्वतंत्र निबंध रूपानें प्रसिद्ध करितील अशी आह्मांस आशा आहे.

मानसिक व नैतिक शिक्षणा संबंधानें कुटुंबांत काय करतां येईल एवढ्याच गोष्टीचा विचार करण्याचें रा. महाजनि ह्यांनीं आश्वासन दिलें; तसें करण्यापूर्वीं ह्या संबंधानें हल्लींच्या कुटुंब व्यवस्थेंत कांहीं प्रयत्न होत आहे काय हें पहाण्या करितां निदर्शक हिंदु कुटुंबाचें चित्र काढण्याचा स्तुत्य प्रयत्न रा. महाजनि ह्यांनीं आपल्या निबंधांत केला आहे. तें चित्र अगदीं हुबेहुब वठविलें आहे असें आह्मी मोठ्या आनंदानें कबूल करितों. त्यांतील गुण व दोष ह्या दोहोंचेंही चित्र हुबेहुब रीतीनें वठविण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधांत केला आहे. निदर्शक कुटुंबांतील कर्त्याच्या वृद्ध पित्याचा करारीपणा व त्याची वेळच्या वेळीं नेमलेलें काम करण्याची संवय व त्याच प्रमाणें त्याच्या वृद्ध मातोश्रीचा सोशिक व कष्टाळू स्वभाव आणि तिची श्रद्धा हे गुण निबंधकारांनीं आपल्या चित्रांत स्पष्टपणें उमटविले आहेत. वृद्ध मातोश्रीस अलीकडील सुधारलेल्या विचारांचा गंध नसल्यामुळें तिची बुद्धि जड असते परंतु त्या जड बुद्धी बरोबर तीव्र नीतिमत्तेचें विलक्षण साहचर्य दिसून येत असल्यामुळें तिला अलिकडे प्रसिद्धीस आलेल्या कित्येक नायकांचें मातृपद प्राप्त झालें आहे. कुटुंबाचा कर्ता क्वचित् प्रसंगीं निर्व्यसनी असतो; बहुत करून तो व्यसनीच असावयाचा. आणि अशी कर्त्या पुरुषाची स्थिति असली म्हणजे तेथें मुलांना शिक्षण तें काय मिळणार ! कुटुंबाचा कर्ता निर्व्यसनी असला तरी तो मुलांच्या शिक्षणा विषयीं बहुशः उदासीन असतो त्याच्या बायकोस जरी थोडेंसें लिहितां वाचतां येत असतें तरी तिचे विचार धडना जुने ना नवे असे मध्यम स्थितींत असतात; व तिची प्रकृति निरोगी नसल्यामुळें तिच्या कडून ह्या कामीं मदत होण्याची आशा नाहीं असें रा. महाजनि यांचें मत आहे यामुळें कालान्तरानें ज्या भावी माता होणार अशा मुलींनां किंवा स्त्रियांनां तयार करण्याचे कामीं कर्त्या पुरुषानीं प्रयत्न केला पाहिजे. ह्या मुळें हल्लींच्या स्थितींत ह्या विषयाची सर्व जबाबदारी एकट्या कर्त्यावरच बहुशः पडेल. मुलांनां गृहशिक्षण देण्याचें काम फार जबाबदारीचें आहे तथापि तें केल्यापासून मनास एक प्रकारचा अवर्णनीय आनंद होतो असा रा० महाजनि ह्यांनीं आपला अनुभव दिला. कित्येक कर्ते असें म्हणतील कीं असें जबाबदारीचें काम अंगिकारण्यास अंगीं जितकी योग्यता लागते तितकी आपल्या अंगीं नसल्यामुळें आपल्या कडून तें काम होणार नाहीं. परंतु असे निराश न होतां, अंगीं बाणलेला अवगुण काढून टाकण्याचा प्रयत्न सदहु कर्त्या पुरुषानें केला पाहिजे. अशाच तऱ्हेचा प्रयत्न एका सुशील गरीब बाईनें आपल्या कृतक पुत्रास शिक्षण देण्याचे कामीं केला असतां त्यांत तिला कसें यश प्राप्त झालें हें दाखविण्या करितां रा० महाजनि ह्यांनीं Prince Arther ह्या इंग्लिश कादंबरीच्या कथानकाची थोडक्यांत ओळख करून दिली; व नंतर कुटुंबात मुलांनां गृहशिक्षण देण्याचे कामीं मुलांना कसें वागवावें ह्या संबंधानें कांहीं उपयुक्त सुचना रा० महाजनि ह्यांनीं केल्या.

कुटुंब हें एकछत्री राज्य आहे असें कर्त्या पुरुषानें नेहेमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. ह्यामुळें मुलांवर अंमल चालवितानां आई व बाप ह्यांनीं एक दिलानें वागलें पाहिजे. त्यांजमध्यें विरोध पडला, तर तो मुलांच्या नजरेस पडूं नये अशी खबरदारी घेतली पाहिजे. [illegible] लहान मुलांची जोपासना करण्याचें काम पत्करावें व बापानें त्यांच्या शिक्षणाचें काम पत्करावें. ज्या प्रमाणें सूर्य केंद्रस्थानीं राहून सर्व ग्रहांना आपल्या कक्षेंत फिरवितो त्याप्रमाणें कर्त्या पुरुषानें आपल्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांवर अंमल चालवून, त्यांनां वेळच्या वेळीं काम करण्याची संवय लागेल असा प्रयत्न केला पाहिजे. त्याच प्रमाणें मुलांचे फाजील लाड केल्यापासूनही दुष्परिणाम घडत असतात ह्याकरितां त्यासंबंधानें आईबापांनीं विशेष खबरदारी घेतली पाहिजे. मुलांनां मानसिक शिक्षण देतानां त्यांच्या ज्ञानेंद्रियांनीं आपआपलीं कामें बरोबर करावीं अशा विषयीं कर्त्या पुरुषानें प्रयत्न केला पाहिजे. त्यांची चौकस बुद्धि संकुचित न होतां विस्तृत होईल अशी खटपट केली पाहिजे. ह्याकरितां त्यांनां सृष्ट पदार्थांचें ज्ञान करून दिलें पाहिजे. त्याच प्रमाणें क्रमिक पुस्तकां शिवाय इतर पुस्तकें वाचण्याची गोडी त्यांनां लागण्याविषयीं कर्त्यानें प्रयत्न केला पाहिजे. ह्या प्रमाणें मुलांच्या मानसिक शिक्षणासंबंधानें रा. महाजनि ह्यांनीं उपयुक्त सूचना केल्या. नीति शिक्षणा संबंधानें सांगतांनां ईश्वरनिष्ठा, भक्ति, धर्मबुद्धि, वडिलांचा मान, भूतदया, साधी रहणी, आचार परिमितता, इंद्रिय दमन, करारीपणा, आत्माभिमान राष्ट्राभिमान वगैरे उत्तम गुण आपणांत बरेच दिवसां पासून वास करीत आहेत असें रा. महाजनि ह्यांनीं सांगून ते उजळण्या विषयीं आपण प्रयत्न करावा असें त्यांनीं मोठ्या कळकळीनें सांगितलें. वरील गुणाचा संकोच किंवा अतिरेक झाल्या पासून दुष्परिणाम घडल्या वांचून रहात नाहींत, ह्या करितां त्या गुणांचें परिमित प्रमाण कुटुंबांतील माणसांत आणण्या विषयीं कर्त्या पुरुषानें प्रयत्न केला पाहिजे. ईश्वरनिष्ठा, भक्ति, धर्मबुद्धि ह्या गुणांची वृद्धि करण्या करितां हरिविजय, भक्तिविजय, दासबोध, पांडवप्रताप, तुकारामाचे अभंग ह्या सारखे प्रासादिक ग्रंथ कुटुंबांतील माणसें एके ठिकाणीं जमवून वाचण्यांत येत जावे. परंतु निव्वळ हेच ग्रंथ मुलांस वाचावयास दिल्यापासून मुलांचा अद्भुत चमत्कारांवर भरंवसा बसेल ह्या करितां सृष्ट शास्त्राचीही माहिती त्यांना करून दिली पाहिजे. सृष्ट शास्त्रात शब्द प्रामाण्य नाहीं, "चक्षुर्वैसत्यं" हा सिद्धांत सृष्टशास्त्राच्या अभ्यासानें मुलांची तर्कशक्ति कठोर होते. ह्या करितां ज्योतिर्विलास, अंतरिक्षांतील चमत्कार, ह्या सारखे ग्रंथ त्यांजकडून वाचून घ्यावे, व Murche's Science Series मधील पुस्तकें स्वतः कर्त्या पुरुषानें वाचून ह्या धर्तीवर शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नीतिशिक्षण देण्याकरितां उत्तम संस्था "गृहच" होय ह्या करितां मि० टाटा ह्यांच्या पोस्ट ग्राजुएट इंस्टिट्यूट प्रमाणें स्वतंत्र संस्था स्थापण्याची अवश्यकता नाहीं. असें रा० महाजनी ह्यांनीं सांगितलें. कारण ह्या संस्था कितीही उपयोगी असल्या तरी त्यांचा उपयोग उत्तम गृहांच्या अभावीं होय एवढ्या करितां उत्तम गृह करण्याची प्रत्येक कर्त्या पुरुषानें खबरदारी घेतली पाहिजे असें मोठ्या कळकळीनें रा० महाजनि ह्यांनीं सां-

सनद मिळण्याला ४ रुपया इयत्तेची जरूरी

authorities had triel these persuasive means before a recommendatiou was made to Hon. the Resident for taking

वऱ्हाडांतून परत पुनः आकोल्यास तारीख १३ रोजीं सायंकाळीं मेलगाडीनें येईल.

त्याचा आहे तरी त्या संबंधानें ईश्वरवादी, अनीश्वर वादी व अज्ञेय वादी ह्या सर्वांचें एक मत होणार आहे व ह्या बाबतींत प्रयत्न केल्यापासून प्रत्येकाचा फायदा होईल असें तिन्ही पक्षांच्या लोकांस वाटत आहे ह्या करितां ह्या कामीं हातभार लावण्याची बुद्धी ईश्वर प्रत्येकास देवो अशी रा० महाजनि यांनीं प्रार्थना करून यांनीं आपल्या आवडत्या विषयावरील निबंध पुरा केला.

---

विद्याखात्याचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. यांत १९०२-०३ सालची हकीकत आहे. या वर्षा संबंधानें मे. स्लाडि साहेब ह्मणतात कीं एकंदरीनें विद्या प्रसाराला हें संवत्सर बरेंसें नव्हतें गेल्या दिसेंबरांत जो पाऊस अवेळीं पडला, तसेंच तीन जिल्ह्यांत प्लेगाला सुरवात झाली, आणि हंगामा नंतर लग्नसमारंभाची मोठी गर्दी उडाली या तीन कारणामुळें शाळांतून विद्यार्थ्यांची हजिरी चांगलीशी दिसून आली नाहीं. ज्या ज्या शाळांतून विद्यार्थ्यांची हजिरी फार कमी झाली आणि प्लेग मुळें किंवा लोकांच्या अरसिकतेमुळें त्या शाळा नीट चालण्या सारख्या दिसल्या नाहींत त्या बंद करण्यांत आल्या. आणि त्या बंद झालेल्या शाळा कडील खर्च भरभराटींत असलेल्या शाळाकडे लावण्यांत आला असें कळतें. जिल्हा बोर्डाच्या शाळा ९६८ होत्या त्यापैकीं २१ शाळा या प्रमाणें बंद करण्यांत आल्या.

बोर्डाच्या शाळासंबंधानें दुसरी एक सुधारणा करण्यांत आली आहे. एका शिक्षकाला चार इयत्ता पुऱ्या शिकवाव्या लागत असत आणि त्या मुळें चारही इयत्तांचे अभ्यास नीट न होतां अर्धे कच्चे रहात होते ह्मणून पुष्कळशा शाळांतून चार इयत्ता काढून तीनच वर्ग ठेवण्यांत आले. ज्या शाळांत ४५ पर विद्यार्थी नसतात तेथें शिक्षक एकच असतो, आणि तेथील इयत्ता तीनच केल्यामुळें सरासरी १८९ शाळांतून ४ थी इयत्ता शिकविण्याची बंदी करण्यांत आली आहे. या संबंधानें मे. स्लाडि साहेबांस मे. रुस्तुमजी साहेबांचे विचार फार पसंत पडले. मुख्य विचार असा कीं चौथी इयत्ता नाहीं ह्मणून कांहीं खेडेगांवच्या लोकाची मोठीशी कुरकूर नाहीं. जर पाटील व गांवकरी लोक पुष्कळशीं मुलें शाळेंत घालीत नाहींत तर हा दोष लोकांचाच आहे आणि थोड्याशा विद्यार्थ्यांसाठीं चवथी इयत्ता शिकविण्याची सोय दुसरा शिक्षक ठेऊन करावी तर बोर्डाच्या पैशाचा तितकसा पुरतां तरी योग्यसा विनियोग होत नाहीं. तीनच इयत्ता एका शिक्षकाकडे ठेविल्या तर विद्यार्थ्यांचा अभ्यास फार चांगला होता असा अनुभव आहे. मे. हेअर साहेबांचा अभिप्रायही असाच पडतो. ते ह्मणतात कीं जर ४ थी इयत्ता एखाद्या गांवाला पाहिजेच असेल तर लोकांनीं एका शिक्षकाच्या बारा महिन्याच्या पगाराचे ७२ रुपये वर्गणी जमा करावी किंवा विद्यार्थ्यांची संख्या चांगली वाढेल अशी योजना करावी. जरी मुळकी कायद्यानें पाटीलकीची सनद मिळण्याला ४ थ्या इयत्तेची जरूरी लागेल. जो कोणी होतकरू पाटील आपल्या गांवच्या शाळेंतील तिन्ही इयत्ता शिकेल आणि त्याला दुसरीकडे जाऊन चौथी इयत्ता शिकण्याची सोय नसेल तर ४ थ्या इयत्तेचा नियम कमी करून तीन इयत्तांचा अभ्यास पाटीलकीला पुरेसा मानण्यांत येईल.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 28 1903

The gradual failure of the *Rabbi* crops is rather alarming. It is not a good sign of the times that there is the least inclination to await with anxiety the harvest of the winter crops. People do not wish to raise up the second crops because there are so many difficulties and uncertainties about them. But we think that the soil loses much of its fertility because there is no longer the successive rotation between the *Kharip* and *Rabbi* crops. This is a matter which requires a special attention of the Government. In this connection it is well to observe the remaks of the Mr. R. D. Hare in his last report on the crops of the year 1902—03. The para runs thus:—

| | 1902—03. |
|---|---|
| | Acres |
| Jowari ... ... .. | 3,169,232 |
| Cotton ... ... ... | 2,765,635 |
| Wheat ... ... ... | 216,956 |
| Linsed ... ... ... | 120,753 |
| Gram ... ... ... | 140,318 |

The partial failure of last year's cold wheather crops, and the general disinclination to reserve areas for winter crops owing to a succession of bad seasons, account for the decrease in the *rabi* cultivation. On the other hand much attention is devoted to growth of cotton and jowari: cotton, on account of the good prices obtained for this crop in recent years; and jowari because, being the staple food, the people have of late years considered it of the first importance. This year the area sown with cotton is the highest ever recorded in Berar. The area under jowari has increased in all districts, except Basim, in the year under report. The decrease in Basim is accounted for by rotation of crops, there being a corresponding increase in the area under cotton in this district. To the same reason may be ascribed the slight decrease in the area sown with cotton in the Amraoti, Akola and Ellichpur districts."

It is advisable that the Government should introduce a scheme of granting special concessions for those who will raise up a Rabbi crop.

---

We are glad that Mr. Rustomji and Mr. Rampratap Raghunath Das of Akola have arrived at an amicable settlement with ragard to the huts in the field of the latter, on the Shivani Road. We learn that in pursuance of this settlement, Mr. Rampratap has agreed to remove the huts a little further from the public Road. We wish that our local authorities had tried these persuasive means before a recommendation was made to Hon. the Resident for taking Act; but we are glad to see that a sense of modertion has at last prevailed and Mr. Rampratap has agreed to satisfy the wishes of the European Residents of Akola, though he has been put to some inconvenience in the matter. We hope and trust that similar good feeling will prevail whenever misunderstanding as on the present occasion, unfortunately arises between the Rulers and the ruled. "All's well that ends well."

---

We hear that orders have been issued to the Landords and the Residents in the Civil Station of Akola, to prevent the residents from the town of Akola—which is now infected with plague, from coming to reside within the precincts of the Civil Station. If the order of our Deputy Commissioner, is only in the form of a recommendation to the Landlords and the Residents in order to prevent the spread of plague, we have no ground to complain as our Deputy Commissioner is, in issuing the above order, guided by excellent motives.

By-the-bye we are obliged to Mr. Rustomji Faridoonji for his kind and prompt orders in the matter of the removal of the plague—sheds from the present site. We are glad that the new site selected is far away from the locality of the Municipal town. The old plague sheds were a great nuisance in so far as all plague—patients from all quarters of the town were to be removed to them. Besides those sheds were very near to a populous portion of the town. There were on all sides houses within the range of a gun—shot from the plague—sheds. Their immediate proximity was really a source of danger in times of an epidemic. They ought to have been erected on the open maidan a long way off behind the Central Jail. We know that the best medical aid would have been within an easy reach at that place. Our Civil Surgeon might have been in direct control over the management of these plague—sheds. But orders are orders and none is to blame in the matter. The removal of the plague-sheds to a new site was however hanging fire for over a year. Orders were issued long ago for their removal but some objection or another came in the way and we are glad that Mr. Rustomji got over those difficulties as soon as he was convinced of the good reason and the sound principle in the prayers of the people in this connection.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस मधून मधून पडतच आहे. एकंदर २७ इंचावर पाणी झालें. सार्वजनिक आरोग्य पुष्कळ समाधानकारक असावयाला पाहिजे होतें पण प्लेगामुळें लोक मोठे हवालदिल आहेत. या सप्तकांत प्लेगाला मंद गती येत आहे.

नामदार चीफ कमिशनर, वऱ्हाड यांची स्वारी येत्या ६ वे तारखेला दिवसाच्या गाडीनें उमरावतीकडे जाईल; आणि पूर्व वऱ्हाडातून परत पुनः आकोल्यास तारीख १३ रोजीं सायंकाळीं मेलगाडीनें येईल. होऊन नंतर नामदार साहेब १६ वे तारखेला दिवसाच्या गाडीनें बुलढाण्याकडे रवाना होतील.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी, एक्स्ट्रा असि० कमिशनर हे तेल्हाऱ्याहून गेल्या बुधवारीं येऊन गुरुवारीं येथील सिव्हील जजाच्या जागीं रुजूं झाले. तेल्हारें कोर्टाच्या हद्दींतील सर्व लोक यांचे मोठे धन्यवाद गातात आणि त्यांच्या बदली बद्दल ते मोठा अपसोस करितात.

कारंजाहून एक 'क्ष' कळवितात कीं गणेश चतुर्थीचे उत्सव फार नामी झाले पण ईर्षे ईर्षेनें गांवांत कांहीं तट पडल्यासारखे झाले आहेत. सध्यां प्लेगनिवारणार्थ ईश्वरभजनाचे उपाय चालूं आहेत. होमहवनाकडे विशेष लक्ष्य पाहिजे.

विचित्र सृष्टी— सांगळूद ( अंबाबाईचें ) येथील एका म्हशीला पांच सहा दिवसापूर्वीं एक रेडकी झाली. तिला दोन तोंडें होतीं. प्रत्येक तोंड मानें पासून पुढें वेगवेगळें होतें. दोन्ही तोंडांचे सर्व अवयव संपूर्ण होते पण अशी विचित्र सृष्टी दोन तीन दिवसांतच लयास गेली असें एक बातमीदार कळवितो.

---

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८— |
| सोनें २४॥ | | चांदी ७३ |
| जवारी | ३०।३९।४० | जवस १०० |
| गहू | | ९० ते १०० |
| बाजरी | | ४९ |
| मीठ | ४।≈ | रु. मण |
| चणे | ३।— | रु. मण |
| तूप | ९॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रूई | | ९० |

---

### नोटीस

नोटीशीचें उत्तर बापु वलद जानमी पाटील राहणार घाट पळशी तालुके जळगांव जिल्हा आकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी वऱ्हाडसमाचार पत्रांतून ता० २४।८।०३ इ० रोजीं नोटीस दिली ती पावली त्यांत सरवे नंबर १३ व १४ ही शेतें तुह्मी रुपये ४०० सेस विकत दिलीं ह्मणून लिहिलें आहे. तरी ती शेते मी तुह्मांस विकत नाहींत व त्याबद्दल रुपये घेऊन पावतीही मी लिहून दिली असेल तर सरकार मार्फत फिर्याद करून त्याचा निकाल करून घ्यावा तसे न केल्यास तुह्मी आह्मावर खोटी नोटीस दिल्याबद्दल व त्यांत पावती लिहून दिली आहे ह्मणून लिहिल्याबद्दल कोर्ट मार्फत फिर्याद केली जाईल कळावे. तारीख २४.९. १९०३ इसवी.

सही
रायसिंग वलद माणसींग रजपूत
राहणार घाटपळसी ता. जळगाव जिल्हा आकोला
निशाणी खुद्द.

नवलपुरास– विचित्र पुतळा आला आहे यानें खाकी पोशाख ठेवला ह्मणजे तो इंग्लिश मनुष्या सारखा दिसतो त्याची वागण्याची तऱ्हा व कृति विलक्षण आहे. तो अकस्मात एखाद्या युरोपियनच्या बंगल्याकडे धांव घेतो व त्याच्या मुलांमाणसांस घरच्या यजमाना देखत त्रास देतो. ज्यांनीं त्याला पकडण्याचा यत्न केला तर तो लगेच फरार होतो. आजपर्यंत त्यांनीं बऱ्याच युरोपियनांच्या बंगल्यावर लुटे घेतले पण त्याला पकडून कैद करण्याचा विचार करतात न करतात इतक्यांत तो डोळा चुकवून निसटून जातो. आज तीन महिने झाले त्या विचित्र व्यक्तीनें तेथील सिविल लाईन्स मधील मंडळींना भंडावून सोडलें आहे. त्याला पकडण्या करितां जादा पोलीस नेमलें गेले आहे. तो इतराकडून तरी पकडला जावा ह्मणून मधाच्या बोटा दाखल इनामही ठेविलें आहे युरोपियन लेडींना त्याचें आपलें नेहमींचें भय झालें आहे!

९१ लाखांचा दावा— मद्रास रेल्वेवर गुदस्तां झालेल्या अपघातांत मरण पावलेल्यां मुंबईच्या श्रीमान जवाहिऱ्याचे वारसांनीं सदर रेल्वे कंपनीवर ९१ लाख रुपये नुकसानीचा दावा मांडला आहे.

यंदा अमेरिकेंत कापसाचें पीक आज दहा वर्षांमध्यें नव्हतें इतकें उत्तम झालेलें आहे असें प्रसिद्ध झाल्या कारणानें न्यूयार्क येथें बरीच चळवळ झालेली आहे.

एका काळी मेडून देण्याचे खटल्याच्या कामीं विनाकारण खोटी साक्ष देऊन एका सभ्य युरोपियन स्त्रीची अब्रु खराब केल्याच्या आरोपावरून एडवर्ड राईट नांवाचे एका खासगी डिटेक्टिव्ह बनलेल्या युरेशियनाला कलकत्याचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें दीड वर्षांची सक्त कैदेची शिक्षा दिलेली आहे. दे०स०

तुळशीच्या झाडासंबंधीं प्रसिद्ध सर जार्ज बर्डवुड या गृहस्थांचें असें मत आहे कीं तुळशीच्या झाडाच्या अंगीं हवेंतील विषारी पदार्थ नष्ट करण्याची शक्ति विशेष आहे. मलेरिया फिव्हर सारखे ताप तुळशीच्या झाडापासून नाहींसे होतात. एकंदरींत हवा शुद्ध करून विषारी पदार्थ नष्ट करण्याचा तुळशीच्या झाडाच्या आंगीं मोठा धर्म आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. आमचे पूर्वीचे लोक तुळशीची बनेंच्या बनें कां लावीत असत यातील इंगित तरी हेंच आहे, पण हल्लीं आम्ही बनत चाललों आहोंना सुधारक! तेंव्हां आह्मास हें ज्ञान कसें राहणार!

येत्या मार्गशीर्षमासीं बडे ब्यास युवराज फत्तेसिंग महाराज यांच्या विवाहाची तयारी फारच मोठ्या प्रमाणावर चालली असून त्या प्रीत्यर्थ सामान सुमानाला दीडलक्ष, लग्नविधीला चाळीस हजार इंग्रज पाहुण्या साटीं दोनलक्ष रुपये खर्च होणार असून सदर्हू विवाह समारंभाला लार्ड कर्झन व मोठमोठे अधिकारी ह्मणजे गव्हर्नरादि आणि राजेरजवाडेही बोलाविले जाणार आहेत.

यंदाही फिरून म्हैसूर येथें प्लेगचा आ-

रोज त्या रोगानें तीस तीस माणसें मरत आहेत ह्मणून विजयादशमी रोजीं तेथें भरणारी लोक प्रतिनिधींची सभा यंदाही म्हैसूरच्या महाराजांना तहकूब ठेवावी लागेल कीं काय असा संशय उत्पन्न झाला आहे.' पु० स०

राजे साहेबांनीं मि. चेंबरलेन, लार्ड जार्ज हॅमिल्टन मि. रिची याचे राजीनामे मंजूर केले.

मि. ब्राडरिक यांची हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं नेमणूक होणार ही बातमी बरीच विश्वसनीय आहे असें विलायतेंतील पत्रें ह्मणत आहेत.

हल्लीं दिलेल्या राजीनाम्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं मि. बाल्फर यांची फ्रीट्रेड पालिसी मि. चेंबरलेनप्रभृति नव्या मताच्या लोकांना पसंत नाहीं.

डेली टेलिग्राफ पत्र असें ह्मणतें कीं मि. चेंबरलेन यांची तिजोरी कामगाराच्या जागीं खास नेमणूक होणार.

डेली टेलिग्राफमध्यें अशी खात्रीची बातमी आहे कीं मि. ब्राडरिक हेच स्टेटसेक्रेटरी होणार व लार्ड मिलनर यांची मि. चेंबरलेन यांच्या जागीं नेमणूक होणार.

लिबरल पत्रें असें ध्वनित करीत आहेत कीं मि. बाल्फर यांचें धोरण मि. चेंबरलेन यांचा मार्ग मोकळा करण्याचें आहे. मि. बाल्फर यांनीं नुकतेंच एक 'इंग्लंडचें राजकीय धोरण' या विषयांवर पुस्तक लिहिलें आहे त्यामुळें युनियनिस्ट पक्षांत फाटाफूट होईल असा संभव आहे.

मि. चेंबरलेन यांच्या राजीनाम्यामुळें सर्वांना अतिशय आश्चर्य वाटत आहे. टारिफच्या प्रश्नाबद्दल मि. बाल्फर व मि. रिची यांचा मतभेद झाल्यामुळें मि. रिची यांनीं राजीनामा दिला.

लार्ड कर्झन साहेबांची विलायतेंत जरूर —मुंबई ग्याझिटच्या लिमल्याच्या बातमीदारानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं प्रधान मंडळांत जी उलथापालथ झाली आहे त्यामुळें लार्ड कर्झन साहेबाची प्रधान मंडळाला जरूर लागेल यांत शंका नाहीं पण हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं त्यांना नेमणार ही बातमी विशेष विश्वास ठेवण्यासारखी नाहीं. हिंदुस्थानच्या व्हाइसरायाला स्टेटसेक्रेटरीच्या जागीं एकदम नेऊन ठेवावयाचें हें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एक नवीनच उदाहरण होईल असें या बातमीदाराचें मत आहे. ही गोष्ट कलोनियल सेक्रेटरीच्या जागेला मात्र लागू नाहीं. हल्लीं बाल्फरप्रभृति प्रधानमंडळ इतकें दुर्बल झालें आहे कीं लार्ड कर्झन सारखा प्रसिद्ध वक्ता व धूर्त मुत्सद्दी कानमर व्हेटोव्ह प्रधानमंडळ आपल्या गोटांत आणण्याला प्रयत्न करणार नाहीं हें संभवत नाहीं.

स्पेनदेशाची अंतस्थ स्थिति बरीच बिघडली आहे, व त्यामुळें तेथें राज्यक्रांति होण्याचें भय आहे असें तिकडील एक जुने मुत्सद्दी ह्मणत आहेत.

वाशिंग्टनचें स्टेशन संगमरवरी दगडांनीं बांधण्याचें ठरलें आहे. या प्रीत्यर्थ १४०००००० डालर खर्च व्हावयाचे आहेत.

प्राचीन ग्रंथकारांचीं स्थानें.

बाणकवी शोण नदीच्या पश्चिमेस प्रीतिकूट नामक नगरींत होता.

भवभूति हा दक्षिणदेशांत पद्मपूर नामक नगरींत होता.

जगन्नाथराव पंडित यांचें जन्मस्थान विंध्याद्रि–पर्वताच्या पलीकडे मिरजापूर या शहरीं होतें.

मंडनमिश्र हा माहिष्मती ( महेश्वर ) क्षेत्रीं जन्मला. तेथेंच पूर्वी कार्तवीर्य राजा राज्य करीत असे.

विद्यानगर अगर विजयानगर द आच्याच जवळ असलेलें 'अनागोंदी' अगर हस्तिनावती या शहरीं प्रसिद्ध ग्रंथकार सायण व माधव हे राहत असत.

निविवास अगर 'नेवासें' क्षेत्रीं ज्ञानेश्वरांनीं आपला ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण केला.

कौंडिण्यपुरांत अन्नंभटानें न्यायशास्त्राचा अभ्यास केला.

जीर्णनगर अगर जुन्नर, ज्याला प्राचीन काळीं 'नगर' असें ह्मणत असत, त्या क्षेत्रीं प्रसिद्ध लोलिंबराज वैद्य कवी जन्मले.

वसई तालुक्यांतील निर्मळेश्वर अगर विमलेश्वर या क्षेत्रीं, जगद्गुरु श्री शंकराचार्य यांचें श्रीसरस्वतीच्या शापामुळें देहावसान झालें.

प्रतिष्ठान अगर बरद्वान येथेंच मीरतंग नवाच्या जैन पंडितानें 'प्रबोधचिंतामणि' नामक ग्रंथ रचिला.

देवगिरी अगर दौलताबाद येथें हेमाद्रि अगर सुप्रसिद्ध हेमाडपंत राहत असे. यानें 'चतुर्वर्ग चिंतामणि' व आयुर्वेदरसायन आणि राजप्रशस्ति वगैरे ग्रंथ लिहिलेले आहेत. यानेंच मोडी लिपीचा महाराष्ट्रांत प्रथम प्रसार केला असें ह्मणतात.

प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य हा सह्याद्रि–पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या एका खेड्यांत राहत असे.

शालातुर 'लाहोर' या ठिकाणीं प्रसिद्ध वैय्याकरणी पाणिनी जन्मला होता.

र. रं.

मुंबई हायकोर्टाचे माजी जज्ज कै० नानाभाई हरिदास ह्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मि० जमितराम नानाभाई प्रसिद्ध आडव्होकेट हे हार्टडिसीझनें ता. ८ रोजीं एकाएकीं मरण पावले. तसेंच मुंबई येथील एलफिन्स्टन हायस्कूलचे रजेवर असलेले व्हैसप्रिन्सिपाल मि. पटेल ह्यांणीं गेल्या रविवारीं आत्महत्या करून घेतली! मि. जमितराम यांच्या मृत्युबद्दल ना. हायकोर्ट जज्जांनीं दुखवटा प्रदर्शित केला.

विचार व कल्पनाशक्ति– बाळपणांत व अज्ञानावस्थेंत कल्पनाशक्ति फार प्रज्वलित असते. विचार शक्तीच्या वाढी बरोबर कल्पनाशक्तीचा ऱ्हास होत जातो. राष्ट्राच्या बाल्यावस्थेंत जसे उत्कृष्ठ कवी जन्मास येतात तसे पुढें येत नाहींत.

गोव्यास प्रेसआक्ट आला— पोर्तुगाल अमलांतील वर्तमानपत्राचा मुस्कुटदाबीचा कायदा इतके दिवस गोवें अंमलांत सुरू नव्हता, परंतु तो आतां सुरू करण्यांत आला, ह्यामुळें विरुद्ध लेख लिहिणाऱ्या गोवानीज पत्रकर्त्यांस दडपण्यास तेथील अधिकारी आतां समर्थ झाले आहेत.

अँटवर्ष जवळ घील नामक एक शहर आहे. तेथें सर्व वेड्यांची वस्ती आहे. त्यांची लोकसंख्या ६००० आहे. हें शहर एका अरण्याच्या मध्यभागीं बसलें आहे.

नोटीस

नोटीस बेशमी नथु ऊर्फ लक्षाण वल्लद उत्राजी पाटील राहणार शेळद तालुके बाळापूर यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मीं तुह्मास तारीख २०।७।१९०३ इसवी रोजीं नोटीस दिल्या वरून तुह्मी त्याचें उत्तर ७।९।१९०३ इसवी रोजीं दिले त्यांत मजकूर खोटा लिहिला तो असा कीं सोन्या चांदीचे डागीने अंदाज किंमत रुपये ३००० तीन हजाराचे लांबविले आहेस असा उत्तर हेंच कीं ज्या वेळीं मी तुमचे पासून खरिदी घेतली त्यातच राहत होते व ताबा माझा होता परंतु तुह्मी दांडगाई करून नवऱ्या लुगड्यानिशीं काढून दिले व माझे सर्व सामान या घरातच आहे त्याजबद्दल तुमचे वर फौजदारी कोर्टांत दावा करण्याचा होता तसे जनलाजेस्तव मी न केल्यामुळें हें खोटें तुफान तुह्मी मजवर घेत आहा तरी कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मास कांहीं दिवस त्या घरातच राहणें असल्यास तुमच्या राहण्यचे जागेपुरती भाडेचिठ्ठी करून द्यावी माझें जें सामान हवेलींत आहे याची अफरातफर केल्यास जबाबदार तुह्मास धरलें जाईल तसेच डागडागीनें संबंधानें मजजवळ कांहीं एक नसून तुह्मी विनाकारण लिहिलें आहे कीं मी जावयाच्या घरीं जिन्नगी नेत नाहीं माझ्याच व्यवस्थेनें जिनगी शिल्लक थोडी आहे तर माझ्या मरणानंतर तुह्मीच ती घ्यावी. परंतु हल्लीं दारूच्या व्यसनामुळें तुह्मी आह्मा सर्वांस नागवीत आहां. खरेदीखताचा भरणा तुह्मास योग्य प्रकारें पोंचता केला आहे; आणि त्या अन्वयें माझी मालकी चालू आहे. तुह्मी कोणा लबाडाच्या सल्ल्यानें कांहीं गैरवाजवी गोष्ट कागद किंवा भलतीच नोटीस द्याल तर ती जबाबदारी माझ्यावर नाहीं त्याच प्रमाणें खरिदी घेतले पासून सेत माझे ताब्यांत असून तें मी पट्यानें वहीतीस दिले आहे हें तुह्मास माहीत असून तुह्मी माधो वल्लद उदेभान गिरते यानला पटा करून मागत आहा तरी कदाचित् त्यानें तुह्मास पटा करून दिल्यास किंवा इतरांनीं पटा करून दिल्यास किंवा तुह्मी दुसऱ्या कोणास शेत पट्यानें दिल्यास तो सर्व रद्द असून तुह्मी फौजदारीस पात्र व्हाल त्याचप्रमाणें मी हवेलींत आली असतां दंगाधोपा व मारहाण करून पाहता तर एकंदर नोटीसीवरून तुह्मास कळविण्यांत येतें कीं यापुढें कोणत्याही तऱ्हेचे गैरवर्तन केल्यास कायद्या प्रमाणें बंदोबस्त केला जाईल कळावें तारीख २३।९।१९०३ इसवी.

सही

पारवती मर्द नथु उर्फ लक्षण

वल्लद उत्राजी पाटील राहणार शेळद निशाणी खट